सहकार भारतीचे
मुखपत्र

बिना संस्कार नहीं सहकार, बिना सहकार नहीं उद्धार

ISBN
978-81-940842-0-4

# सहकार सुगंध

PRGI NO. MAHMUL/2005/16099

• पुणे • वर्ष : २१ • अंक १२ • मार्च २०२६ • पृष्ठे ४४ • किंमत : रु. ३०/- • संपादक : भालचंद्र कुलकर्णी





जागतिक महिला दिन





## सहकार चळवळीत महिलांचे उल्लेखनीय योगदान




सहकार भारती
राष्ट्रीय कार्यकारिणी बैठक
कानपूर (उत्तर प्रदेश)




गृहनिर्माण संस्था
प्रशिक्षण वर्ग,
पनवेल



दि धरमपेठ महिला
मल्टी स्टेट को-ऑप. सोसायटी लि., नागपूर. (महाराष्ट्र, छत्तिसगढ व मध्यप्रदेश)
आपला परिवार, आपली संस्था !
31 वर्ष
आंतरराष्ट्रीय महिला दिन
निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा !
५००० कोटींच्या व्यवसायाकडे यशस्वी वाटचाल...
सोने कर्ज Gold Loan
सोन्यासारख्या लेकींसाठी... हक्काचा आधार !
कमीतकमी कागदपत्रे त्वरित कर्जमंजुरी
गोल्ड लोन 0.90% व्याजदर प्रति माह
आनंदी क्षणांचा सोबती...
सीताराम भवन ऑडिटोरियम आणि गेस्ट हाऊस
।वाढदिवस ।मुंज ।साक्षगंध ।
सांस्कृतिक कार्यक्रम । कॉन्फरन्स
7888002023
सर्व आर्थिक समाधानांसाठी एकच संस्था
तुमच्या सेवेत सदैव तत्पर
LOCKERS सुविधा
SMS अर्लट
DEPOSIT सुविधा
NEFT, RTGS सुविधा उपलब्ध
MOBILE बँकिंग
₹ 2335 कोटींच्या वर व्यवसाय
GOLD LOAN उपलब्ध
CORE बँकिंग
LIC पॉलिसी काढण्याची व प्रीमियम भरण्याची सुविधा
MSEDCL विज बिल भरणा केंद्र
LOAN सुविधा
GIC पॉलिसी काढण्याची व नुतनीकरणाची सुविधा
मुख्य कार्यालय : प्लॉट नं. ४२-अ, सीताराम भवन, राम नगर चौक, शिवाजी नगर, नागपूर-१० | फोन: 0712-2524337 / 2520303 | ई-मेल : info@dpmahila.com



राजर्षी शाहू मल्टीस्टेट
र. नं. 819
रा.ल. उपाख्य भाऊसाहेब शेळके
संस्थापक अध्यक्ष, राजर्षी शाहू परिवार
गुढीपाडवा | श्रीराम नवमी
तसेच रमजान ईद निमित्त
सर्व नागरिकांना हार्दिक शुभेच्छा..!
तुमच्या सेवेत सदैव तत्पर..!
संदीप शेळके
अध्यक्ष, राजर्षी शाहू परिवार
संस्थेची वैशिष्ट्ये
१. एकूण ६९ शाखेचा विस्तार
२. १००० कोटींचा व्यवसाय
३. १,५०,००० सभासद संख्या
४. 'शाहू पे हे पेमेंट ॲप विकसित करणारी भारतातील पहिली पतसंस्था
५. महिला बचत गटाच्या माध्यमातून ६० हजार महिलांना २५० कोटी रुपयाचे कर्ज वाटप.
६. ९० कोटी रु. सोने तारण कर्ज वाटप.
LOCKERS सुविधा
NEFT,RTGS सुविधा उपलब्ध
SMS अलर्ट
DOORSTEP बँकिंग
MOBILE बँकिंग
DEPOSITE सुविधा
LOAN सुविधा
CORE बँकिंग
NET बँकिंग
GOLD LOAN उपलब्ध
MSEDCL वीज बिल भरणा केंद्र
अनेक प्रकारच्या पॉलिसी काढण्याची व प्रीमियम भरण्याची सुविधा
ISO ९००१:२०१५ मान्यता प्राप्त संस्था, FCBA पुरस्कार प्राप्त संस्था,
मल्टीस्टेट फेडरेशनचा सहकार गौरव पुरस्कार प्राप्त संस्था
बँको पुरस्कार प्राप्त संस्था
कार्यक्षेत्र : महाराष्ट्र,मध्यप्रदेश
राजर्षी शाहू
मल्टीस्टेट को ऑप क्रेडीट सोसायटी म.बुलडाणा
सौ.मालती शेळके
अध्यक्षा, राजर्षी शाहू मल्टीस्टेट
को. ऑफ क्रेडीट सोसा. मर्या. बुलडाणा
www.rajarshishahumultistate.com
9359941853

netwin
Ideas to Life

# आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) सह स्मार्ट बँकिंगचा नवा अनुभव!




- शासकीय नियमावलीवर आधारित अत्याधुनिक कोअर बँकिंग सोल्यूशन
- NPA व्यवस्थापन आणि सुबक रिपोर्ट्सची सुविधा
- सुलभ कर्ज अर्ज – सुरक्षित, सोपी आणि जलद डिजिटल प्रक्रिया!
- संस्थेच्या वाढीसाठी NetPay UPI QR कोड सुविधा

Certification

ISO ISO CMMI

netwin
Ideas to Life

## नाविन्य, विश्वास आणि गुणवत्तेचं प्रतीक.

- AI-सक्षम प्रणालीद्वारे आधुनिक आणि गतिमान बँकिंग सेवा
- तुमचा चेहरा तुमची ओळख – खाते उघडण्यासाठी फक्त एक सेल्फी पुरेशी!
- आधार OTP आणि डिजिटल ई-केवायसी द्वारे खाते सुरू करा
- बायोमेट्रिक वर आधारित अचूक प्रमाणीकरण
- स्मार्ट डॅशबोर्ड्स आणि रिअल टाईम डेटा नियंत्रणाची सुविधा
- संपूर्णतः पेपरलेस, जलद आणि सुरक्षित व्यवहार अनुभव

अधिक माहितीसाठी स्कॅन करा

आजच आपल्या संस्थेला बनवा AI-सक्षम!
०२५३ ६६५ १५००

sales@netwinindia.in
www.netwin.in

DEPOSITS
**2910**
CROES PLUS

# जागतिक महिला दिनाप्रित्यर्थ हार्दिक शुभेच्छा !

**5400+**
CRORES BUSINESS




**• मुदत ठेव (F.D.) योजना •**

| गुंतवणूक कालावधी | व्याजदर |
|---|---|
| 30 ते 45 दिवस | 7.00% |
| 46 ते 180 दिवस | 8.00% |
| 181 ते 365 दिवस | 9.00% |
| 366 दिवसांहून अधिक | 10.00% |

2 वर्षापेक्षा जास्त
1 लाखावर मिळवा
₹ 900/-

2 वर्षापेक्षा कमी
1 लाखावर मिळवा
₹ 850/-

455 दिवस 10.00%

**90 महिन्यात दाम दुप्पट**

**प्राईड ऑफ महाराष्ट्र पुरस्कार**
द्वारा महाराष्ट्र इंडस्ट्रीयल अँण्ड इकॉनॉमिकल डेव्हलपमेंट अँण्ड एस.एम.ई. चेंबर्स ऑफ इंडिया

**प्रतिबिंब पुरस्कार**
द्वारा सहकार सुगंध, पुणे

**दीपस्तंभ पुरस्कार**
२०१६-१७,१७-१८,१८-१९,१९-२०,२०-२१, २१-२२,२२-२३ द्वारा राज्य फेडरेशन, महाराष्ट्र राज्य

**अर्थरत्न पुरस्कार**
द्वारा सह्याद्री उद्योग समूह, अहमदनगर

**बँको पुरस्कार**
१५-१६,१६-१७,१७-१८,१८-१९,१९-२०, २०-२१, २१-२२ द्वारा अवीज् पब्लिकेशन, कोल्हापूर

**सहकार गौरव पुरस्कार**
२१-२२,२२-२३ द्वारा फेडरेशन ऑफ मल्टिस्टेट को-ऑप.क्रेडिट सोसायटीज लिमिटेड

**राष्ट्रीय पुरस्कार-बेस्ट को-ऑप.सोसायटी**
द्वारा चेंबर ऑफ इंडियन मायक्रो स्मॉल अँन्ड मिडीयम इंटरप्राईजेस

**सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्कार**
२०२२ द्वारा मल्टिस्टेट फेडरेशन, पुणे

**धनंजय तांबेकर**
व्यवस्थापकीय संचालक, गोदावरी अर्बन
संचालक, मॅफको

**सौ. राजश्री हेमंत पाटील**
अध्यक्ष,
गोदावरी अर्बन

# गोदावरी अर्बन
**मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑप.सोसायटी लि. नांदेड**
**कार्यक्षेत्र :** महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगाना, गुजरात, गोवा
Follow us on : www.godavariurban.com

**मुख्यालय :** 'सहकारसूर्य' एमएसईबी समोर, तरोडा नाका, पूर्णा रोड,नांदेड-४३१६०५.फोन:०२४६२-२६७२७७, ७७७५००५७७७
Email : officeadmin@godavariurban.com
**प्रशासकीय कार्यालय :** रिजेंट चेंबर्स, पहिला मजला, स्टेटस हॉटेलच्या वर, नरीमन पॉईंट, मुंबई -४०००२१

विश्वास तुमचा, जबाबदारी आमची!


टीजेएस्बी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
तुमच्या व्यावसायिक प्रगतीसाठी
कायम तुमच्या सोबत!
टीजेएस्बी ॲसेट बॅक्ड क्रेडिट लोन
कर्ज
रु 5 कोटींपर्यंत
व्याजदर
@8.50%*
वार्षिक
परतफेडीचा कालावधी
120 महिन्यांपर्यंत
मुदत कर्ज किंवा लाईन ऑफ क्रेडिट
द्वारे उपलब्ध
व्यक्ती, कंपनी आणि एल एल पी साठी
योजना लागू
*अटी व शर्ती लागू
www.tjsb.bank.in | : 022- 48897210

|| बिना संस्कार नहीं सहकार ।
बिना सहकार नहीं उद्धार ||

# सहकार सुगंध

ISBN : 978-81-940842-0-4

**मार्च २०२६ (वर्ष २१, अंक १२)**

**संपादक :**
भालचंद्र कुलकर्णी (मोबाईल : ९८२२८८२५०९)

**सहसंपादक :**
विनायक कुलकर्णी (मोबाईल : ९४२२३२१६२६)

**सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.**
**संचालक मंडळ :**
डॉ. उदय जोशी (संचालक, राष्ट्रीय अध्यक्ष)
सीए सतीश मेढी (संचालक, राष्ट्रीय कोषाध्यक्ष)
श्री. विनय खटावकर (संचालक)
श्री. भालचंद्र कुलकर्णी (व्यवस्थापकीय संचालक)

**मार्गदर्शक : सहकार भारती पदाधिकारी**
डॉ. उदय जोशी (राष्ट्रीय अध्यक्ष)
श्री. दीपक चौरसिया (राष्ट्रीय महामंत्री)
श्री. दीनानाथ ठाकूर (संरक्षक)
श्री. संजयजी पाचपोर (राष्ट्रीय संघटनमंत्री)
श्री. दत्ताराम चाळके (महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष)
श्री. विवेक जुगादे (महाराष्ट्र प्रदेश महामंत्री)
श्री. शरद जाधव (महाराष्ट्र प्रदेश संघटनमंत्री)
डॉ. मुकुंद तापकीर, श्री. सतीशजी मराठे,
श्री. ज्योतिंद्रभाई मेहता, श्री. विष्णूजी बोबडे,
श्री. संजय परमणे

**जाहिरात व वर्गणीदार विभाग समन्वयक :**
सौ. अंजली लागू, श्रीमती पौर्णिमा राईलकर

**मुखपृष्ठ मांडणी, अक्षरजुळणी व डिझाइन :**
सौ. अर्चना गाढवे

## वर्गणीचे दर

**वार्षिक वर्गणी : रु. ७००/- फक्त**
**त्रैवार्षिक वर्गणी : रु. १८००/- फक्त**
**खालील QR कोड स्कॅन करून ऑनलाइन पेमेंट करावे.**
**Please Visit : www.sahakarsugandha.org**

**कृपया QR कोड स्कॅन करून ऑनलाइन पेमेंट करावे. किंवा खालील बँक खात्यात थेट रक्कम जमा करावी.**

**A/c Name : Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.**
**Bank Name : State Bank of India**
(Hingne Khurd, Pune Branch)
**Current a/c No. : 36931889346**
**IFS Code - SBIN0007159**

**सहकार सुगंध कार्यालय :**
ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट, ५ वा मजला, ईशान रेस्टॉरंटच्यावर, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे - ४११०३०. मो. : ८८०५९८१६७३
ईमेल : sahakar.sugandha@gmail.com

**'सहकार सुगंध'** हे मासिक **मालक,** सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि. यांचेसाठी **प्रकाशक** भालचंद्र वसंत कुलकर्णी यांनी **मुद्रक** विवेक श्रीधर देशपांडे यांच्या श्रीपाद प्रिंटर्स, शॉप नं.२, कोणार्क उद्योग, स.नं. १७७, एरंडवणा, पुणे ४११ ००४ येथे छापून ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले. **संपादक -** भालचंद्र वसंत कुलकर्णी

**'Sahakar Sugandha'** monthly is owned by Sahakar Printing & Publications Pvt. Ltd., Published by Bhalchandra Vasant Kulkarni at Office No. 15, Vishnu Priya Apartment, Ganeshmala, Sinhagad Road, Pune 411 030 Printed by Vivek Shridhar Deshpande at Shripad Printers, Shop No. 2, Konark Udyog, S.N. 177, Erandwane, Pune 411 004.
**Editor :** Bhalchandra Vasant Kulkarni

# सहकार चळवळीत महिलांचे उल्लेखनीय योगदान!

भारतातील सहकार चळवळ ही समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक उन्नतीसाठी उभी राहिलेली एक महत्त्वपूर्ण लोकचळवळ आहे. या चळवळीच्या यशामध्ये महिलांचे योगदान अत्यंत मोलाचे आणि प्रेरणादायी आहे. विशेषतः गेल्या काही दशकांत महिलांनी सहकार क्षेत्रात सक्रिय सहभाग नोंदवून आर्थिक स्वावलंबनाबरोबरच सामाजिक नेतृत्त्वही सिद्ध केले आहे. महिलांच्या सहभागामुळे सहकार चळवळीला नवे आयाम प्राप्त झाले. महिलांच्या बचतगट चळवळीने ग्रामीण आणि शहरी भागात आर्थिक शिस्त, बचतीची सवय आणि लघुउद्योगांची उभारणी यांना चालना दिल्याचे दिसते. आज हजारो महिला बचतगटांच्या माध्यमातून महिलांनी लहान-मोठे उद्योग सुरू केले, कुटुंबाच्या अर्थकारणात योगदान दिले आणि स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारला आहे. आज अनेक ठिकाणी या बचतगटांचे रूपांतर महिला पतसंस्था आणि सहकारी संस्थांमध्ये झालेले पाहावयास मिळते.

सहकार क्षेत्रात महिलांसाठी स्वतंत्र बँकांची उभारणी ही देखील एक महत्त्वाची पायरी ठरली आहे. पुण्यासह महाराष्ट्रात भगिनी निवेदिता सहकारी बँक, जिजामाता महिला सहकारी बँक, भाग्यलक्ष्मी महिला सहकारी बँक, मानसी महिला सहकारी पतसंस्था यांसारख्या बँकांनी महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी मोठे कार्य केले आहे. या बँकांनी महिलांना बचत, कर्जपुरवठा, लघुउद्योगांसाठी आर्थिक मदत आणि वित्तीय सल्ला देऊन हजारो कुटुंबांना आर्थिक स्थैर्य मिळवून दिले आहे. महिलांनी उभारलेल्या आणि महिलांच्याच नेतृत्त्वाखाली चालणाऱ्या या बँका सहकार चळवळीतील एक आदर्श प्रयोग मानला जात आहे. याशिवाय अनेक सहकारी बँका, पतसंस्था, साखर कारखाने, दूध संघ आणि विविध सहकारी संस्थांमध्ये महिला अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या प्रमाणावर कार्यरत आहेत. व्यवस्थापन, वित्तीय शिस्त, ग्राहकाभिमुख सेवा आणि पारदर्शक कारभार याबाबतीत महिलांनी आपली क्षमता प्रभावीपणे सिद्ध केली आहे. आज अनेक सहकारी संस्थांच्या संचालक मंडळावरही महिलांचे प्रतिनिधित्त्व वाढताना दिसत आहे, ही सहकार क्षेत्रासाठी सकारात्मक बाब आहे.

महिलांच्या सहभागामुळे सहकार क्षेत्रात केवळ आर्थिक व्यवहारच नाही तर सामाजिक संवेदनशीलताही वाढली आहे. शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, कुटुंबातील आर्थिक नियोजन आणि समाजातील दुर्बल घटकांना मदत या क्षेत्रांतही महिलांनी सहकाराच्या माध्यमातून उल्लेखनीय काम केले आहे. त्यामुळे सहकार चळवळ अधिक लोकाभिमुख आणि सर्वसमावेशक बनली आहे. आजच्या काळात सहकार क्षेत्रात महिलांच्या नेतृत्त्वाला आणखी बळ देण्याची आवश्यकता आहे. प्रशिक्षण, तांत्रिक ज्ञान, वित्तीय साक्षरता आणि व्यवस्थापन कौशल्य यांचा विकास झाला तर महिलांचा सहभाग अधिक प्रभावी ठरू शकतो. केंद्र आणि राज्य शासनाने सहकारी संस्थांमध्ये महिलांना संधी देणारी धोरणे राबवणे गरजेचे आहे. महाराष्ट्राचे नवीन सहकार धोरण लवकरच येत आहे, त्यादृष्टीने यात महिलांसंबंधीचा सर्वंकष मुद्दा येण्याची आवश्यकता आहे.

सहकार क्षेत्रातील महिलांचे योगदान हे केवळ संस्थांच्या यशापुरते मर्यादित नसून समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाचे मजबूत अधिष्ठान आहे. महिलांच्या सहभागामुळे सहकार चळवळ अधिक सशक्त, संवेदनशील आणि प्रगत होत आहे. भविष्यातही महिलांचे नेतृत्त्व आणि सहभाग हेच सहकार चळवळीच्या प्रगतीचे खरे बळ ठरेल, असा विश्वास वाटतो.

जय सहकार!

**संपादकीय...**

# सहकार तत्त्वावरील 'भारत टॅक्सी' उपक्रमामुळे चालकांना फायदा - केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा

**नवी दिल्ली** – सहकार तत्त्वावरील भारत टॅक्सी या उपक्रमामुळे चालकांना फायदा होणार आहे, असे मत केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांनी सांगितले. या उपक्रमासाठी सहकार क्षेत्रातील अमुल, इफ्को आणि नाबार्ड यांनी पुढाकार घेतला आहे, असे त्यांनी सांगितले.

नवी दिल्ली येथे भारत टॅक्सीच्या लोकार्पणानंतर ते बोलत होते. ते म्हणाले, ही केवळ योजना नसून चालक बंधूभगिनी यांना सन्मानाने सारथी बनविण्याचा उपक्रम आहे. या ठिकाणी चालक केवळ वाहन चालविणारे नसून तेच कंपनीचे मालक आहेत. या उपक्रमाचा येत्या काळात देशभरात विस्तार करण्यात येणार आहे. त्यासाठी टॅक्सी चालकांनी पुढील तीन वर्ष संयम राखणे आवश्यक आहे.

या उपक्रमात चालकच मालक होणार आहेत, असे नमूद करून ते म्हणाले, या उपक्रमात सहभागी होणाऱ्या प्रत्येक सारथीला केवळ ५०० रुपयांचा शेअर घेतल्यास कंपनीतील भागीदारी आणि मालकीचा हक्क




मिळणार आहे. एकूण कमाईपैकी २० टक्के रक्कम भारत टॅक्सीच्या खात्यात जमा करण्यात येणार आहे तर ८० टक्के रक्कम ही थेट सारथीच्या खात्यात जमा होणार आहे. आगामी तीन वर्षांनंतर होणाऱ्या नफ्यातून ८० टक्के रक्कम सारथी यांना देण्यात येणार आहे, असे ते म्हणाले.

# देशात दुग्ध क्रांतीचे नवे पर्व

## 'श्वेत क्रांती २.०' अंतर्गत ७५ हजार नव्या सहकारी संस्थांचे उद्दिष्ट; केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची माहिती



**केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ**

**नवी दिल्ली** – सहकाराच्या माध्यमातून देशात 'श्वेत क्रांती २.०'द्वारे देशातील दुग्ध क्षेत्रात मोठे परिवर्तन घडणार आहे. या योजनेअंतर्गत देशात ७५ हजार नव्या बहुउद्देशीय सहकारी दुग्ध संस्था (एम-पॅक्स) स्थापन करण्यात येणार आहेत; तर महाराष्ट्रात २०२९ पर्यंत जवळपास अडीच हजार नव्या दूध सहकारी समित्या स्थापन करण्याचे उद्दिष्ट आहे, अशी माहिती केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी राज्यसभेत बोलताना सांगितली.

या योजनेचा आराखडा व प्रगती सादर केली ते म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली ही योजना ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देईल. त्यातून रोजगार-व्यवसायाच्या नव्या संधी उपलब्ध होणार असून, शेतकरी व महिला आत्मनिर्भर आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील, असा विश्वास व्यक्त केला. 'श्वेत क्रांती २.०' देशाची दूध उत्पादन क्षमता दररोज ६६० लाख किलोग्रामवरून एक हजार लाख किलोग्रामपर्यंत वाढविण्यावर सक्रिय काम केले जात आहे.

**※ देशात २२ हजार बहुउद्देशीय सहकारी दुग्ध संस्था –**

देशात आतापर्यंत २२ हजार बहुउद्देशीय सहकारी दुग्ध संस्था स्थापन झाल्या आहेत. त्या माध्यमातून येत्या पाच वर्षांत असंघटित क्षेत्रातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना संघटित करून दुधाचा योग्य दर मिळवून देण्याचा प्रयत्न आहे. या योजनेत महिला सक्षमीकरणावर विशेष भर आहे. प्रारूप उपविधींमध्ये बदल करून सहकारी संस्थांच्या निर्णय प्रक्रियेत महिला व अनुसूचित-जाती जमातीच्या घटकांचे प्रतिनिधित्त्व सुनिश्चित करण्यात आले आहे. राज्यात सध्या १२ हजार ६०० दूध सहकारी समित्या कार्यरत आहेत. येत्या चार वर्षांत अडीच हजार नव्या समित्या स्थापन करण्यात येतील. तसेच ४ हजार २०० कार्यरत समित्यांचे सक्षमीकरण केले जाईल. याशिवाय देशातील सर्व राज्यांमध्ये नव्या दूध सहकारी समित्या स्थापन करण्याची कार्यवाही सुरू आहे, अशी माहिती त्यांनी सांगितली.

**※ दूध संस्थांना मिळणार अर्थसाह्य –**

नॅशनल प्रोग्राम फॉर डेअरी डेव्हलपमेंट अंतर्गत नव्या व सध्या कार्यरत असलेल्या सहकारी संस्था व समित्यांना दूध संकलन व परीक्षणासाठी उपयुक्त यंत्रसामग्री व उपकरणे देण्यात येत आहेत. त्यासाठी जवळपास एक लाख ८६ हजार रुपयांचे अर्थसाह्य उपलब्ध करून देण्यात येत आहे भारतीय शेतकऱ्यांच्या कष्टामुळेच भारत जगातील सर्वांत मोठा दूध उत्पादक देश झाला आहे. शेती क्षेत्राच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात (जीडीपी) पशुधनाचा वाटा २५ टक्के असून,'सहकारातून समृद्धी' या संकल्पनेतून दूध उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी सरकार कार्यरत आहे.





# बँकांनी कोअर बँकिंगवर भर द्यावा - केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन

**नवी दिल्ली** – बँकांनी ठेवीबाबतची भूमिका ग्राहकांबरोबर संवाद आणि कर्ज देतानाची सावधगिरी यावर भर द्यावा, असे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी पत्रकारांना सांगितले.

त्यां म्हणाल्या, की बँकांना पुन्हा एकदा मुख्य बँकिंग कार्यावर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. तसेच अतिविशिष्ट विविधीकरण, आक्रमक कर्ज पद्धती आणि वित्तीय उत्पादनांची चुकीची विक्री यांपासून दूर राहणे गरजेचे आहे.

यापुढील काळात कोअर बँकिंगकडे अधिक लक्ष देणे आवश्यक असून चुकीच्या पायंड्यापासून दूर राहणे गरजेचे आहे, अशी सूचना त्यांनी केली आहे.

# सहकाराचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी सहकार चळवळीचे नेतृत्त्व करावे केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचे आवाहन




पुणे – सहकार क्षेत्राचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी आगामी काळात सहकार चळवळीचे नेतृत्त्व करावे, असे आवाहन केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केले आहे. वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्थेच्या कृषी व्यवसाय व्यवस्थापन पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाच्या ३१व्या तुकडीचा वार्षिक पदवी प्रदान कार्यक्रम झाला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी तीन गुणवंत विद्यार्थ्यांना सुवर्णपदक प्रदान करण्यात आले.

देशाची ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी सहकार क्षेत्राची भूमिका महत्वाची आहे असे नमूद करून मोहोळ म्हणाले, सहकारातून समृद्धी या संकल्पनेतर्गत सहकार क्षेत्रात सुधारणा आणि प्रगती होत आहे. सहकार क्षेत्रात क्रांतिकारी बदल होत आहेत. कृषी व्यवसाय नवीन रूपामध्ये येत आहे. सहकारी समित्यांचे जाळे अधिक सक्षम होत आहे. आगामी काळात सहकार क्षेत्रासाठी किमान १७ लाख प्रशिक्षित युवकांची आवश्यकता असणार आहे असे त्यांनी नमूद केले.

ही संस्था गेल्या अनेक वर्षांपासून सहकार क्षेत्रासाठी कार्यक्षम आणि कुशल मनुष्यबळ घडवीत आहे. देशामध्ये सध्या सुमारे साडेआठ लाख सहकारी संस्था कार्यरत आहेत. ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी केंद्र सरकारने संकल्प केला आहे. यासाठी संस्थेने आणि त्याबरोबर विद्यार्थ्यांनी सहयोग द्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

संस्थेचे प्रभारी संचालक मीनू शुक्ला पाठक कार्यक्रम संचालक डॉ. डी. रवी उपस्थित होते. पाठक म्हणाल्या, यशस्वी विद्यार्थ्यांना यापुढील काळात सहकार क्षेत्रातील अनेकविध संस्था, कंपनी यामध्ये काम करता येणे शक्य आहे, या संस्थेतील अभ्यासक्रमाची नक्कीच मदत होणार आहे.

समारंभात एकूण ९३ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. कुलसचिव डॉ. एस. धर्मराज यांनी आभार मानले.

# सहकारी संस्थांचा स्टार्ट अप रचनेत समावेश करण्याचा केंद्राचा निर्णय

**पुणे** – ग्रामीण भागात शेती आणि संलग्न क्षेत्रात त्याचप्रमाणे समुदायरहित उद्योगामध्ये नवोन्मेषाला चालना देण्यासाठी सरकारने सहकारी संस्थांचा समावेश स्टार्टअप रचनेत समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारच्या या निर्णयामुळे सहकारी संस्थांना फायदा होणार आहे.

स्टार्टअप इंडिया कृती आराखड्यात आर्थिक बळ देण्यासाठी केंद्राने स्टार्टअप रचनेत सुधारणा केली आहे. त्यामुळे संशोधनाधारित आणि तंत्रज्ञान केंद्रीत स्टार्टअप्सना दीर्घकालीन भांडवल सहजपणाने उपलब्ध होऊ शकणार आहे. डीप टेक क्षेत्रातील कंपन्यांना यामुळे मोठा दिलासा मिळणार आहे. यासाठीची वार्षिक ऊलाढाल १०० कोटींवरून २०० कोटी करण्यात आली आहे.

याबाबत राज्य सहकारी बँक प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी सांगितले की, सहकार क्षेत्रात युवकांची संख्या कमी जाणवत आहे. ही संख्या भविष्यात वाढावी, यासाठी केंद्र सरकारने काही निर्णय घेतले आहेत. परिणामी सहकार क्षेत्रात युवक मोठ्या संख्येने येतील असा अंदाज आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे सहकार क्षेत्राच्या विस्ताराला आणखी बळ मिळणार आहे.

# सहकारी गृहनिर्माण संस्थावर आकारण्यात येणारा अकृषक (एन ए) कर रद्द

**मुंबई** – राज्यातील सहकारी गृहनिर्माण संस्थावर आकारण्यात येणारा अकृषक एन ए कर रद्द करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. यापुढील काळात कोणत्याही जुन्या अथवा नवीन बांधकामावर या कराची आकारणी केली जाणार नाही. त्याचप्रमाणे आधीची थकबाकी माफ करण्याचे जाहीर करण्यात आले आहे.

राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबाबत माहिती सांगितली. ते म्हणाले, राज्य शासनाने वार्षिक अकृषक कर पूर्णपणे रद्द केला आहे. परिणामी कोणत्याही बांधकामावर हा लावला जाणार नाही. याआधी आकारण्यात आलेला कर हा माफ करण्यात आला आहे. या निर्णयामुळे सहकारी गृहरचना संस्था आणि फ्लॅट धारक यांना दिलासा मिळणार आहे. तसेच मोठ्या क्षेत्रफळाच्या विकासासाठी एक रकमी रक्कम भरण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. यामुळे करप्रणाली अधिक सुलभ होणार आहे.

रूपांतरण कराबाबत शासनाने सुलभ पद्धती तयार केली आहे, अशी माहिती त्यांनी सांगितली. शासनाच्या या नवीन निर्णयामुळे राज्यातील शहरी कार्यरत असणाऱ्या भागात सहकारी तत्त्वावरील गृहरचना संस्थांना दिलासा मिळणार आहे.

# महिलांची सहकार क्षेत्रातील भरीव कामगिरी



**व्यंकटेश कुळकर्णी**
**९४०३० ८०७५१**

सहकाराची भावना आणि स्त्रीमनातील करुणा - एकाच मूल्याची दोन रूपे! महिला आणि सहकार यांचा समान दुवा कोणता, असा प्रश्न पडला तर उत्तर अगदी स्पष्ट आहे - दीन-दुबळ्यांना मदत करण्याची भावना.

सहकार ही एक व्यवस्था आहे; पण तिच्या केंद्रस्थानी असलेली भावना ही स्त्रीच्या स्वभावाशी अगदी समरस आहे.

महिला म्हणजे केवळ एक व्यक्ती नव्हे - महिला म्हणजे जग बदलणाऱ्या सामूहिक शक्तीचे प्रतीक. मार्च महिना उजाडला, की समाजमन नकळत एका सर्जनशील, संवेदनशील आणि परिवर्तनकारी शक्तीकडे वळते, ती म्हणजे स्त्रीशक्ती.

२०व्या शतकातून २१व्या शतकाकडे जाताना महिलेचा प्रवास अबलाकडून सबला असा झाला आहे. ८ मार्च - जागतिक महिला दिन हा केवळ औपचारिक अभिनंदनाचा दिवस नसून, महिलांनी जगभरात घडवून आणलेल्या सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचा आढावा घेण्याची संधी आहे.

विशेषतः सहकार क्षेत्रात, महिला आणि सहकार यांचे नाते हे मुद्दाम घडवलेले नसून, ते स्वभावत: आणि मूल्याधिष्ठित आहे. स्त्रीचा स्वभाव आणि सहकाराचा आत्मा महिलेला निसर्गतः मिळालेले सर्वात मोठे वरदान म्हणजे दीन-दुबळ्या, दुर्बल आणि गरजू व्यक्तीस मदत करण्याची उपजत भावना. सहानुभूती, करुणा आणि मदतीची ओढ तिच्या रक्तातच असते. कोणीतरी मागे पडतो आहे, कोणाला आधाराची गरज आहे, हे तिला न सांगताही जाणवते.




यासोबतच तिच्यातील आणखी एक महत्त्वाचा गुण म्हणजे बचतीची सवय आणि काटकसर. थेंबे थेंबे तळे साचे, ही सहकाराची मूलभूत संकल्पना घरातील स्त्री वर्षानुवर्षे प्रत्यक्षात जगत असते. थोडेथोडे साठवलेले धन, योग्य वेळी घरातील पुरुषाला किंवा कुटुंबाला देणे. आजची बचत उद्याच्या संकटाला प्रतिकार करते. मग सहकार म्हणजे दुसरे काय आहे? आजची बचत, उद्याच्या सुरक्षिततेसाठी! याच भावनेतून सहकार चळवळीची स्थापना झाली असावी.

ज्याची पत नाही त्याची पत निर्माण करणे, दीन-दुर्बलांना आर्थिक व सामाजिक बळ देणे आणि एकत्र येऊन स्वबळावर उभे राहणे. म्हणूनच महिला आणि सहकार यांचा संगम अत्यंत नैसर्गिक वाटतो.

✻ **बहुगुणी स्त्री :** सहकाराची ताकद महिलेला मिळालेली दुसरी महत्त्वाची ईश्वरी देणगी म्हणजे बहुगुणी (Multi-skill) क्षमता. एकाच वेळी अनेक जबाबदाऱ्या सांभाळणे, विविध कामांमध्ये समतोल साधणे आणि तरीही प्रत्येक घटकावर लक्ष ठेवणे, हे तिचे वैशिष्ट्य आहे. घर, कुटुंब, अर्थकारण, समाज आणि व्यवसाय हे सर्व तिच्या विचारविश्वात सतत सुरू असते. हीच क्षमता सहकार संस्थांसाठी अत्यंत आवश्यक असते. कारण सहकार म्हणजे अनेक सदस्य, अनेक गरजा, अनेक अपेक्षा आणि त्यामधील समन्वय!

✻ **अमूल :** महिलांच्या हातातून घडलेली जागतिक सहकारी क्रांती भारताच्या सहकार इतिहासात Amul हे नाव जागतिक पातळीवर आदराने घेतले जाते. गुजरातमध्ये डॉ. व्हर्गीस कुरियन यांच्या नेतृत्वाखाली अमूलची स्थापना झाली, हे सत्य आहे. परंतु अमूलला जगातील सर्वात यशस्वी दुग्ध सहकारी संस्था बनवणाऱ्या लाखो ग्रामीण महिला

हा त्याचा खरा कणा आहे. घराघरातून दूध गोळा करणे, सकाळ-संध्याकाळ दूध केंद्रावर पोहोचवणे, सहकारी सभासद म्हणून शिस्त पाळणे, हे काम महिलांनी सातत्याने केले. प्रत्येक महिला आपल्या गाईच्या दुधाची मालक होती. निर्णय प्रक्रियेचा सक्रिय भाग होती. गावागावातून जमा झालेले दूध अमूल डेअरीपर्यंत पोहोचले आणि आज त्यापासून तयार होणारी उत्पादने जगभर पोहोचत आहेत. अमूल म्हणजे महिला-सहकाराची जागतिक ओळख.

✻ **लिज्जत पापड :** स्वयंपूर्णतेची चव! Shri Mahila Griha Udyog Lijjat Papad हा १५ मार्च १९५९ रोजी मुंबईत सात गुजराती महिलांनी फक्त ८० उधारीवर सुरू केलेला एक अद्वितीय महिला-सहकारी उद्योग आहे. आज हा उद्योग १५००-१६०० कोटी रुपयांची उलाढाल करतो आणि ४५,००० हून अधिक महिलांना रोजगार देतो. समता, शिस्त आणि सहकार हे लिज्जतचे मूलतत्त्व आहे. स्वयं-सहायता गट आणि 'लखपती दीदी' भारतामध्ये स्वयं-सहायता बचत गट (SHG) ही महिलांनी उभारलेली सर्वात मोठी सहकारी चळवळ आहे. बचत, अंतर्गत कर्ज, लघुउद्योग, स्वावलंबन आणि सामाजिक परिवर्तन - या सर्व क्षेत्रांत महिलांनी गावपातळीवर क्रांती घडवली. यातून पुढे आल्या.

✻ **माणदेशी महिला बँक :** महिलांच्या विश्वासावर उभी राहिलेली सहकारी ताकद चेतना सिन्हा या बँकेच्या संस्थापक. महिलांना योग्य व्यासपीठ, विश्वास आणि नेतृत्व मिळाले, तर त्या संपूर्ण समाजाचा आर्थिक चेहरा बदलतात. जिद्द, प्रामाणिकपणा आणि कष्ट करण्याची तयारी तिच्यात असते. आज माणदेशी महिला बँक व माणदेशी फाउंडेशनच्या माध्यमातून लाखो ग्रामीण भागातील महिला सक्षम झाल्या, चेतना सिन्हा मॅडम यांचे कार्य जागतिक पातळीवरही गौरवले गेले. फोर्ब्स, TIME यांसारख्या व्यासपीठांवर त्यांना महिला सक्षमीकरणाचे जागतिक नेतृत्व म्हणून मान्यता मिळाली आहे. लखपती दीदी आणि सरकारचा संकल्प लाखो लखपती दीदी घडवणे.

✻ **महिलांचे जागतिक नेतृत्व** - Elinor Ostrom - सहकारातून सामुहिक संसाधने प्रभावीपणे व्यवस्थापित होऊ शकतात, हे सिद्ध करून अर्थशास्त्रातील नोबेल पुरस्कार मिळवणाऱ्या विदुषी. Wangari Maathai - महिलांच्या नेतृत्त्वाखाली पर्यावरण संरक्षणाला सामाजिक चळवळीचे रूप देणाऱ्या नेत्या.

- Ela Bhatt – SEWA **या महिला**-नेतृत्त्वाखालील सहकारी संस्थेच्या संस्थापक.

या सर्व उदाहरणांत एकच धागा आहे. महिला निर्णय घेताना नफा, समाज आणि पुढील पिढी या तिन्हींचा समतोल साधते. आधुनिक भारतातील उदाहरण आज आर्थिक क्षेत्रात महिलांची क्षमता संपूर्ण देश अनुभवत आहे. आपल्या केंद्रीय अर्थमंत्री Nirmala Sitharaman यांचे नेतृत्व हे त्याचे जिवंत उदाहरण आहे.

महिलांना सर्व स्तरांवर ५०% आरक्षण देण्याचा निर्णय हा २०४७ च्या विकसित भारत संकल्पनेस वेग देणारा ठरेल.

- **निष्कर्ष : महिला, सहकाराची आत्मा महिला ही सहकारात केवळ सहभागी नाही - ती सहकाराची आत्मा आहे.** दुबळ्याला आधार देणे, अनेकांना एकत्र बांधणे, आणि सर्वांसाठी विकासाचा मार्ग खुला करणे, हे तिच्या स्वभावातच आहे. घरातील एक स्त्री सशक्त झाली, तर कुटुंब प्रगती करते. महिलांचा समूह सशक्त झाला, तर सहकार बळकट होतो. सहकार बळकट झाला, तर समाज समृद्ध होतो आणि देश आत्मनिर्भर बनतो.

जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**- व्यंकटेश कुळकर्णी, प्रशिक्षण केंद्र प्रमुख.**
**सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्यादित पुणे.**

*****

# पतसंस्थांच्या वाटचालीत महिलांचे योगदान



काका कोयटे
९३७१३ ३३५५५

महाराष्ट्रातील सहकारी पतसंस्था चळवळ ही राज्याच्या सामाजिक, आर्थिक आणि संघटनात्मक विकासातील एक प्रभावी आणि लोकाभिमुख चळवळ म्हणून ओळखली जाते. ग्रामीण तसेच शहरी भागातील सर्वसामान्य नागरिकांना विश्वासार्ह आर्थिक पर्याय उपलब्ध करून देत या चळवळीने लाखो कुटुंबांच्या जीवनात स्थैर्य निर्माण केले आहे. खासगी सावकारांच्या जाचातून मुक्तता, लघुउद्योजकांना भांडवल, शेतकरी व कामगार वर्गाला तातडीची आर्थिक मदत आणि मध्यमवर्गीय कुटुंबांच्या गरजांना प्रतिसाद देणे या माध्यमातून सहकारी पतसंस्थांनी समाजात आपली वेगळी ओळख निर्माण केली. या प्रवासात महिलांचे योगदान अत्यंत मोलाचे आणि परिवर्तनकारी ठरले आहे.

सुरुवातीच्या काळात महिलांचा सहभाग प्रामुख्याने बचत गटांपुरता मर्यादित होता. स्वयंप्रेरणेने स्थापन झालेल्या महिला बचत गटांनी नियमित बचत, परस्पर कर्जवाटप आणि आर्थिक शिस्त यांची सवय रुजवली. या प्रक्रियेमुळे महिलांमध्ये आर्थिक व्यवहारांविषयी आत्मविश्वास निर्माण झाला. लहान रकमेपासून सुरू झालेली बचत पुढे पतसंस्थांच्या सभासदत्वापर्यंत पोहोचली. अनेक महिलांनी केवळ सभासद म्हणूनच नव्हे तर संचालक मंडळाच्या सदस्य, सचिव, उपाध्यक्ष आणि अध्यक्ष म्हणून नेतृत्व स्वीकारले. हा प्रवास महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा आणि सामाजिक उन्नतीचा महत्त्वाचा टप्पा ठरला.

**※ कार्यपद्धतीमध्ये सकारात्मक बदल –**

महिलांच्या सहभागामुळे पतसंस्थांच्या कार्यपद्धतीत सकारात्मक बदल झाले. निर्णयप्रक्रियेत पारदर्शकता, शिस्त आणि सामाजिक संवेदनशीलता वाढली. कर्जवाटप करताना गरजू घटकांना प्राधान्य देणे, परतफेडीबाबत नियमित पाठपुरावा करणे आणि आर्थिक शिस्त पाळणे या बाबींमध्ये महिलांनी जबाबदारीची जाणीव दाखवली. अनेक ठिकाणी महिलांच्या नेतृत्वामुळे थकबाकीचे प्रमाण नियंत्रित राहिले आणि संस्थांची पत अधिक मजबूत झाली. बचतीची सवय आणि नियोजनबद्ध खर्च यांचा संदेश महिलांनी समाजात प्रभावीपणे पोहोचवला.

**※ स्वयंरोजगाराच्या विविध संधी उपलब्ध –**

पतसंस्थांमार्फत महिलांना स्वयंरोजगाराच्या विविध संधी उपलब्ध झाल्या. घरगुती उद्योग, शिवणकाम, अन्नप्रक्रिया हस्तकला, किरकोळ व्यवसाय, शेतीपूरक उपक्रम यांसाठी पतसंस्थांकडून कर्ज घेऊन अनेक महिलांनी स्वतःचा व्यवसाय उभा केला. आर्थिक स्वावलंबनामुळे त्यांच्या कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढला. मुलांच्या शिक्षणासाठी, आरोग्यासाठी आणि घराच्या उन्नतीसाठी त्यांनी नियोजनबद्ध आर्थिक व्यवस्थापन केले. अशा प्रकारे पतसंस्थांमुळे महिलांचे सक्षमीकरण केवळ आर्थिक पातळीवर मर्यादित न राहता सामाजिक आणि वैचारिक स्तरावरही झाले.

**※ विविध उपक्रमांचे आयोजन –**

राज्यस्तरावर महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनने महिलांच्या सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रम राबवले आहेत. सहकारी पतसंस्था चळवळीतील महिलांच्या नेतृत्व गुणांना वाव मिळावा यासाठी सहकार सम्राज्ञी ही राज्यस्तरीय स्पर्धा, प्रशिक्षण शिबिरे, कार्यशाळा आणि मार्गदर्शन सत्रांच्या माध्यमातून महिलांना आर्थिक व्यवस्थापन, लेखापरीक्षण, कायदेशीर तरतुदी आणि संस्थात्मक प्रशासन यांचे ज्ञान दिले जाते. या प्रशिक्षणामुळे महिला पदाधिकारी अधिक आत्मविश्वासाने आणि सक्षमपणे जबाबदाऱ्या पार पाडू लागल्या आहेत. फेडरेशनच्या मार्गदर्शनामुळे महिलांना संघटनात्मक बळ मिळाले आणि राज्यभरातील पतसंस्थांमध्ये महिलांचे जाळे अधिक मजबूत झाले.

**※ डिजिटल युगात महिलांचा सहभाग अधिक व्यापक –**

डिजिटल युगात महिलांचा सहभाग अधिक व्यापक झाला आहे. कोअर बँकिंग प्रणाली, ऑनलाइन व्यवहार, मोबाइल बँकिंग आणि यूपीआय सुविधांचा वापर करण्यामध्ये महिलांनी पुढाकार घेतला आहे. सायबर सुरक्षा आणि डिजिटल साक्षरतेबाबत जागरूकता वाढवण्यातही महिला पदाधिकारी सक्रिय आहेत. ग्रामीण भागातील महिलांनी तंत्रज्ञान स्वीकारून पतसंस्थांना आधुनिकतेकडे नेले आहे. डिजिटल व्यवहारांमुळे पारदर्शकता वाढली, वेळेची बचत झाली आणि व्यवहार अधिक सुरक्षित झाले. त्यामुळे सहकारी पतसंस्था आधुनिक स्पर्धात्मक वातावरणात टिकून राहण्यास सक्षम ठरत आहेत.

महिलांच्या नेतृत्वामुळे पतसंस्थांच्या सामाजिक उपक्रमांनाही चालना मिळाली आहे. शैक्षणिक मदत, आरोग्य शिबिरे, महिला सक्षमीकरण कार्यक्रम, पर्यावरण संवर्धन उपक्रम, आपत्तीग्रस्तांना साहाय्य अशा विविध सामाजिक कार्यांमध्ये महिलांनी पुढाकार घेतला. स्थानिक विकासकामांमध्ये निधी उपलब्ध करून देणे आणि समाजात ऐक्य निर्माण करणे या कार्यात महिलांची भूमिका महत्त्वाची ठरली आहे. त्यामुळे सहकारी पतसंस्था या केवळ आर्थिक संस्था न राहता सामाजिक परिवर्तनाचे माध्यम बनल्या आहेत.




**※ महिलांचे संयमी आणि नियोजनबद्ध नेतृत्व –**

अर्थव्यवस्थेतील बदल, वाढती स्पर्धा आणि नियामक धोरणे ही पतसंस्थांसमोरची आव्हाने आहेत. अशा परिस्थितीत महिलांचे संयमी आणि नियोजनबद्ध नेतृत्व संस्थांना स्थैर्य देते. कर्जवसुलीतील अडचणी, तांत्रिक गुंतवणूक आणि नियमांचे पालन या बाबींमध्ये महिलांनी जबाबदारीची भूमिका घेतली आहे. सामूहिक चर्चा, अनुभवांची देवाणघेवाण आणि संघटनात्मक सहकार्य यांच्या माध्यमातून आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता वाढली आहे.

**※ महिलांचा सहभाग अधिक वाढवणे आवश्यक –**

भविष्यात सहकारी पतसंस्थांच्या वाटचालीत महिलांचा सहभाग अधिक वाढवणे आवश्यक आहे. तरुण महिलांना नेतृत्वाच्या संधी देणे, डिजिटल आणि आर्थिक साक्षरतेचे प्रशिक्षण देणे, ग्रामीण भागातील महिलांना विशेष प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे. महिलांच्या नेतृत्वामुळे संस्थांमध्ये पारदर्शकता, शिस्त आणि सामाजिक बांधिलकी अधिक दृढ राहील. संघटित प्रयत्न आणि सक्षम मार्गदर्शन यांच्या जोरावर महिलांचे योगदान सहकार चळवळीला नवी दिशा देईल.

एकूणच, महाराष्ट्रातील सहकारी पतसंस्था चळवळीच्या यशामध्ये महिलांचे योगदान हे अत्यंत महत्त्वाचे आणि प्रेरणादायी आहे. बचत गटांपासून ते राज्यस्तरीय नेतृत्वापर्यंत महिलांनी केलेली वाटचाल ही सक्षमीकरणाची प्रभावी कहाणी आहे. आर्थिक स्वावलंबन, सामाजिक जाणीव आणि आधुनिकतेचा स्वीकार या गुणांच्या आधारे महिलांनी पतसंस्थांना अधिक सक्षम, पारदर्शक आणि लोकाभिमुख बनवले आहे. भविष्यातही महिलांच्या सक्रिय सहभागामुळे सहकार चळवळ अधिक व्यापक, परिणामकारक आणि समाजाभिमुख बनेल, यात कोणतीही शंका नाही.

**– ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे**
**अध्यक्ष – महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन**
**चेअरमन – समता नागरी सहकारी पतसंस्था कोपरगाव**
**खजिनदार – असोसिएशन ऑफ एशियन कॉन्फडरेशन ऑफ क्रेडिट युनियन (क्यु)**

*****

# महिलांचा सहकार आणि विविध क्षेत्रातील महत्त्वपूर्ण सहभाग

आपल्या देशात एक काळ असा होता, जेव्हा महिलांचे कार्यक्षेत्र फक्त आपल्या घरापर्यंत किंवा संसारापुरते मर्यादित होतं. त्या काळात महिलांचं शिक्षणाचं प्रमाण अत्यंत अल्प असं होतं. आज ज्या ७५ ते ८५ वर्ष वयाच्या स्त्रिया आहेत त्यातील बऱ्याच स्त्रिया चौथी पास किंवा जेमतेम दहावीपर्यंत शिक्षण झालेल्या आढळतील. काळ पुढे सरकत गेला. मुलींचं शिक्षणाचं प्रमाण वाढत गेलं. महिलांच्या शिक्षणाचं पर्व सुरु झालेल्या कालखंडात, आवश्यक तेवढं शिक्षण घेऊन महिला सुरुवातीला शिक्षिका, बँकेत, पोस्ट खात्यात क्लर्क वगैरे सारख्या नोकऱ्या करत आपल्या संसाराला आर्थिक हातभार लावायला लागल्या. नंतरच्या काळात अभ्यासात हुशार असणाऱ्या मुली व्यावसायिक महाविद्यालयात, विशेषतः वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेऊन डॉक्टर होण्यात आपली रुची दाखवत होत्या. मुली हुशार असल्या, तरी अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेऊन इंजिनियर होण्याकडे त्यांचा कल नव्हता. काळ अजून पुढे सरकत गेला आणि आज आपण पाहतो मुली सर्वसाधारण आणि व्यावसायिक महाविद्यालयात शिक्षण घेऊन आपलं करियर घडवत असताना बघतो. पोलीस खात्यात, लष्करात, भारतीय प्रशासन सेवेत विविध उच्च पदांवर अतिशय सक्षमतेने काम करताना दिसतात. खासगी क्षेत्रात देखील नोकरी करण्यात महिला मागे नाहीत. आजकाल बड्या खासगी कंपन्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर महिला कार्यरत आहेत. आयटी आणि कृत्रिम बुद्धिमत्ताच्या क्षेत्रात महिला आपला ठसा उमटवत आहेत.

फक्त त्या महिलेलाच नव्हे तर तिच्या भावाला, पतीला, वडिलांना, सासऱ्यांना देखील अभिमान वाटावा अशी त्यांची कामगिरी आहे. असं असलं तरी भारतात नोकरीच्या तुलनेत व्यवसाय किंवा स्वयंरोजगार (self employment) करणाऱ्या महिलाचं प्रमाण नक्कीच कमी आहे. गेल्या काही वर्षांत या चित्रामध्ये वेगाने बदल होत आहे. भारतात साधारणतः २५ % उद्योग महिलांच्या मालकीचे आहेत. त्यामागे काही सामाजिक आणि आर्थिक कारणे आहेत. सगळ्यात महत्त्वाचं कारण म्हणजे घर आणि व्यवसाय सांभाळण्याचा समतोल राखण्याचं फार मोठं आव्हान महिलांसमोर असतं, हे वास्तव नाकारता येत नाही. बऱ्याचदा मालमत्ता महिलांच्या नांवावर नसल्यामुळे व्यवसायासाठी बँकांकडून कर्ज घेण्याच्या कागदाची पूर्तता करण्यात अडचणी निर्माण होतात. महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी म्हणून सरकारने 'लखपती दीदी'सारख्या योजना सुरू केल्या आहेत हे नक्की, पण त्या योजना लाभार्थीपर्यंत पोचण्यासाठीची यंत्रणा मन लावून करत नसेल अथवा काम करताना मंदावली, तर अपेक्षित 'लख'लाभ होणार नाही.




या सर्व पार्श्वभूमीवर महिलांच्या सहकार क्षेत्रातील सहभागाचा विचार करणं गरजेचं आहे. वास्तविक पाहता, सहकार क्षेत्र म्हणजे लोकांनी स्वेच्छेने एकत्र येऊन परस्पर सहकाराच्या तत्त्वावर स्थापन केलेल्या संस्था किंवा संघटनांचं क्षेत्र. या संस्थांचा मुख्य उद्देश नफा कमावणे नसून सदस्यांचे आर्थिक, सामाजिक व व्यावसायिक हित साधणे हा असतो. 'एकासाठी एक, सर्वांसाठी सर्व' हे सहकाराचे मूलतत्त्व. सहकार क्षेत्रात असलेल्या संस्थांचं वैशिष्ट्य म्हणजे याचा प्रत्येक सदस्य मालक आणि लाभार्थी दोन्ही असतो. या संस्थांची प्रक्रिया लोकशाही पद्धतीने होत असल्यामुळे सर्वांना समान संधी असते. सहकार क्षेत्रातील प्रमुख उदाहरणे म्हणजे सहकारी बँका, सहकारी साखर कारखाने, दूध संघ (दुग्ध सहकारी संस्था), पतसंस्था, गृहनिर्माण सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक सहकारी संस्था वगैरे. सहकार क्षेत्रात नफ्यासोबत स्थानिक पातळीवरील रोजगारनिर्मितीला शेतकरी, कामगार, सामान्य नागरिक यांच्या सशक्तीकरणाला प्राधान्य दिलं जातं. म्हणजेच, सहकार क्षेत्र हे 'लोकांनी लोकांसाठी चालवलेले अर्थकारण' असं म्हणता येईल.



**सीमा अतनूरकर**
**९८२३७ ९९९७०**

सहकार क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढवायचा झाल्यास वरील सर्व सहकार क्षेत्राच्या मूलभूत गोष्टी त्यांना समजावून सांगाव्या लागतील. कारण सहकारी चळवळींमध्ये महिलांचा सहभाग केवळ आर्थिक दृष्टिकोनातूनच नाही, तर सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय दृष्टिकोनातून देखील महत्त्वाचा आहे. आजपर्यंत या ना त्या कारणांसाठी पात्रता असून देखील ज्या महिलांना केवळ गृहिणी म्हणून राहावं लागलं त्या जेव्हा सहकार क्षेत्राशी जोडल्या गेल्या, तेव्हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील प्रशासकीय आणि अंगी असलेल्या नेतृत्व गुणांना वाव मिळालेला मी बघितला आहे. या गुणांच्या जोडीला महिलांच्या अंगभूत असलेल्या सरळ भावनेने काम करण्याच्या वृत्तीमुळे प्रसंगी त्या पुरुषांपेक्षा काही संस्थांमध्ये काकणभर सरस ठरताना दिसत आहेत.

महिला सहकार क्षेत्रात येऊन समाजात सकारात्मक बदल घडवू शकतात. महिलांनी विविध सामाजिक उपक्रमांसाठी सहकार संस्था वापरली आहे. शिक्षण, आरोग्य, पर्यावरणीय जागरूकता या विषयांवर महिलांनी प्रभावी काम केलं आहे.

सहकारी संस्थांमध्ये महिलांना संधी दिल्याने सामाजिक न्याय आणि समानतेला चालना मिळते.

ग्रामीण भागातील महिलांना सहकार क्षेत्राच्या माध्यमातून आत्मनिर्भर बनवण्याच्या अनेक संधी मिळाल्या आहेत. महिलांनी आपल्या कृतीतून, सहकारी संस्थांच्या माध्यमातून, अनेक समृद्ध समुदाय निर्माण केले आहेत. महिला बचत गट यांसारख्या उपक्रमांच्या माध्यमातून आर्थिक समावेशासाठी महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली आहे. महिलांनी आपली आर्थिक क्षमता वाढवून कर्ज घेतलं आणि ते त्यांच्याकडे जाऊन आपल्या कुटुंबासाठी, घरासाठी, व्यवसायासाठी वापरलं.

सहकार क्षेत्रात महिलांचा सहभाग केवळ त्यांच्या स्वतःच्या आयुष्याला सुधारण्यास कारणीभूत ठरत नाही, तर तो समाजाच्या समग्र विकासासाठीही महत्त्वाचा आहे.

महिलांचं आर्थिक सक्षमीकरण, आर्थिक क्षेत्रातील सजगता आणि सक्रियता सर्व काही तिच्यासाठी महत्त्वाचं आहे. तिच्या कानावर इनकम टॅक्स, जीएसटी सारखे शब्द पडतात पण त्याचा नेमका अर्थ माहिती नसतो. कमी कालावधीसाठीची गुंतवणूक, जास्त कालावधीसाठीची गुंतवणूक, शेअर मार्केट या आर्थिक व्यवहाराशी संबंधित पारिभाषिक शब्दांची केवळ माहिती असून चालणार नाही. महिलांना आर्थिक जगात सक्रिय करावयाचे असल्यास त्यांना यासंबंधी अधिक माहिती देण्याचे प्रशिक्षण देण्याचं काम सहकार भारती सारख्या संस्था करत आहेत.

एखाद्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती खूप चांगली असताना, घरातील बाईने पैसे कमावून आणण्याची तशी गरज नसताना देखील जर संधी असेल, तर तिने तो कमावला पाहिजे असं मला वाटतं. कारण 'मी देखील चार पैसे कमावून आणू शकते.' या एका गोष्टीने फक्त संसाराला हातभार लागेल, एवढं तर होईल पण ते फार महत्त्वाचं नाही. यापेक्षा अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिचा स्वतःचा जीवन जगण्याचा आत्मविश्वास वाढेल. अपत्याच्या नजरेत तिच्याबद्दलचा आदर वाढेल. नाहीतरी अनेक वर्षांपासून परस्वाधीन होऊन जगण्याच्या यातना तर ती भोगतच होती.

**– सीमा अतनूरकर,**
**अध्यक्षा, दि भाग्यलक्ष्मी महिला सहकारी बँक लि. नांदेड.**

*****

# विविध क्षेत्रात महिलांची देदिप्यमान कामगिरी



**सुहास पटवर्धन**
**९९२१२ २९६४९**

भारतातील सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांची संख्या लक्षणीय आहे. महिला कुठल्याही बाबतीत कमी नाहीत हे त्यांनी सिद्ध केलं आहे. दुग्ध संस्था, पतसंस्था, बँका, बचत गट इत्यादींमध्ये महिलांचे प्रमाण जास्त आहे. भारतात सुमारे २५,००० हून अधिक नोंदणीकृत महिला सहकारी संस्था आहेत. महिला सहकारी संस्थांमुळे महिलांचे आणि पर्यायाने त्यांच्या कुटुंबाचे उत्पन्न वाढते. त्याचप्रमाणे बचतीचे प्रमाण वाढते. महिलांनी अनेक ठिकाणी त्यांचा कर्तृत्वाचा ठसा उमटवलेला आहे. ग्रामीण भागातील दूध सहकारी संस्थांमध्ये महिलांचा मोठा सहभाग आहे. त्याचप्रमाणे लघु उद्योग, कुटीर उद्योग, बचत गट यांमध्ये महिला आघाडीवर आहेत. केंद्र सरकार त्याचप्रमाणे सर्व राज्य सरकार महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी अनेक योजना राबवीत असतात.




९७ व्या घटना दुरुस्तीनुसार महिलांसाठी २ जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत. राष्ट्रीय सहकार विकास महामंडळ हे वैज्ञानिक महामंडळ स्थापन करून महिलांसाठी त्यांच्या सामाजिक, आर्थिक वाढीसाठी महत्त्वाची भूमिका बजावत आहे. आज गृहनिर्माण संस्था व बँका यामध्ये काम करणाऱ्या महिला अनेक वर्ष काम करत आहेत. मुंबई हाउसिंग फेडरेशनच्या ज्या संस्थेला ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत, अशा गृहनिर्माण संस्थेचे अनेक वर्षे श्रीमती छायाताई आजगावकर मॅडम या नेतृत्व करत होत्या. पुणे जिल्हा महासंघाच्या संचालक मंडळात आणि महाराष्ट्र राज्य महासंघ मंडळात श्रीमती मनीषा कोष्टी व ॲड मृद्गंधा जोशी, श्रीमती प्रीती शिरोडे, स्नेहल देवाणावर गेली अनेक वर्षे काम करत आहेत. अशा अनेक सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत जिथे सर्व संचालकपदी महिला आहेत. पुण्यातली भगिनी निवेदिता बँक ही महिलांनी स्थापन केलेली आहे. या बँकेत संपूर्ण महिला मंडळ कार्यरत आहे. त्याचप्रमाणे आपण बघितलं तर महिला फार मोठ्या प्रमाणावर काम करताहेत आणि त्यामध्ये नॅशनल को ऑपरेटिव्ह युनियन ऑफ इंडिया (NCUI) नवी दिल्ली येथे श्रीमती सावित्री सिंह, श्रीमती संध्या कपूर, श्रीमती दीप्ती यादव, श्रीमती श्रुती कुलकर्णी या कार्यरत आहेत आणि पुण्यात तसेच महाराष्ट्रात महिला न्यायाधीशांचे प्रमाण जास्त आहे.

**✻ सहकार खात्यातील विविध पदांवर महिला कार्यरत –**

महाराष्ट्रातील सहकार खात्यात अनेक सक्षम महिला अधिकारी विविध स्तरांवर काम करीत आहेत. उदा. उपनिबंधक सहकारी संस्था, जिल्हा उपाधिबंधक, विभागीय आयुक्त या पदावर सहकार खात्यात अनेक महिला कार्यरत आहेत. श्रीमती डॉ. ज्योती लाटकर, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, यांच्या अध्यक्षतेखाली अपार्टमेंट कायदा सुधारणा करण्यासाठी समिती नेमण्यात आली आहे. त्या सहकार अपर निबंधक महाराष्ट्र राज्य, म्हणून निवृत्त झाल्या आहेत. त्याचप्रमाणे सध्या श्रीमती संगीता डोंगरे, विभागीय उपनिबंधक म्हणून काम करीत आहेत. श्रीमती स्नेहा जोशी, श्रीमती नीलम पिंगळे, श्रीमती शीतल पाटील, श्रीमती उज्ज्वला माळशिखरे, श्रीमती शिल्पा कडू इ. महिला अधिकारी उपनिबंधक, जिल्हा उपनिबंधक अशा सहकार क्षेत्रात विविध पदांवर कार्यरत आहेत.

**✻ आर्थिक सबलीकरणाचा यशस्वी प्रयत्न –**

महाराष्ट्रात अनेक मल्टीस्टेट को-ऑप बँक कार्यरत आहेत. त्यामध्ये सारस्वत सहकारी बँकेच्या व्यवस्थापकीय संचालिका श्रीमती आरती पाटील, कॉसमॉस सहकारी बँकेच्या व्यवस्थापकीय संचालिका श्रीमती अपेक्षिता ठिपसे काम करीत आहेत. वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध संस्थान – श्रीमती हेमा यादव या संचालिका म्हणून काम करीत होत्या आणि सध्या प्राध्यापिका श्रीमती विजयश्री भगवती काम करीत आहेत. तसेच डॉ. विखे पाटील सहकारी व्यवस्थापन या सहकारी प्रशिक्षण संस्थेत अनेक महिला काम करीत आहेत.

**✻ महिला बचत गटांना प्राधान्य –**

संयुक्त राष्ट्राने मागील वर्ष म्हणजे २०२५ हे आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष (International Cooperative Year) केलं होतं आणि यात महिला आणि तरुणांना सहभागासाठी केंद्रित केलं होतं. सहकाराद्वारे महिलांचे आर्थिक सबलीकरण, महिलांचा आर्थिक त्यांचा स्तर वाढवण्यासाठी बचत गटांचा विकास आणि तरुणांचा वेगवेगळ्या नवीन स्टार्टअपद्वारे कायमस्वरूपी विकास साधावा, यासाठी सहकाराने एक चांगलं जग बनवता येतं (Cooperative Build - Better World) हे घोषवाक्य घेतलं होते. त्यात महिला सक्षमीकरण आणि लोकांसाठी अनेक उपक्रम हाती घेतले होते. त्यात अर्थातच महाराष्ट्र राज्य महासंघाची महत्त्वाची भूमिका होती आणि सहकारातल्या मूल्यांना वृद्धिंगत करण्यासाठी वर्षभर अनेक उपक्रम, मेळावे, संमेलन घेतली आणि यात महिलांचा सहभाग कसा वाढवता येईल यासाठी प्रयत्न केला.

**✻ विविध उपक्रमाय सहभाग वाढावा –**

८ मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो. फक्त एकच दिवस महिला दिन म्हणून साजरा न करता वेगवेगळ्या उपक्रमांत महिलांना सहभागी करून घेणे, त्यांना संधी देणे, त्यांचं कौशल्य वाढवणे यासाठी सगळे लोक, सगळे यंत्रणा प्रयत्न करत असतात.

अनेक संस्थांनी शिक्षण, आरोग्य, स्त्री सक्षमीकरण, सामाजिक ज्ञान महिलांना उपलब्ध करून दिल्यामुळे खूप चांगली संधी मिळत आहे.

पूर्वी फक्त बचत गटामध्ये महिलांचा सहभाग जास्त होता पण आता त्याचा विस्तार होऊन प्रभावशाली महिला पुढे येत आहेत. भविष्यात त्यांना खूप संधी आहेत. स्त्री चळवळीची ५० वर्षे पूर्ण झाली आहेत. यापुढे आता AI, Digital यामुळे घरबसल्या गोष्टी उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

**– सुहास पटवर्धन**
**अध्यक्ष, राज्य गृहनिर्माण सहकारी पतसंस्था**

✻✻✻✻✻

# महिला बचत गट - उक्तीतून कृतीकडे!



**डॉ. आरती हुजुरबाजार**
**७७९८५ ५६६५६**

सर्व कर्तृत्ववान महिलांना जागतिक महिला दिनाच्या खूप खूप शुभेच्छा! आजचा दिवस संघर्षाचा आणि यशाचा गौरव करण्याचा दिवस आहे. ‘बचत गट’ ही केवळ पैसे साठवण्याची जागा नसून, ते स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्याचे आणि आत्मविश्वासाचे व्यासपीठ आहे. जळगाव जनता सहकारी बँकेची संचालिका या नात्याने तुमच्याशी संवाद साधताना मला आनंद होत आहे. या पदाकडे केवळ एक अधिकार म्हणून नाही, तर तुमच्यातीलच एक सहकारी आणि या प्रवासातील सोबती म्हणून पाहते.

बँकेने आजवर अनेक चढ-उतार अनुभवले आहेत. आव्हाने आली पण प्रत्येक अनुभवाने आपल्याला अधिक प्रगल्भ केले. आपली पाळेमुळे अधिक घट्ट केली. हा प्रवास केवळ आकड्यांचा नसून जपलेल्या विश्वासाचा आणि मेहनतीचा आहे.

**❊ यशस्वी प्रवासासाठी, सहकार्यासाठी ऋणी आहे**




आज केवळ संवादच नाही, तर मनापासून हितगुज करायचे आहे. अनेक वर्षांच्या अनुभवातून आणि जवळून केलेल्या निरीक्षणातून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली, ती म्हणजे महिलांकडे उपजतच उत्तम व्यवस्थापन कौशल्य असते. मर्यादित साधनसामग्री आणि कमीत कमी आर्थिक उपलब्धतेमध्ये घराचे सुयोग्य नियोजन करण्याची कला स्त्रीला निसर्गत:च साध्य असते. खरे सक्षमीकरण तेव्हाच पूर्ण होते, जेव्हा स्त्रीच्या हातात आर्थिक निर्णय घेण्याची सत्ता येते.

जेव्हा एखादी भगिनी आत्मविश्वासाने बँकेचा उंबरठा ओलांडते आणि स्वत:चे आर्थिक व्यवहार स्वावलंबनाने हाताळते, तेव्हा ती खऱ्या अर्थाने सक्षम झालेली असते. बँकेसाठी ‘महिला सक्षमीकरण’ हा केवळ कागदावरचा शब्द किंवा एखादी औपचारिक घोषणा नाही, तर तो ध्यास आहे. जेव्हा एखादी स्त्री आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होते, तेव्हा केवळ ती एकटीच प्रगत होत नाही, तर तिचे संपूर्ण कुटुंब सक्षम होते. महिलांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केवळ आर्थिक मदतीचे उद्दिष्ट ठेवले नाही, तर त्यांना निर्णयप्रक्रियेत सक्रिय सहभागी करून घेण्याचा ठाम निर्धार केला. याच विचारातून बँकेच्या बचत गटांच्या कार्याचा यशस्वी प्रवास सुरू झाला. हा प्रवास केवळ पैशांच्या देवाणघेवाणीचा नसून, तो प्रत्येक महिलेच्या आत्मसन्मानाचा आणि स्वाभिमानाचा आहे.

*हातात हात घेऊन उभ्या राहिल्या सख्या,*
*बचतीच्या छोट्या रकमेने लिहिल्या नव्या दिशा ।*

कोणत्याही भव्य वास्तूचे अस्तित्व तिच्या भक्कम पायावर आधारलेले असते, अगदी तसेच बचत गटांचेही आहे. आर्थिक शिस्त आणि पारदर्शकतेच्या बळावर हा पाया इतका मजबूत केला आहे, की त्यावर हजारो कुटुंबांच्या प्रगतीची इमारत डौलाने उभी आहे. ‘थेंबे थेंबे तळे साचे’ या उक्तीप्रमाणे ही छोटीशी बचत एका विशाल आर्थिक क्रांतीचे प्रतीक बनली आहे.

सुरुवातीच्या काळात बचत गटांची पायाभरणी करताना नियमित बचत आणि व्यवहारांतील स्पष्टता यावर विशेष भर दिला. त्याचे मधुर फळ म्हणून अनेक गट पूर्णपणे स्वावलंबी झाले आहेत. मात्र, केवळ कर्ज घेणे आणि त्याची परतफेड करणे म्हणजे विकास नव्हे; तर महिलांना व्यवसायाभिमुख आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देऊन ‘बचत गट ते उद्योगिनी’ हा प्रवास सुखकर करणे, हे मुख्य उद्दिष्ट आहे. बँकेच्या विविध योजनांच्या माध्यमातून या गटांना केवळ आर्थिक पाठबळच नाही, तर प्रगतीसाठी आवश्यक प्रोत्साहनही देत आहोत. ज्या भगिनी कधी काळी बँकेची पायरी चढण्यास कचरत होत्या. त्या बचत गटाच्या माध्यमातून बँकिंग व्यवहाराशी आत्मविश्वासाने जोडल्या गेल्या आहेत. यामुळे खऱ्या अर्थाने बँकिंग सेवा ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचली आहे. लहान रकमेपासून सुरू झालेली ही बचत पुढे सूक्ष्म कर्जाच्या स्वरूपात उपलब्ध झाली आणि त्यातूनच लघुउद्योग, शेतीपूरक व्यवसाय, पशुपालन, हस्तकला व किरकोळ व्यापाराची नवी दारे उघडली गेली. आर्थिक स्वावलंबनामुळे महिलांचा घरातील निर्णयप्रक्रियेत सन्मान वाढला असून, त्यांचा आत्मविश्वास आणि आत्मसन्मान खऱ्या अर्थाने वृद्धिंगत झाला आहे. महिलांच्या या संघटित शक्तीमुळे केवळ आर्थिकच नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाचे एक नवे पर्व सुरू झाले आहे. बचत गटांच्या माध्यमातून समाजात व्यसनमुक्तीचा सकारात्मक परिणाम दिसून येत आहे. घरातील आर्थिक स्थैर्य वाढल्यामुळे मुलांच्या शिक्षणाकडे अधिक लक्ष दिले जात असून, पती-पत्नींमधील संवाद आणि सामंजस्यही सुधारले आहे. म्हणूनच बचत गट हे केवळ आर्थिक व्यवहारांचे साधन न राहता सामाजिक बदलाचे प्रमुख केंद्र बनले आहे. बँक सदैव महिलांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. महिलांच्या गरजांनुसारच योजनांची आखणी करतो, कारण त्यांच्या जमिनीवरच्या (Ground Reality) अडचणींची आणि संघर्षाची पूर्ण जाण आहे. पण आता इथेच थांबायचे नाही. बचत गटांच्या उत्पादनांना जागतिक बाजारपेठ मिळवून देणे आणि प्रत्येक महिलेला शाश्वत आर्थिक बळकटी प्राप्त करून देणे हेच पुढचे पाऊल आहे.

आजचे युग हे तंत्रज्ञानाचे आहे. झपाट्याने बदलणाऱ्या या काळाशी पाऊल जुळवण्यासाठी आता डिजिटल क्रांतीकडे वळत आहोत. येणाऱ्या काळात बँकिंगच्या डिजिटल प्रवाहात महिलांचा सक्रिय सहभाग वाढवण्यावर विशेष भर असेल. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ही स्त्रीशक्ती अधिक सक्षम, वेगवान आणि प्रगत होईल याची खात्री आहे.

‘‘बँकेने दिलेला विश्वास आणि बचत गटांनी जोपासलेली कमालीची आर्थिक शिस्त यामुळे अर्थव्यवस्थेला एक नवी गती प्राप्त झाली आहे. ‘बँक’ आणि ‘बचत गट’ ही एकाच रथाची चाके आहेत. ज्यांच्या परस्पर सहकार्यातूनच महिला सक्षमीकरणाचा हा रथ प्रगतीच्या दिशेने वेगाने धावत आहे.

आजवर बँकेने बचत गटांना सुमारे २५० कोटी रुपयांचे कर्जवाटप केले असून, बँकेच्या एकूण एकत्रित व्यवसायामध्ये बचत गटांचा ५५ कोटी रुपये इतका मोलाचा वाटा आहे. बँकेच्या या विशाल कुटुंबात ६० हजारांहून अधिक भगिनी जोडल्या गेल्या आहेत. विशेष अभिमानाची बाब म्हणजे, यामध्ये नोकरदार आणि स्वत:चा व्यवसाय निर्माण करणाऱ्या सुमारे ७,००० रणरागिणींचा सक्रिय सहभाग आहे.

या संपूर्ण प्रवासात ‘सहयोगिनी’ हे बचत गट एकसंध करण्याचे सर्वांत महत्त्वाचे माध्यम ठरल्या आहेत. सहयोगिनी भगिनींनी केवळ बचतीचे महत्त्व पटवून दिले नाही, तर समविचारी महिलांना एकत्र आणून गटांची बांधणी केली, त्यांच्यात एकीची वज्रमूठ निर्माण केली. केवळ आर्थिक व्यवहार हेच उद्दिष्ट न ठेवता, महिलांच्या हाताला काम मिळावे यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. आरोग्य, शिक्षण, स्वच्छता आणि कायदेशीर हक्कांबद्दल महिलांना जागरूक करण्याचे उल्लेखनीय कार्य सहयोगिनींनी केले आहे. त्यांच्याच परिश्रमामुळे महिलांचा आत्मविश्वास वाढला असून त्या

**पुढील पानावर...**

# सहकार क्षेत्रामधून महिलांचे सक्षमीकरण



राजश्री पाटील

भारतीय सहकार चळवळ ही केवळ आर्थिक व्यवहारांची व्यवस्था नसून सामाजिक न्याय, समता आणि सर्वसमावेशक विकासाची प्रभावी चळवळ आहे. एकीचे बळ या तत्त्वावर उभी असलेली सहकार प्रणाली समाजातील वंचित घटकांना, विशेषतः महिलांना, आर्थिक मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य सातत्याने करत आहे. इतिहासाचा मागोवा घेतला तर महिलांनी सहकार चळवळीत दिलेले योगदान अत्यंत उल्लेखनीय आहे.

**✻ दुग्ध क्षेत्रातील महिलांचा सहभाग –**

गुजरातमधील दुग्ध सहकार चळवळीने ग्रामीण महिलांच्या जीवनात मोठा बदल घडवला. ‘अमूल’च्या माध्यमातून हजारो महिला दूध उत्पादक म्हणून सहकारी संस्थांमध्ये सहभागी झाल्या. त्यांनी केवळ कुटुंबाच्या उत्पन्नात वाढ केली नाही, तर व्यवस्थापन आणि निर्णय प्रक्रियेतही सक्रिय भूमिका निभावली. दुग्ध व्यवसायातून महिलांना नियमित उत्पन्न आर्थिक स्वावलंबन आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळाली.

**✻ स्वयंरोजगार आणि संघटनशक्ती –**

इला भट्ट यांच्या नेतृत्त्वाखाली स्थापन झालेल्या ‘सेवा’ संस्थेने असंघटित क्षेत्रातील महिलांना सहकाराच्या माध्यमातून संघटित केले. लघुउद्योग, हस्तकला कापड, शेतीपूरक व्यवसाय या क्षेत्रांतील महिलांना वित्तीय सेवा, प्रशिक्षण आणि बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात ‘सेवा’ने महत्त्वाची भूमिका बजावली. ही चळवळ महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्याचे जागतिक स्तरावरील उदाहरण ठरली.

**✻ महाराष्ट्रातील महिला बचत गट चळवळ –**

महिला बचत गटांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ दिले. लहान रकमेच्या बचतीतून सुरू झालेली ही चळवळ पुढे सूक्ष्म कर्ज, गृहउद्योग आणि कृषीपूरक व्यवसायांपर्यंत विस्तारली. अनेक महिलांनी मसाला उद्योग, दुग्ध व्यवसाय, शिवणकाम, अन्नप्रक्रिया उद्योग यामध्ये यशस्वी उपक्रम उभारले. सहकाराच्या माध्यमातून त्यांच्यात आर्थिक शिस्त, नेतृत्व आणि संघटन कौशल्य विकसित झाले आहे. महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या की, त्याचा परिणाम संपूर्ण कुटुंब आणि समाजावर होतो. मुलांच्या शिक्षणात सातत्य आणि गुणवत्तेत वाढ होते. आरोग्य व पोषणाबाबत अधिक जागरूकता निर्माण होते. कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढतो. सामाजिक प्रश्नांवर नेतृत्व घेण्याची क्षमता विकसित होते. अशा प्रकारे सहकार केवळ उत्पन्न वाढवत नाही, तर सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया गतीमान करतो. याच धर्तीवर सहकारातून महिला सक्षमीकरणाचे कार्य गोदावरी अर्बन सातत्याने करीत असते.

गोदावरी अर्बनचे योगदान बघितल्यास संस्थेच्या माध्यमातून महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. महिलांसाठी विशेष बचत व कर्ज योजना, सुलभ व्याजदर, आर्थिक साक्षरता अभियान, डिजिटल व्यवहार प्रशिक्षण, उद्योजकता मार्गदर्शन आणि कौशल्य विकास कार्यशाळा यामुळे महिलांना आर्थिक स्वावलंबनाची नवी दिशा मिळत आहे. महिलांना केवळ बँकेच्या सेवांचा लाभ घेणाऱ्या ग्राहकांपुरते मर्यादित न ठेवता त्यांना आर्थिक विकास प्रक्रियेतील भागीदार बनविण्याचा आहे. सहकाराच्या माध्यमातून महिलांनी स्वतःचे उद्योग उभे करावेत, रोजगारनिर्मिती करावी आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना द्यावी हा प्रयत्न आहे.




आजच्या डिजिटल आणि स्पर्धात्मक युगात महिलांना वित्तीय साक्षरता तंत्रज्ञानाचे ज्ञान आणि बाजारपेठेतील संधी यांची जोड देणे अत्यावश्यक आहे. सहकार क्षेत्राने महिलांना विश्वास, संधी आणि मार्गदर्शन दिल्यास त्या समाज परिवर्तनाच्या अग्रभागी उभ्या राहू शकतात.

महिला सशक्त झाल्या तर सहकार अधिक सक्षम होईल; आणि सहकार मजबूत झाला तर राष्ट्राची आर्थिक व सामाजिक प्रगती अधिक वेगाने साध्य होईल. इतिहासातील प्रेरणादायी उदाहरणे आपल्या समोर आहेत. आता त्यातून प्रेरणा घेऊन अधिक व्यापक आणि सर्वसमावेशक सहकार उभारण्याची वेळ आली आहे महिलांच्या स्वप्नांना बळ देत, सहकाराच्या सुगंधातून सक्षम आणि आत्मनिर्भर समाज घडविण्याचा संकल्प सर्वांनी केला पाहिजे. हाच समृद्ध भारताचा खरा मार्ग आहे.

**– राजश्री पाटील, अध्यक्ष**

**गोदावरी अर्बन मल्टिस्टेट को ऑप क्रेडिट सोसायटी लि नांदेड**

✻✻✻✻✻

---

**मागील पानावरून...**

## महिला बचत गट – उक्तीतून कृतीकडे!

सामाजिक आणि शैक्षणिक प्रक्रियेत हिरिरीने सहभागी होत आहेत.

**‘एकाकी व्यक्ती केवळ स्वप्न पाहू शकते, पण जेव्हा समाज आणि संस्थांची साथ मिळते, तेव्हा त्या स्वप्नांचे रूपांतर क्रांतीत होते.’ बचत गटाच्या बाबतीत हेच सत्य ठरले आहे.**

बचत गटाचे खाते उघडण्यापासून ते आवश्यक तांत्रिक प्रक्रियेपर्यंत प्रत्येक टप्प्यावर बँक अधिकारी व कर्मचाऱ्यांची भक्कम साथ लाभली आहे. केवळ कागदोपत्री सोपस्कार पूर्ण न करता, प्रत्येक महिलेला आर्थिक व्यवहार कसे करावेत आणि आजच्या युगातील डिजिटल बँकिंगचा वापर कसा करावा, याचे त्यांनी केलेलं सहकार्य आमच्यासाठी खऱ्या अर्थाने दिशादर्शक ठरले आहे. त्यांच्या संयमी आणि सहकार्यपूर्ण वृत्तीमुळेच ग्रामीण महिलांचा बँकेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. संस्थेचा आणि बचत गटांचा हा यशस्वी प्रवास पाहताना मनापासून समाधान वाटत आहे. कोणत्याही संस्थेचे यश हे त्या संस्थेसाठी झटणाऱ्या ‘माणसांवर’ अवलंबून असते. संस्थेचा कणा असलेले आपले समर्पित कर्मचारी आणि दूरदृष्टी लाभलेले खंबीर संचालक मंडळ, यांच्या अविरत कष्टांमुळेच ही उंची गाठू शकलो आहोत.

**“चला तर मग, सहकाराच्या माध्यमातून स्वावलंबनाचा हा दीप असाच तेवत ठेवू या आणि प्रगतीची नवी शिखरे सर करू या!”**

**– डॉ. आरती संजीव हुजुरबाजार**

**संचालिका, जळगाव जनता सहकारी बँक**

✻✻✻✻✻

# सहकार क्षेत्रातील यशस्वी कारकिर्दीचा प्रवास

**राज्य सहकारी बँकेच्या सरव्यवस्थापिका सायली भोईर यांनी सहकार क्षेत्रातील आजवरच्या कारकिर्दीचा प्रवास मुलाखतीच्या माध्यमातून वाचकांसमोर उलगडला. जागतिक महिला दिनानिमित्त लेखिका वंदना धर्माधिकारी यांनी घेतलेली विशेष मुलाखत...**

**प्रश्न – आपल्या कारकिर्दीचा प्रारंभ कसा झाला?**

**उत्तर –** सोमय्या कॉलेजमधून सन १९८९ मध्ये वाणिज्य शाखेची पदवी घेतल्यानंतर एका खासगी कंपनीमध्ये काही महिने काम केल्यानंतर दि. ३० सप्टेंबर १९८९ रोजी अपना सहकारी बँकेत लिपिक पदावर रुजू झाले. तद्नंतर अंतर्गत बढती परीक्षा देत वरिष्ठ व्यवस्थापक पदापर्यंत पोहोचले. दरम्यानच्या काळात बँकेच्या अनेक शाखा तसेच विभागांमधून काम केले, ज्यामध्ये प्रामुख्याने ठेव विभाग, कर्ज विभाग, वसुली–प्रशासन – ऑडिट, अकाउंट्स इ. चा समावेश आहे. बँकेत असताना बँकिंग विषयाचा पाया अगदी भक्कम झाला. बँकेशी निगडित विविध विषयांचे बारकावे समजत गेले. बँकेची पहिली महिला शाखा व्यवस्थापिका झाले. पदाबरोबर आव्हाने स्वीकारत असतानाच प्रत्येक प्रकरणात स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य मिळाले. अधिकार मिळाले, त्याबरोबरच जबाबदारीही वाढली. आत्मविश्वास तर होताच, त्यामुळे दिलेली जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडायची सवयच लागली. ती आजतागायत कायम आहे. या संपूर्ण प्रवासात अनेक अडथळे आले. पण त्यातूनच मार्ग काढत अनुभवातून शिकण्याच्या दृष्टिकोन कायम ठेवला.




दि महाराष्ट्र अर्बन को–ऑप बँक्स फेडरेशनवर मुख्य अधिकारी म्हणून प्रथम ३ महिने काम करावयाची संधी मिळाली. त्यानंतर सन २०११ साली वयाच्या ४१व्या वर्षी फेडरेशनची मुख्य कार्यकारी व सचिव झाले. फेडरेशनमध्ये नागरी सहकारी बँकांशी निगडित अनेक धोरणात्मक समस्यांच्या सोडवणुकीची कामे केली. रिझर्व्ह बँक, केंद्र शासन, राज्य शासन, सहकार खाते इ. येथील अनेक उच्च पदस्य पदाधिकाऱ्यांशी बैठका होत असत. तेथे होणाऱ्या चर्चांमुळे या संस्थांशी संपर्क वाढला, प्रामुख्याने रिझर्व्ह बँकेशी... तेथे जाऊन बँकांच्या मागण्या तसेच समस्या सोडविण्यासाठी प्रचंड आग्रही असू. येथे आवर्जून फेडरेशनचे माजी अध्यक्ष व राज्य बँकेचे प्रशासक अनास्कर सरांचा उल्लेख करेन. कारण 'मॅडम, बँकांच्या समस्या नेटाने लावून धरा. आज ना उद्या यश मिळेलच, अडचणीतील बँकांना बाहेर काढण्याचा प्रयत्न करा, त्यासाठीच तुम्ही फेडरेशनला आहात. त्या खुर्चीला न्याय द्या,' असे सर सतत सांगत असत. त्यामुळे सहकारी बँकांशी निगडित अनेक प्रलंबित प्रश्न, धोरणात्मक समस्या सोडविण्यात यश येत गेले. अडचणीत असलेल्या बँकांकरिता टॅफकब पूर्व सभेचे आयोजन करून त्यांना मार्गदर्शन करण्याची, त्यांच्यावर रिझर्व्ह बँकेने लादलेली बंधने शिथिल करण्यासाठी रिझर्व्ह बँकेच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा–मसलत करून, प्रसंगी आग्रही भूमिका घेत त्यांची सोडवणूक करण्याची सरांनी सवय लावली आणि ती भूमिका प्रामाणिकपणे बजावण्याचा १०० टक्के प्रयत्न केला. फेडरेशनमध्ये कार्यरत असताना राज्यभरातून नागरी सहकारी बँकांकडून अनेकदा बँकिंगशी निगडित विविध विषयांवर पत्रव्यवहार होत असे. त्याची उत्तरे देताना रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकांचे, सहकार कायद्याचे वाचन झाले. काही सहकाऱ्यांचेही सतत सहकार्य लाभले. त्यामुळे आजही एखादा विषय हाताळताना त्याची पूर्ण माहिती घेऊनच तो निकाली काढते.

फेडरेशनमध्ये सुमारे १४ वर्षे मुख्य कार्यकारी व सचिव म्हणून कामकाज पाहिले. आता दि महाराष्ट्र स्टेट को–ऑपरेटिव्ह बँकेत गेल्या १ वर्षापासून सरव्यवस्थापिका म्हणून संपूर्ण बँकिंग विभाग, इंटरनॅशनल बँकिंग विभाग, मानव संसाधन विकास व व्यवस्थापन विभाग, संस्थात्मक वसुली आणि पुनरुज्जीवन विभाग, कॉर्पोरेट नियोजन आणि संस्थात्मक विकास विभाग, अनुपालन व्यवस्थापन, नागरी सहकारी बँका विभाग इ. विभागांचे कामकाज हाताळत आहे. त्याचबरोबर विशाखा समितीची अध्यक्षा, तक्रार निवारण अपील अधिकारी, मुख्य अनुपालन अधिकारी व प्रमुख नोडल अधिकारी इ. म्हणूनही कामकाज पाहत आहे.



**सायली भोईर**
**सरव्यवस्थापिका**
**राज्य सहकारी बँक**
**९३२६७ ७६६१९**

**प्रश्न – ३५ वर्ष तुम्ही बँकिंग क्षेत्रात आहात. बँकेत लागल्यावर लगेचच पाठोपाठ आपण कायद्याची पदवी घेतली, पाठोपाठ बँकेच्या परीक्षा दिल्यात. त्याचे मला फार कौतुक वाटते.** CAIIB - Certified Associate of Indian Institute of Banking **परीक्षा भाग १ आणि २ आपण काही महिन्यांच्या अंतराने पूर्ण केलेले आहेत. इतरही पदव्या आहेत त्याबद्दल..**

**उत्तर –** सहकारी बँकिंग क्षेत्रातील माझा एकूण कार्यकाळ सुमारे ३६ वर्षांचा आहे. त्यातील पहिली २१ वर्षे ही एका मल्टी स्टेट शेड्युल्ड बँकेत कार्यरत राहिले. बँकेत काम करत असताना सर्वप्रथम सन १९९३ मध्ये कायद्याची पदवी घेतली. कायदेविषयक पदवीमुळे जवळजवळ सर्वच कायद्यांची मूलभूत माहिती मिळाली. आत्मविश्वास वाढीस लागला. त्यानंतर सन १९९८ मध्ये सहकार आणि हिशेब या विषयात शासकीय डिप्लोमा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केला. त्यामुळे सहकाराचा इतिहास, तत्त्वे, मूल्ये समजत गेली. त्यानंतर सन २००० मध्ये JAIIB ची परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आणि केवळ तीन महिन्यांतच CAIIB ची परीक्षा दिली व त्यातही प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. शिवाय CAIIB मधील 'अकाउंटसी' या विषयात भारतात दुसरी आले व पश्चिम प्रादेशिक विभागात प्रथम क्रमांक मिळविला. त्यांनतर फेडरेशनमध्ये कार्यरत असताना 'बँकिंग आणि फायनान्स' या विषयात एम.बी.ए. पदवी प्रथम श्रेणीत प्राप्त केली. वरील सर्व पदव्यांमुळे बँकिंगवरील आणि सहकार विषयावरील पकड घट्ट झाली.

**प्रश्न : सहकार क्षेत्रात काय व कसे चांगले होईल, असे धोरण ठरवण्याच्या कामात आपण कायम सहभागी आहात, तसेच कुठल्याही बँकेची कुठलीही समस्या सोडवण्यासाठी महत्त्वाची भूमिका त्याबद्दल...**

**उत्तर –** फेडरेशन राज्यातील नागरी सहकारी बँकांचे पालकत्व स्वीकारलेली एक संघीय संस्था आहे. आजमितीस राज्यातील ४५२ नागरी सहकारी बँका तिच्या सभासद आहेत. नागरी सहकारी बँकांशी निगडित असणाऱ्या

धोरणात्मक समस्यांची सोडवणूक करणे, या बँकांमधील संचालक, वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी वर्ग यांना बँकिंग, सहकार क्षेत्रात होणाऱ्या घडामोडींची, कायद्यातील सुधारणांची, रिझर्व्ह बँक, केंद्र सरकार,

पुढील पानावर...

मागील पानावरून...

# सहकार क्षेत्रातील यशस्वी कारकिर्दीचा प्रवास

राज्य सरकार यांच्याद्वारा जारी करण्यात येणाऱ्या परिपत्रकांची माहिती करून देणे, त्याकरिता प्रशिक्षण कार्यक्रम, चर्चासत्र, कार्यशाळा, परिषदा आयोजित करणे इ. तसेच टॅफकब वर येणाऱ्या बँकांना अडचणीतून बाहेर काढणे इ. कामे फेडरेशनवर असताना वरिष्ठांच्या मार्गदर्शनामुळे व सहकार्यामुळे करण्यात यशस्वी झाले.

**प्रश्न : खूप मोठे काम करीत होतात तुम्ही. तरी सहकारी बँका बंद पडणे, त्यांच्याबद्दल साशंक असणे, याबद्दल काय सांगाल?**

**उत्तर** – सहकारी बँकांचे प्रश्न खूप वैविध्यपूर्ण असतात. ते प्रश्न सोडवताना संघर्ष सुरू असतो. यश सहजासहजी मिळत नाही. समोर आलेला प्रत्येक प्रश्न, समस्या माझ्या सहकाऱ्यांच्या आणि वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तडीस नेण्याचे नेटाने प्रयत्न केले. अनेकदा चुकीच्या कर्ज वाटपामुळे काही बँकांमधील अनुत्पादित कर्जाचे प्रमाण वाढले, ज्याचा परिणाम त्यांच्या एकंदरीत आर्थिक स्थितीवर झाला व त्याची परिणती रिझर्व्ह बँकेकडून या बँकांवर आर्थिक निर्बंध लावण्यावर झाला. अशा वेळी या बँकांच्या ठेवीदारांचे आणि त्याचबरोबर कर्मचाऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी या बँकांचे इतर सक्षम बँकांबरोबर विलीनीकरणाचे प्रयत्न केले. त्यात बहुतांश यश मिळाले. त्याचबरोबर काही आर्थिक अडचणीत असलेल्या बँकांवर विशेष लक्ष केंद्रित करून त्यांचे संचालक मंडळ, व्यवस्थापन तसेच कर्मचारी वृंद यांच्या इच्छाशक्तीच्या आणि सांघिक प्रयत्नाच्या जोरावर या बँकांना कठीण परिस्थितीतून बाहेर काढण्यात यशस्वी झालो.

आता तर केंद्र सरकारने सहकारी बँकांच्या निकोप वाढीसाठी आणि सक्षमीकरणाकरिता साक्षात सहकार मंत्रालयाची स्थापना करून समस्त सहकार क्षेत्राला राजाश्रय दिलेला आहे. आज अनेक धोरणात्मक समस्या मांडण्यासाठी, त्यांच्या सोडवणुकीसाठी एक सक्षम प्लॅटफॉर्म उपलब्ध झाला आहे.

**● महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेतील सध्याची कारकीर्द...**

फेडरेशमध्ये एकंदरीत १४ वर्षांचा काळ व्यतीत करताना अनेक आर्थिक अडचणीत असलेल्या नागरी सहकारी बँकांशी संपर्क आला. या बँका अडचणीत येण्याची कारणे कधी कधी वास्तवदर्शी होती. उदा. कोविडचा काळ, त्यानंतर पंजाब ॲण्ड महाराष्ट्र बँकेत जवळजवळ राज्यातील ८० नागरी सहकारी बँकांनी केलेली गुंतवणूक, असेट्स रिकन्स्ट्रक्शन कंपन्यांना विकण्यात आलेली कर्जे, त्याकरिता बँकांना नंतर रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार करावी लागणारी मोठ्या प्रमाणावरील तरतूद इ. चा परिणाम बँकांची आर्थिक स्थिती कमकुवत होण्यात झाला. अशा वेळी या बँकांवर लादल्या गेलेल्या निर्बंधामुळे त्यांची आर्थिक स्थिती आणखीनच खालावत गेली. रिझर्व्ह बँकेकडे सातत्याने पाठपुरावा करणे व या बँकांना दिलासा देणे, मार्गदर्शन करणे, याव्यतिरिक्त फारसे काही करण्यासारखे नव्हते. या बँकांच्या सिंगल व ग्रुप एक्सपोजरवर घातलेल्या बंधनामुळे बँकांचे अनेक चांगले कर्जदार इतर ठिकाणी जात होते. काही बँकांची आर्थिक स्थिती भक्कम असली, तरी कर्जदारांच्या एकूण कर्जाची जोखीम उचलण्याची त्यांची तयारी नव्हती. अशा बँकांना कन्सोर्शियम फायनान्सद्वारे मदतीचा हात देऊन त्यांचे ग्राहक त्या बँकेकडेच राखून ठेवण्यात राज्य बँकेने पुढाकार घेतला. तसेच कन्सोर्शियम कर्जात या बँकांचा हिस्सा कितीही असो त्यांना लीड बँक म्हणून नेतृत्व राज्य बँकेने बहाल केले. अनेक बँकांना सायबर हल्ल्यांपासून सुरक्षा मिळवून देण्यासाठी राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी वाशी येथे सायबर सिक्युरिटी सेंटर उभारण्याची दूरदृष्टी ठेवली. ज्या बँकांकडे ऑथोराइज्ड डिलर १ अथवा २ चे लायसन्स नव्हते, अशा बँकांच्या ग्राहकांना विदेशी चलनाची खरेदी–विक्री, आयात–निर्यात इ. सवलती देण्यात व त्याद्वारे मिळणारे कमिशन या बँकांबरोबर विभागून घेण्यात राज्य बँकेने पुढाकार घेतला. ज्या बँकांकडे स्वतःची क्लीअरिंग सुविधा नव्हती, अशा बँकांना सीएसजीएल ची सुविधा एनडीएस–ओम प्लॅटफॉर्मवर मिळवून दिली. या बँकांनी क्लीअरिंगकरिता राज्य बँकेतील खात्यात जमा केलेली रक्कमही सीआरआर साठी ग्राह्य धरली जात होती. त्याचबरोबर लहान–मध्यम आकाराच्या सहकारी बँकांना त्यांच्या शाखा इमारत तसेच मुख्य कार्यालय बांधकाम / खरेदीसाठी, बँकांच्या संगणकीकरणासाठी आवश्यक असणारा कर्जपुरवठा उपलब्ध करून देण्याकरिता राज्य बँकेने विविध कर्जाच्या योजना निर्माण केल्या.

राज्यातील जवळजवळ सर्वच नागरी सहकारी बँकांशी परिचित असल्याने राज्य बँकेमार्फत देण्यात येणाऱ्या या सर्व फंड बेस्ड, नॉन फंड बेस्ड सुविधांची माहिती सर्व बँकांना मिळावी व त्याचा लाभ या बँकांनी घ्यावा, या हेतूने प्रशासकांच्या आवाहनानंतर राज्य सहकारी बँकेत सरव्यवस्थापिका म्हणून पदभार स्वीकारण्याचे ठरविले.

**● पुरस्कार** : ✲ बँकेत असताना उत्कृष्ट शाखा व्यवस्थापक म्हणून रिझर्व्ह बँकेचे माजी डेप्युटी गव्हर्नर श्री. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते पुरस्कार प्राप्त झाला.

✲ मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरू श्रीमती स्नेहलता देशमुख यांच्या हस्ते उत्कृष्ट शाखा व्यवस्थापक पुरस्कार प्राप्त झाला.

✲ महाराष्ट्र स्टेट को–ऑपरेटिव्ह बँक्स असोसिएशनचा कै. बापुराव देशमुख सन्मानित 'उत्कृष्ट व्यवस्थापक' हा सन्मान प्राप्त झाला.

✲ 'स्त्री शक्ती सन्मान' पुरस्कार सुप्रसिद्ध सिनेतारका शर्मिला टागोर यांचे हस्ते बँकिंग क्षेत्रातील भरीव कामगिरीकरिता देण्यात आला.

**● प्रमुख अतिथी / वक्ता म्हणून निमंत्रणे –**

✲ अनेक नागरी सहकारी पतसंस्था तसेच अनेक जिल्हा सहकारी बँकांच्या असोसिएशनद्वारा आयोजित कार्यशाळा, मेळावे, परिषदा प्रशिक्षण कार्यक्रम इ. वर प्रमुख अतिथी तथा वक्त म्हणून आमंत्रित

**● राज्याचे सहकार आयुक्त व निबंधक यांच्या कार्यालयाने नेमलेल्या खालील समितींवर 'सदस्य' म्हणून सहभाग –**

१) मॉडेल बाय–लॉज कमिटी
२) राज्यातील नागरी सहकारी बँकांना उत्कृष्ट कामकाजाकरिता पुरस्कार देण्यासाठी नेमलेली सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार समिती
३) ऑनलाइन नोकर भरती एजन्सीचे निकष ठरविण्याकरिता एजन्सीचे पॅनेल तयार करण्यासाठी नियुक्त समिती
४) हाउसिंग सोसायट्यांना त्यांच्या पुनर्विकासासाठी कर्ज देण्यास जनरल परवानगी देण्यासाठी नेमलेली समिती

✲ राज्य सरकारने 'नागरी सहकारी बँकांशी निगडित समस्यांचे निवारण करण्यासाठी गठीत केलेल्या समितीची 'सभासद सचिव' म्हणून नियुक्ती

✲ रिझर्व्ह बँकेची आर्थिक धोरण पूर्व समिती, स्थायी सल्लागार समिती, टॅफकब समितीवर 'सदस्य' म्हणून सहभाग.

✲ याव्यतिरिक्त फेडरेशनला 'राज्यस्तरीय प्रशिक्षण केंद्र' व 'राज्यातील नागरी सहकारी बँकांमध्ये नोकर भरती प्रक्रिया राबविणारी एजन्सी' म्हणून नावलौकिक मिळवून देण्यात सक्रिय भूमिका. एकूण सहकारी बँकिंग क्षेत्रातील कामगिरीबद्दल समाधान आहे. शेवटी इतकंच सांगते, 'आपल्या स्वप्नांवर विश्वास ठेवा आणि त्यांना प्रयत्नांचे बळ द्या. यशाला शॉर्टकट नसतो. त्यामुळे प्रयत्न करत राहा. यश खात्रीने मिळणारच! '

**– वंदना धर्माधिकारी,**
**ईमेल –** Vandana10dyahoo.co.in
**मो.नं.** - 9890623915

✲✲✲✲✲

# ग्रामीण अर्थकारणात सहकारी बँकाची भूमिका महत्त्वाची - सचिन शेंडे

## विदर्भातील नागरी सहकारी बँकांसाठी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन

**नागपूर –** ग्रामीण अर्थकारणात सहकारी बँकांची भूमिका महत्त्वाची आहे. सामान्य माणसापर्यंत बँकिंग पोचविण्याची ताकद सहकारी बँकांनी अधोरेखित केली आहे. बदलत्या काळानुसार आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून डिजिटल बँकिंग उपलब्ध करून, तरुण पिढीला आकर्षित करण्यासाठी सहकारी बँकांनी प्रयत्नांची शर्थ करण्याची आवश्यकता आहे, असे मत रिझर्व्ह बँकेचे विभाग संचालक सचिन शेंडे यांनी सांगितले.



सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्थेने विदर्भातील नागरी सहकारी बँकांसाठी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन केले होते. प्रशिक्षण कार्यक्रमात २० नागरी सहकारी बँकांमधील प्रतिनिधी उपस्थित होते. बँकांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक, तज्ज्ञ संचालक, व्यवस्थापन मंडळाचे सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा समावेश होता. कार्यशाळेचे उद्घाटन भारतीय रिझर्व्ह बँकेचे विभाग संचालक सचिन शेंडे हस्ते करण्यात आले.

ग्रामीण अर्थकारणात सहकारी बँकांची भूमिका महत्त्वाची आहे, असे नमूद करून ते म्हणाले, सामान्य माणसापर्यंत बँकिंग पोचविण्याची ताकद सहकारी बँकांनी अधोरेखित केली आहे. बदलत्या काळानुसार आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून डिजिटल बँकिंग उपलब्ध करून, तरुण पिढीला आकर्षित करण्यासाठी सहकारी बँकांनी प्रयत्नांची शर्थ करण्याची आवश्यकता आहे. सहकारी बँकांसमोरील अडचणी सोडविण्यासाठी रिझर्व्ह बँकेचा नेहमीच सकारात्मक दृष्टिकोन राहील असेही त्यांनी स्पष्ट केले.

सहकार भारती, प्रदेश बँकिंग प्रकोष्ठाचे प्रमुख व टीजेएसबी सहकारी बँकेचे अध्यक्ष शरद गांगल यांनी सहकारी बँकांच्या प्रगतीचा मार्ग यावर मार्गदर्शन केले. सहकारी बँकांमध्ये असलेल्या क्षमतेचा वापर कसा करता येईल हे सोदाहरण स्पष्ट केले. तसेच असलेला न्यूनगंड झटकून टाकला पाहिजे व आत्मविश्वासाने स्पर्धेला सामोरे जाण्याची तयारी ठेवली पाहिजे, असे ते म्हणाले.

तांत्रिक निर्लेखन व सामोपचाराने कर्ज वसुली यावर कोकण नागरी सहकारी बँक्स असोसिएशनचे उपाध्यक्ष सीए उदय कर्वे यांनी तांत्रिक निर्लेखनाची व सामोपचाराने कर्ज वसुलीची पद्धत, याबाबत भारतीय रिझर्व्ह बँकेचे निर्देश, सहकारी बँकांच्या आयकर बचतीसाठी त्याचा उपयोग याचा सोप्या भाषेत ऊहापोह केला.

प्रशिक्षण कार्यशाळेत महाराष्ट्र अर्बन को ऑप बँक्स फेडरेशनचे संचालक शंतनु जोशी, महाराष्ट्र को-ऑप. बँक्स असोसिएशनचे संचालक राजेंद्र महल्ले, विदर्भ अर्बन को-ऑप. बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष रवींद्र दुरुगकर, अमरावती विभाग सहकारी बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष अरविंद गावंडे उपस्थित होते.

प्रास्ताविक सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्थेचे अध्यक्ष संजय बिर्ला यांनी तर उपाध्यक्ष शरद जाधव यांनी आभार मानले. प्रशिक्षण संस्थेचे संचालक सीए रवींद्र चिंचवडकर यांनी सूत्रसंचालन केले. तसेच संचालक सर्वश्री अमित ओझे, उदय पेंडसे, संध्या कुलकर्णी व प्रशिक्षण प्रमुख व्यंकटेश कुलकर्णी उपस्थित होते.

# वणा नागरिक सहकारी बँक आयोजित अधिकारी-कर्मचारी प्रशिक्षण वर्ग यशस्वी

**हिंगणघाट –** विदर्भ अर्बन बँक्स को-ऑप. असोशिएशन, वणा नागरिक सहकारी बँक यांच्या संयुक्त विद्यमाने वणा बँकेच्या अधिकारी तथा कर्मचारी वर्गासाठी एक दिवसीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. नागपूर नागरिक सहकारी बँक संचालक सीए तुषारकांती डबले यांनी उद्घाटन केले. बँकेचे अध्यक्ष सुधीर कोठारी, वरिष्ठ संचालक ओम डालिया, हरीश वडतकर कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक डॉ. निर्मेश कोठारी उपस्थित होते.



प्रशिक्षण ही निरंतर प्रकिया असून त्यामुळे बँकेच्या कर्मचारी वर्गाच्या ज्ञानात भर पडते आणि ग्राहकांना उत्तम सेवा प्रदान करण्यास सकारात्मकता निर्माण होते, असे डबले यांनी सांगितले. 'बँकेची अद्ययावत परिपत्रके' याविषयी श्रीराम अर्बन बँकेचे सीईओ मिलिंद कुलकर्णी, 'प्राथमिकता क्षेत्रात येणारी कर्ज' या विषयावर वर्धमान अर्बन बँक सल्लागार राम दिवाकर तर 'वर्धमान अर्बन बँक आणि एनपीए आणि वसुली व्यवस्थापन' यावर व्यवस्थापक सुनील परांजपे यांनी मार्गदर्शन केले. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वसंत खोलगडे यांनी ही महिती सांगितली.

# तीन दिवसीय प्रशिक्षण व सहकार मेळाव्याचे यशस्वी आयोजन

**नागपूर –** महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन, नागपूर जिल्हा नागरी व कर्मचारी पतसंस्था सहकारी संघ यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय प्रशिक्षण व सहकार मेळावा येथे आयोजित करण्यात आला होता. या निमित्ताने सहकार सुगंध बुक स्टॉल लावण्यात आला. सहकार खात्याचे सर्व परिपत्रक छापून तसेच आदर्श ताळेबंद कसा असावा याची गुणतालिकेत मांडणी करून 'पतसंस्था दैनंदिनी' प्रसिद्ध केली. नागपूर जिल्हा पतसंस्था व कर्मचारी पतसंस्था सहकारी संघ यांच्या संयुक्त विद्यमाने सहकार भारती, नागपूर विभाग प्रमुख संजय रोकडे, महानगर अध्यक्ष नंदू कण्हेर यांचा सत्कार करण्यात आला.

# विधी सेवा महाशिबिर, शासकीय योजनांचा महामेळावा – मुंबई सहकार भारतीचा महत्त्वपूर्ण सहभाग



**मुंबई –** विधी सेवा महाशिबिर व शासकीय योजनांची माहिती देणारा महामेळावा या अंतर्गत सहकार भारतीने स्टॉलच्या माध्यमातून सहकार भारतीच्या सेवा कार्याची माहिती मेळाव्यात देऊन संवाद साधला. सदस्य नोंदणीसाठी प्रयत्न झाला. उपक्रमात वायव्य मुंबई जिल्हा, महिला प्रमुख मनीषा चव्हाण यांनी पुढाकार घेतला.

सहकार भारती मुंबई अध्यक्ष राहुल पाटील, सहकार भारतीचे कार्यकर्ते डॉ. स्मिता मोटे, शुभांगी सारंग, शिल्पी खातू तसेच ॲड. प्रशांत फोफळे, राकेश सोनवणे, सना सय्यद व शिंदे यांनी सहकार्य केले. सहकार भारतीचे प्रदेश कार्यकर्ते रामकृष्ण आवारे व वायव्य मुंबई जिल्हा संघटन प्रमुख सत्यविजय सावंत उपस्थित होते.

न्यायमूर्ती ए. एस. गडकरी, न्यायमूर्ती नीला गोखले व न्यायमूर्ती भारती डांगरे यांनी सदिच्छा भेट दिली. अध्यक्ष पाटील व ॲड. शुभांगी सारंग यांनी सहकार भारतीच्या पुस्तिका व सेवा कार्याची माहिती सांगितली. समाजातील गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना शासकीय योजना व कायद्याचे संरक्षण सहज आणि प्रभावीपणे कसे मिळवता येईल, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. सामान्य नागरिकांपर्यंत न्याय व हक्क पोहोचविण्याच्या दृष्टीने शिबिर उपयुक्त ठरले.

# सहकार भारतीच्या माध्यमातून नवी मुंबई परिसरातील गृहनिर्माण संस्थांच्या सक्षमीकरणाचा संकल्प



**पनवेल (नवी मुंबई) –** सहकार भारतीच्या माध्यमातून नवी मुंबई परिसरातील सर्व गृहनिर्माण संस्था सक्षम करण्याचा संकल्प प्रशिक्षण वर्गात करण्यात आला. सहकार भारती पनवेल जिल्हा उपनिबंधक कार्यालय रायगड, जिल्हा उपनिबंधक कार्यालय सिडको, सहाय्यक निबंधक कार्यालय पनवेल, सहाय्यक निबंधक कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने गृहनिर्माण संस्थांचे संचालक व सभासदांसाठी प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आला होता. पनवेल महानगराचे नवनियुक्त महापौर नितीन पाटील यांचा सहकार भारतीच्या वतीने सत्कार करण्यात आला.

उदघाटन सहकार भारती महाराष्ट्र प्रदेश महामंत्री व राज्य सहकार धोरण उच्चस्तरीय समितीचे सदस्य विवेक जुगादे यांनी केले. विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर, विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील, पनवेल महानगराचे महापौर नितीन पाटील, नगरसेवक मनोज भुजबळ, सिडकोचे उपनिबंधक प्रताप पाटील, उद्योगपती सुरेश हावरे, जिल्हा उपनिबंधक तनवीर पाटील, सिडकोचे सहाय्यक निबंधक शंकर पाटील, पनवेलच्या सहाय्यक निबंधक श्रीमती भारती काटुळे, प्रदेश सहसंघटन प्रमुख प्रवीण बुलाख, प्रदेश गृहनिर्माण प्रकोष्ठ प्रमुख अश्विनी बुलाख, कोकण विभाग प्रमुख राजू ठाणगे यांच्यासह सहकार भारती नवी मुंबईचे अध्यक्ष प्रमोद जोशी, नवी मुंबई हाऊसिंग फेडरेशनचे अध्यक्ष चौधरी सचिव दळवी उपस्थित होते.

आमदार ठाकूर व आमदार विक्रांत पाटील यांनी सहकार भारतीच्या माध्यमातून नवी मुंबई परिसरातील सर्व गृहनिर्माण संस्था सक्षम करण्याचा संकल्प केला. तसेच सहकार भारतीच्या माध्यमातून या परिसरातील सर्व गृहनिर्माण संस्थांना प्रशिक्षित करून त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे आश्वासन दिले. सहकार भारतीचे महामंत्री विवेक जुगादे यांनी सहकार क्षेत्राचा गौरवपूर्ण इतिहास उपस्थितांसमोर समोर मांडला. सोबतच शासन तसेच प्रशासन स्तरावर सहकारी संस्थांच्या सर्व समस्यांचे निराकरण करण्यासाठी सहकार भारतीने पुढाकार घेतला असल्याचे सांगितले.

आम्हीच आहोत आमच्या सोसायटीचे शिल्पकार या संकल्पनेवर आधारित हाउसिंग सोसायटींच्या स्पर्धेमध्ये विजेत्यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वितेसाठी पनवेल महानगराच्या अध्यक्ष त्रिवेणी सालकर, महामंत्री कृष्णा राणे, उपाध्यक्ष रत्नाकर कुलकर्णी, संघटन प्रमुख संतोष पोकळे, सहसंघटन प्रमुख प्रताप मांडवकर, प्रसिद्धी प्रमुख विश्वास शिंदे, महिला प्रमुख अपर्णा नाडगौडा, सचिव किरण शिंदे व सहकार भारती पनवेल महानगराचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# टीजेएसबी बँकेचा राजस्थान व छत्तीसगडमध्ये शाखा विस्तार होणार

**ठाणे –** टीजेएसबी बँक लवकरच राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये शाखा विस्तार करणार आहे. बँकेचा ४४ वा वर्धापनदिन नुकताच साजरा केला. यावेळी वरील घोषणा करण्यात आली. ग्राहकांची सुविधा, सुरक्षितता तसेच डिजिटल उपक्रम यावर भर देण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले. बँकेमध्ये मध्यंतरीच्या काळात दोन बँकांचे विलीनीकरण करण्यात आले असल्याचे सांगण्यात आले, अशी माहिती बँक अध्यक्ष शरद गांगल यांनी सांगितली. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी निखिल आरेकर म्हणाले की, जयपूर आणि रायपूर याठिकाणी नवीन शाखा सुरू करण्यात येणार आहेत.

# 'आरबीआय'च्या केंद्रस्थानी ठेवीदारांचे हित - सतीश मराठे

## 'आयएमडीआर' तर्फे 'भारतामधील ठेवीदारांचा आवाज आणि बँक प्रशासन' यावर चर्चासत्र

**पुणे** – ठेवीदार संरक्षण हे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या (आरबीआय) नियामक आणि पर्यवेक्षीय चौकटीच्या केंद्रस्थानी आहे. ठेवीदारांना बँकेच्या संचालक मंडळावर थेट प्रतिनिधित्व नसले, तरी संपूर्ण नियामक रचना ही ठेवीदारांच्या हितांचे संरक्षण आणि वित्तीय स्थैर्य सुनिश्चित करण्यासाठी उभारण्यात आलेली आहे, असे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या केंद्रीय मंडळाचे संचालक आणि नाबार्डचे संचालक सतीश मराठे यांनी सांगितले.

डेक्कन एज्युकेशन संचालित इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट अँड रिसर्चच्या (आयएमडीआर) वतीने 'भारतामधील ठेवीदारांचा आवाज आणि बँक प्रशासन' या विषयावर आयोजित संशोधन परिसंवादात मराठे बोलत होते. परिसंवादामध्ये वरिष्ठ धोरणनिर्माते, बँकिंग क्षेत्रातील तज्ज्ञ, प्राध्यापक, व्यावसायिक तसेच विद्यार्थी यांनी भारतातील बँक प्रशासनाच्या विकसित होत असलेल्या रचनेवर चर्चा केली. डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त विवेक मठकरी, माजी विश्वस्त महेश आठवले, 'आयएमडीआर'च्या संचालिका डॉ. शिखा जैन, माजी विद्यार्थिनी, अल्युमिना कन्सल्टिंगच्या संस्थापक-संचालिका अंजली पाटील उपस्थित होते.

मराठे यांनी भारतातील तसेच जागतिक पातळीवरील ठेवीदार संरक्षणाच्या ऐतिहासिक प्रवासाचा आढावा घेतला. स्वातंत्र्योत्तर काळात ठेवी विमा व्यवस्थेची स्थापना कशी झाली, यावर त्यांनी प्रकाश टाकला. भारतात लहान ठेवी खात्यांपैकी जवळपास सर्व खाती ठेवी विमा संरक्षणाखाली येतात, ज्यामुळे जागतिक निकषांशी सुसंगती राखली जाते बँकिंग व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास अधिक दृढ होतो, बँकांनी सावधगिरी आणि नियंत्रित जोखीम स्वीकृती यांचा समतोल साधणे आवश्यक असते; अन्यथा कर्जपुरवठा आणि आर्थिक विकासावर परिणाम होऊ शकतो, असे त्यांनी नमूद केले.

बँकिंग क्षेत्रासमोरील उदयोन्मुख आव्हानांवर बोलताना ठेवीदारांचे स्वरूप बदलत असून, ते आता गुंतवणूकदार बनत आहेत. जोखीम व्यवस्थापन अधिक गतिमान करण्याची गरज आहे, तसेच तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा विश्लेषण यांची नियामक देखरेखीत भूमिका वाढली आहे. व्यवस्थापन मंडळावर ठेवीदारांना स्थान मिळण्याची शक्यता अत्यल्प आहे. लाखो ठेवीदारांमधून खऱ्या अर्थाने प्रतिनिधित्व करणारी व्यक्ती निवडणे हे संस्थात्मकदृष्ट्या अत्यंत गुंतागुंतीचे आहे. तसेच ठेवीदार थेट मंडळावर आल्यास निर्णय प्रक्रियेत अति-जोखीम टाळण्याची प्रवृत्ती वाढू शकते, अशी त्यांनी सूचना केली.



**'आयएमडीआर'तर्फे आयोजित 'भारतामधील ठेवीदारांचा आवाज आणि बँक प्रशासन' यावर चर्चासत्रावेळी डावीकडून डॉ. शिखा जैन, महेश आठवले, सतीश मराठे व विवेक मठकरी.**

'इंदिरा अनंत आठवले स्मृती संशोधन निधी'अंतर्गत प्रा. दर्शन बागडे यांच्या संशोधनावर आधारित हा परिसंवाद घेण्यात आला. डॉ. शिखा जैन आणि प्रा. हृषीकेश खळदकर यांनी संशोधनाला सहकार्य केले. संशोधन निधीचे प्रवर्तक महेश आठवले यांनी समाजाभिमुख आणि धोरणाधारित संशोधनाला प्रोत्साहन देणे हा या निधीचा उद्देश असून, शैक्षणिक संस्थांनी प्रत्यक्ष धोरणात्मक प्रश्नांवर संशोधन करणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

# नवीन सहकार धोरणाच्या अंमलबजावणीसाठी सहा विषय गटांची स्थापना

**पुणे** – राष्ट्रीय सहकार धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यातील सहकार क्षेत्राचा अभ्यास करून शिफारसी करण्यासाठी सहा विविध विषय गट तयार करण्यात आले आहेत. या विविध गटांमध्ये सहकार क्षेत्रातील तज्ञ, अभ्यासक, अधिकारी, सहकारी संस्थांचे प्रतिनिधी यांचा समावेश करण्यात आला आहे.

केंद्र सरकारच्या धोरणांच्या अनुषंगाने राज्याचे नवे सहकार धोरण ठरविण्यासाठी राज्य शासनाने सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ३२ सदस्यांची समिती तयार केली आहे. या समितीच्या बैठकीत विविध विषय समित्या तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार सहकाराचा पाया भक्कम करणे, चैतन्यशीलता वाढविणे, सहकारी संस्था भविष्यकालीन बनविणे, सर्वसमावेशकता वाढविणे, नवीन आणि उदयोन्मुख क्षेत्रात प्रवेश आणि सहकार क्षेत्राच्या विकासासाठी युवा वर्गाचा सहभाग वाढविणे यावर अधिक भर देण्यात येणार आहे.

**गट क्रमांक – १) गटप्रमुख** – राज्य सहकारी बँक प्रशासक विद्याधर अनास्कर, पुणे जिल्हा सहकारी बँक अध्यक्ष दिगंबर दुर्गाडे, साखर आयुक्त डॉ. कोलते, जिल्हा उपनिबंधक प्रकाश जगताप.

**गट क्रमांक – २) गट प्रमुख** – सहकार भारती महामंत्री विवेक जुगादे, अकोला जिल्हा बँक अध्यक्ष डॉ. संजीव कोरडे, नागपूर जिल्हा उपनिबंधक अजय कडू

**गट क्रमांक – ३) गटप्रमुख** – विद्याधर अनास्कर, युवा कांता मोहंती, गोकुळ दूध संघ संचालक चेतन नरके, पुणे जिल्हा उपनिबंधक संजय राऊत.

**गट – ४) गट प्रमुख** – आर बी आय संचालक सतीश मराठे, राज्य सहकारी संघ व्यवस्थापकीय संचालक संजय खताळ, बँकिंग तज्ञ गणेश निमकर ठाणे जिल्हा उपनिबंधक किशोर मांडव.

**गट क्रमांक – ५) गट प्रमुख** – माजी सहकार आयुक्त मधुकर चौधरी, माजी अपर आयुक्त दिनेश औउळकर, एस. बी. पाटील, निवृत्त प्राचार्य सी. डी. काणे, उपनिबंधक अभय केतकर.

**गट क्रमांक – ६) गट प्रमुख** – राज्य सहकारी गृहनिर्माण महासंघ अध्यक्ष सुहास पटवर्धन, राज्य सहकारी पतसंस्था महासंघ अध्यक्ष काका कोयटे, सीताराम राणे, पुणे उपनिबंधक नारायण आव्हाड.

# महेश सहकारी बँकेच्या इचलकरंजी शाखेचे नूतन वास्तूत स्थलांतर

**पुणे** – येथील महेश सहकारी बँकेच्या इचलकरंजी शाखेचे नुकतेच नूतन वास्तूत स्थलांतर करण्यात आले आहे. आमदार राहुल आवाडे तसेच नगरसेवक अनिल डाळ्या, राज्य नागरी सहकारी बँक महासंघ उपाध्यक्षा वैशाली आवाडे आणि उद्योजक, बँक खातेदार आदी उपस्थित होते.

बँक अध्यक्ष जुगलकिशोर पुंगलिया संचालक गोपाल राठी गणेश मुंदडा, कैलास झंवर, श्रीकांत सोनी, गोपाल जाजू मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद गावसाने, सरव्यवस्थापक राजशेखर यलशेट्टी यांनी स्वागत केले. बँकेच्या ठेवी ९५५.९६ कोटी असून कर्ज ६८५.८५ कोटी इतकी आहेत. बँकेचा स्वनिधी १७३.७३ कोटी असून एनपीए शून्य टक्के ठेवण्यात बँकेला यश मिळाले आहे.

# बँकेच्या दैनंदिन कामकाजात आवश्यक असणारी माहिती वेळोवेळी घेणे गरजेचे

## कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील सहकारी बँकांची कार्यशाळा




**कोल्हापूर –** बँकेच्या दैनंदिन कामकाजात आवश्यक असणारी माहिती वेळोवेळी आरबीआयकडून घेण्याची गरज असून आरबीआयच्या परिपत्रकांची माहिती कामकाज करताना नीटपणाने समजावून घेतली पाहिजे असे आवाहन आरबीआय आणि नाबार्ड संचालक सतीश मराठे यांनी केले आहे.

कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील सहकारी बँकासाठीची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यशाळेत दोन जिल्ह्यातील सहकारी बँकांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, तज्ञ संचालक, व्यवस्थापन मंडल सदस्य आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सहभागी झाले होते. महाराष्ट्र अर्बन को–ऑप. बँक्स महासंघ उपाध्यक्षा वैशाली आवाडे, सहकार भारती प्रशिक्षण संस्था उपाध्यक्ष शरद जाधव आदी पदाधिकारी उपस्थित होते.

आवाडे यांनी अर्बन बँकेमध्ये करता येणाऱ्या सुधारणा आणि कामकाजात येणाऱ्या अडचणी याबाबत सविस्तर विवेचन केले तर प्रशिक्षण संस्था उपाध्यक्ष जाधव यांनी प्रशिक्षण संस्थेविषयीची माहिती सांगितली.

जनसेवा सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र हिरेमठ, पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशनचे मानद सचिव सुभाष मोहिते, कोकण नागरी सहकारी बँक असोसिएशन उपाध्यक्ष सीए उदय कर्वे यांनी विविध विषयांची मांडणी केली.

कार्यशाळा सूत्रसंचालन संस्था संचालक उदय पेंडसे आणि सहकार सुगंध मासिकाचे संपादक भालचंद्र कुलकर्णी यांनी केले.

कार्यशाळा संयोजन सांगली अर्बन बँक संचालिका अश्विनी आठवले, बँकर्स चोईस संस्थापक हेमंत पराडकर यांनी केले. कार्यशाळा व्यवस्था धोंडीराम पागडे, अनघा गायकवाड, अस्मिता शिंदे यांनी केली.

# ‘विकसित भारत’ संकल्पनेला नवीन तंत्रज्ञानाची जोड देणे आवश्यक – प्रा. एस. महेंद्र देव

## सहकार डिजिटल शिखर परिषदेचे उद्घाटन

**पुणे –** विकसित भारत या संकल्पनेत सहकार चळवळीची भूमिका महत्वपूर्ण ठरणारी आहे. त्यासाठी नवीन तंत्रज्ञानाची जोड देणे आवश्यक आहे, असे मत पंतप्रधानांचे आर्थिक सल्लागार परिषदेचे अध्यक्ष प्रा. एस. महेंद्र देव यांनी सांगितले.

गोखले अर्थशास्त्र संस्थेच्या वतीने सहकार डिजिटल शिखर परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. परिषदेचे उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. आरबीआय आणि नाबार्ड संचालक सतीश मराठे, अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उमाकांत दास, संयोजक प्रवाश प्रधान, डॉ. मिश्रा व्यासपीठावर उपस्थित होते. दोन दिवसीय परिषदेत देशातील धोरणकर्ते, सहकारी बँकिंग क्षेत्रातील अभ्यासक, तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्या, फिंनटेक आदी सहभागी झाले आहेत.

डिजिटल परिवर्तनाद्वारे भविष्यासाठी सहकारी संस्था ही परिषदेची संकल्पना आहे.

प्रा. देव यांनी सांगितले की, विकसित भारत यामध्ये सहकार क्षेत्राची भूमिका महत्त्वाची असून त्यामध्ये भविष्याचा वेध, पारदर्शकता, नाविन्याचा शोध, आधुनिकता, अद्ययावत तंत्रज्ञान या बाबींचा समावेश असायला हवा. भारतीय अर्थव्यवस्था अधिक सक्षम आणि बळकट करण्यासाठी तसेच जीडीपी वाढण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञान अनिवार्य आहे. यामुळे अर्थकारण अधिक गतिमान होणार आहे. जागतिक स्तरावर नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यात आला आहे. तीच मानसिकता आपण जपण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे एआयचा वापर वाढत आहे. नवीन तंत्रज्ञानांमुळे ग्राहक आणि बाजारपेठेची व्याप्ती वाढत आहे.

भारतातील सहकार चळवळीचा आढावा घेत मराठे यांनी सांगितले की, सध्याच्या काळात विविध आव्हाने असली तरी नव तंत्रज्ञानाचा स्वीकार हा अपरिहार्य आहे. देशात सध्या साडे आठ लाख सहकार संस्था कार्यरत असून सुमारे ३० लाखांपेक्षा अधिक नागरिक सहकारी संस्थाशी जोडले आहेत. तसेच देशातील ८५ टक्के ग्रामीण भागातील जनता सहकार चळवळीशी जोडली आहे. मुळामध्ये या चळवळीला १०० वर्षापेक्षा अधिक काळाची परंपरा आहे. या चळवळीत युवकांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढण्याची गरज असून त्याबरोबर नवीन तंत्रज्ञान येणार आहे आणि त्याचा फायदा चळवळीला होणार आहे. चळवळीच्या वाढीबरोबर विकासावर भर देण्याची गरज आहे. मात्र गेल्या काही वर्षात संस्थांकडे व्हॉट बँक म्हणून पाहण्यात येत आहे, ही मानसिकता बदलण्याची गरज आहे असे ते म्हणाले.

संयोजक प्रधान यांनी स्वागत करून परिषदेच्या आयोजनमागची भूमिका सांगितली तर कुलगुरू दास यांनी परिषदेतील विविध विषयांची माहिती सांगितली. ते म्हणाले, डिजिटल यंत्रणा वापरत असताना साक्षरता वाढविणे आणि या क्षेत्रातील गुंतवणूक कशी वाढेल, हे पाहिले पाहिजे तरच विकसित भारत संकल्पना प्रत्यक्षात येण्यास हातभार लागणार आहे.

# राज्यातील सहकारी संस्थांना अत्याधुनिक प्रशिक्षण देणार

**पुणे –** राज्यातील सहकारी संस्था आणि सहकारात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना अत्याधुनिक यंत्रणायुक्त अशा प्रकारचे प्रशिक्षण देण्याचा निर्णय राज्य सहकारी संघाने घेतला आहे, अशी माहिती अध्यक्ष प्रवीण दरेकर यांनी सांगितली. संघाच्या संचालक समितीची बैठक येथे झाली. त्यानंतर त्यांनी ही माहिती सांगितली.

ते म्हणाले, सध्याच्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी राज्यातील सहकार क्षेत्र प्रशिक्षित करण्याची गरज आहे. त्यानुसार आवश्यक अशी यंत्रणा उभारण्यात येणार आहे. 'सहकारी महाराष्ट्र' हे मासिक सहकारी संस्था आणि कार्यकर्त्यांच्या शिक्षण आणि प्रशिक्षणासाठी प्रकाशित करण्यात येत आहे. आता हे मासिक नवीन स्वरूपात संघाच्या वतीने प्रकाशित करण्यात येणार आहे, असे ते म्हणाले.

अत्याधुनिक प्रशिक्षणामुळे सहकारी संस्थांचे कामकाज हे अधिकाधिक प्रमाणात गतिमान होवून लोकाभिमुख होण्यास हतभार लागणार आहे, असा प्रयत्न यामागे असल्याचे सांगण्यात आले.

# सभासदांना जपणारी संस्थाच मोठी होते - शशिकांत राजोबा

## दत्त संस्था व सहकार भारती आयोजित निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण




**शिराळा, सांगली –** सहकारी संस्था सभासदांना जपते, त्यांची काळजी घेते ती संस्था सर्वार्थाने मोठी होते असे महाराष्ट्र राज्य सहकारी पत संस्था फेडरेशनचे महासचिव शशिकांत राजोबा यांनी सांगितले. श्री दत्त नागरी सहकारी पतसंस्था उरूण-ईश्वरपूर व सहकार भारती सांगली जिल्हा ( ग्रामीण ) यांच्या संयुक्त विद्यमाने संस्था अंतर्गत निबंध स्पर्धेच्या बक्षिस वितरण सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

कोल्हापूर जिल्हा सहकार भारतीचे महामंत्री, महिला प्रमुख सारीका मुळे उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी सहकार भारतीचे विभाग सहसंघटक जवाहर छाबडा होते.

दत्त पत संस्थेच्या स्व. जी. एस. कुलकर्णी सभागृहात झालेल्या कार्यक्रमात दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर श्री भारतमाता, गुरूदेव दत्त व स्व.लक्ष्मणराव ईमानदार यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. स्वागत, प्रास्ताविक आणि प्रमुख अतिथींची ओळख दत्तचे अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीकांत चव्हाण यांनी करून दिली.

**⁕ निबंध संग्रहाचे प्रकाशन –**

स्पर्धेसाठी जे सर्व निबंध आले होते, त्यांच्या निबंध संग्रहाचे प्रकाशन व बक्षीस वितरण -

संचालक राजोबा, छाबडा, चौगुले यांच्या हस्ते करण्यात आले. राजोबा म्हणाले की, सहकारात संस्कार भरण्याचे काम सहकार भारती करत आहे. हीच संस्काराचा शिदोरी घेऊन श्री पतसंस्था गेली ३४ वर्षे काम करत आहे. संस्था मोठी आहे पण स्वतःचे डाटा सेंटर नाही. या संस्थेने १२ वर्षांपूर्वी स्वतःचे डाटासेंटर उभे करून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. यामागे संचालक मंडळाची दूरदृष्टी दिसून येते. नुसता व्यासंग असून चालत नाही तर मिळालेले ज्ञान कृतीत आणणारी संस्था म्हणजे श्री दत्त संस्था होय. सहकारात सामान्य व्यक्तीच कर्मचारी म्हणून मिळतात पण त्यांना असामान्य घडवण्याची जबाबदारी ही संस्थेची असते. ही जबाबदारी दत्त संस्थेने लीलया पार पाडलेली आहे असे ते म्हणाले.

सहकार भारतीचे काम, कर्मचारी, शाखाधिकारी, संस्था चालक मंडळ, सेवापुस्तिका, जादा व्याज देण्याचा धोका, नेपाळमध्ये सहकार संस्थामध्ये थकबाकी का नसते, प्रशिक्षण व त्यांची आवश्यकता का असते, स्वनिधी, १९९५ ते २००५ या काळात संस्था का बुडाल्या, संस्था राजकारणाच्या अड्डे कशा झाल्या इत्यादींवर परखड मार्गदर्शन केले.

अध्यक्षस्थानावरून बोलताना छाबडा म्हणाले की, संस्थेत पाऊल टाकल्यावर भारावून गेलो आहे. संचालक मंडळाचा व्यासंग प्रचंड आहे. केवळ व्यासंग असून उपयोग नाही तर ज्ञान कृतीत आणणे महत्त्वाचे आहे आणि ज्ञान कृतीत आणणारी माणसे श्री दत्त नागरी पतसंस्थेत आहेत, हे प्रत्यक्षात पाहता आले. ज्ञान मिळवण्याची लालसा वाखाणण्यासारखी आहे. नोकरी, व्यवसाय करताना ज्ञान घेणे महत्त्वाचे आहे. यासाठी दत्त पत संस्थेने निबंध स्पर्धा घेऊन एक चांगले पाऊल टाकले आहे. कर्मचारी, अधिकारी यांना केवायसी, सभासदाशिवाय ठेव का स्वीकारू नये? वारसदार नोंद का आवश्यक आहे. सी.आर.आर., एस.एल.आर., सी.डी.रेशो, आयकर कायदा, प्रशिक्षण का आवश्यक आहे, नेट एन.पी.ए इत्यादींवर छाबडा यांनी मार्गदर्शन केले.

**⁕ स्पर्धा आयोजनामागची भूमिका –**

संस्थापक प्राचार्य डॉ. पी. बी. कुलकर्णी यांनी निबंध स्पर्धा आयोजनाची माहिती सांगितली. उपाध्यक्ष बी.टी.निकम, विश्वास धस, सहकार भारतीचे वाळवा तालुका अध्यक्ष पांडुरंग वाघमोडे, संघटक बजरंग कदम, सुभाष खिलारे, सोमाजी कोळेकर, विजय पाटील, सूर्यवंशी, प्रसिद्धी सहाय्यक जगदिश गायकवाड, विजेते स्पर्धक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे नियोजन सहकार भारतीचे जिल्हाध्यक्ष सुमंत महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यलक्षी संचालक महेश कबाडे, संजय विभूते, मुमताज संदे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रदीप ताटे, संजय भक्ते, रवीकुमार पाटील, अमित माजगावकर यांनी परिश्रम केले. सूत्रसंचलन वारणा टिंगरे-बाऊचकर यांनी तर संचालिका सुखदा महाजन यांनी आभार मानले.

# राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा

**पुणे –** राज्यातील सहकारी संस्थांच्या काही कारणामुळे प्रलंबित असणाऱ्या निवडणुका घेण्याचे आदेश राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे अध्यक्ष अनिल कवडे यांनी दिले आहेत. यामुळे रक यातील सुमारे ११ हजार ४१ सहकारी संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे.

राज्यातील अ, ब, वर्गातील संस्थांच्या निवडणुकीचा कार्यक्रम हा थांबलेल्या टप्प्यापासून सुरू करण्यात येणार आहे. मध्यंतरी स्थानिक स्वराज्य संस्था, नगर परिषद, नगर पंचायत आणि जिल्हा परिषद निवडणुकीमुळे सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या होत्या. एकूण चार गटांनुसार सहकारी संस्थांची संख्या याप्रमाणे -

अ वर्ग संस्था - ७४, ब वर्ग संस्था - १३३३, क वर्ग संस्था - ३९४१ आणि ड वर्ग संस्था - ५६९३.

तर पुणे जिल्ह्यात एकूण ११५४ सहकारी संस्थांच्या निवडणुका प्रलंबित असून त्यामध्ये फक्त पुणे शहरात ३४३ संस्था तर अन्य संस्था जिल्ह्यात आहेत.

# राज्यातील उसाचा गाळप हंगाम संपत आल्याने कारखाने अडचणीत

**पुणे –** राज्यातील ऊस गाळप हंगाम केवळ नव्वद ते शंभर दिवसांवर आल्याने उर्वरित दिवस कारखाने कसे चालवायचे, ही नवीन समस्या ऊस कारखाना क्षेत्रात निर्माण झाली आहे. गाळप हंगाम लवकर संपत असल्याने कारखाने अडचणीत आले आहेत, असे राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.



उसाचे उत्पादन वाढवून गाळप कालावधी वाढवणे तसेच डिस्टलरी, सोलर, बायोसीएनजी आणि खाद्य बाजारपेठ या माध्यमातून गाळप हंगाम किमान दोनशे ते अडीचशे दिवस करण्यासाठी केंद्र सरकार आणि महासंघाचे प्रयत्न सुरू आहेत, अशी माहिती त्यांनी सांगितली.

राज्यात १ नोव्हेंबर रोजी ऊस गाळप हंगाम सुरू झाला. आत्तापर्यंत सत्तर टक्के कारखान्यांचे गाळप पूर्ण झाले असून १५ मार्चपर्यंत सर्व कारखाने बंद होण्याची शक्यता आहे. राज्यात पाच ते सहा वर्षांपूर्वी गाळप क्षमता प्रतिदिन साडे पाच लाख मेट्रिक टन होती. सध्या ती दुप्पट झाली आहे. पूर्वी जूनपर्यंत कारखाने सुरू राहायचे. आता गाळप क्षमता वाढली असली तरी कारखाने लवकर बंद होत असल्याने उत्पादकता वाढवणे हाच पर्याय आहे. याबाबत महासंघ, विस्मा आणि इतर संघटनांसोबत लवकरच बैठक घेण्यात येणार आहे. सोलर, बायोसीएनजी आणि खाद्य बाजारपेठ यासंदर्भात महासंघाने केंद्र सरकारला अहवाल पाठवला असून त्यावर केंद्र सरकारने समिती स्थापन केली आहे. चार-पाच वर्षांनी कारखान्यांचा कालावधी वाढू शकेल, असे पाटील यांनी सांगितले.

आंतरराष्ट्रीय बाजारात साखर दरात मंदी आहे, असे नमूद करून ते म्हणाले आंतरराष्ट्रीय दर प्रति क्विंटल साडेतीन हजार रुपयांपर्यंत आहे. साखरेचा यावर्षीचा देशांतर्गत वापर २७५ लाख मेट्रिक टन आहे. लोकसंख्या वाढत आहे. मात्र, साखरेचा वापर कमी होत असल्याने साखर उद्योग अडचणीत आला आहे. त्यावर उपाय म्हणून इथेनॉलचा कोटा साठ कोटीने वाढविण्याची मागणी केंद्र सरकारकडे केली आहे. देशात ५ कोटी शेतकरी ऊस पिकवतात. उसाचा रास्त व किफायतशीर दराची (एफआरपी) देशातील थकबाकी सात ते आठ कोटी आणि राज्यात सुमारे चार हजार कोटी रुपये आहे. एफआरपी वेळेत देण्यासाठी साखरेची किमान विक्री किंमत ४१०० रुपये करा, अशी मागणी केंद्र सरकारकडे केली आहे.

सन २०२५-२६ या गाळप हंगामात देशात २२५ लाख टन साखरेचे उत्पादन झाले आहे. राज्यातील उसाचे उत्पादन गेल्या वर्षीपेक्षा जास्त असूनही दैनंदिन गाळप क्षमतेत वाढ झाल्याने चालू वर्षाचा ऊस हंगाम उशिरा सुरू होऊनही १५ मार्चपर्यंत संपण्याची शक्यता आहे. ऊस तोडीसाठी केन हारवेस्टरचा वापर वाढला आहे. १५ फेब्रुवारीपर्यंत देशातील ४५४ साखर कारखान्यांपैकी ८० साखर कारखान्यांचे गाळप पूर्ण झाले आहे. महिना अखेरीस १६० कारखाने बंद होतील, असे ते म्हणाले.

# स्थलांतरित ऊसतोडणी व महिला कामगारांच्या संरक्षणासाठी नवीन पथदर्शी प्रकल्प

**पुणे –** राज्यातील स्थलांतरित ऊसतोड कामगार आणि त्यांच्या कुटुंबांच्या, विशेषतः महिला कामगारांच्या संरक्षणासाठी महाराष्ट्र सरकार एक नवीन पथदर्शी आणि नाविन्यपूर्ण प्रकल्प (Collaborative Model) राबवत आहे. साखर कारखाने, सरकारी योजना आणि स्थानिक स्वयंसेवी संस्था यांना प्रभावीपणे जोडून हा उपक्रम राबविला जाणार आहे. साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांच्या अध्यक्षतेखाली एका उच्चस्तरीय राज्यस्तरीय गोलमेज परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये वरील निर्णय घेण्यात आला.



ऊसतोड हंगामासाठी दरवर्षी जिल्ह्याबाहेर स्थलांतर करणाऱ्या हंगामी कामगारांना शासन व संस्थांची अस्तित्वातील धोरणे आणि कल्याणकारी योजनांचे लाभ प्रत्यक्ष क्षेत्रीय स्तरावर मिळवून देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे, असे यावेळी ठरविण्यात आले.

साखर आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात झालेल्या परिषदेत ७ महत्त्वाचे शासकीय विभाग, ७० पेक्षा जास्त साखर कारखाने, २ उद्योग संघटना आणि विविध स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. शाश्वत ऊस उत्पादनासाठी जागतिक व्यासपीठ असलेल्या 'बॉन्सुक्रो' (Bonsucro) आणि 'विस्मा' अर्थात वेस्ट इंडिअन शुगर मिल्स असोसिएशन (WISMA) यांच्या सहकार्याने, या क्षेत्रातील सामाजिक शाश्वतता मजबूत करण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली होती.

साखर आयुक्त डॉ. कोलते म्हणाले, महाराष्ट्राच्या साखर अर्थव्यवस्थेत उत्पादना इतकेच ऊस तोडणी करणाऱ्या कामगारांचे, विशेषतः स्थलांतरित महिला कामगारांचे संरक्षण करणे महत्त्वाचे आहे. विविध सरकारी विभागांमधील समन्वय सुधारून आणि साखर कारखाने व नागरी संस्थांशी भागीदारी करून, आम्ही प्रत्येक कामगाराला त्यांना आवश्यक सरकारी व संस्थात्मक सेवा मिळवून देऊ शकतो.

चर्चेत स्थलांतरित ऊसतोड कामगारांना आरोग्य सेवा,शिक्षण आणि कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यातील अडचणींवर लक्ष केंद्रित करण्यात आले. विशेषतः महिला कामगारांवर शेतातील कष्टाच्या कामासोबतच कुटुंबाच्या संगोपनाची जी अतिरिक्त जबाबदारी असते, त्याकडे लक्ष वेधण्यात आले.

पुणे विभागाचे अप्पर कामगार आयुक्त बी. बी. वाघ म्हणाले, ऊसतोड कामगारांसाठीच्या सन्मानजनक कामाची व्याप्ती केवळ शेतापुरती मर्यादित राहता कामा नये. शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्यासाठी अंमलबजावणी यंत्रणा मजबूत केली पाहिजे, जेणेकरून व्यावसायिक सुरक्षा, सामाजिक संरक्षण आणि तक्रार निवारण यंत्रणा कामगारांपर्यंत पोहोचेल. सार्वजनिक आरोग्य विभागाचे अप्पर संचालक डॉ. संदीप सांगळे यांनी स्थलांतरित कुटुंबांसाठी सेवांच्या निरंतरतेवर भर दिला. ते म्हणाले, जेव्हा कुटुंबे कामासाठी स्थलांतर करतात तेव्हा त्यांचे आरोग्य, पोषण आणि मुलांचे शिक्षण मागे पडता कामा नये. कारखाने आणि संस्थांच्या सहकार्यामुळे आम्ही गरजूंपर्यंत या सेवा पोहोचवू शकू.

या परिषदेत 'बॉन्सुक्रो-विस्मा' (Bonsucro - WISMA) यांच्या 'ग्रो' (GROW - Gender Rights Opportunity and Work Empowerment) या पथदर्शी कार्यक्रमाला मान्यता देण्यात आली. हा प्रकल्प सोलापूर, पुणे, कोल्हापूर आणि विजापूर जिल्ह्यांमध्ये राबवला जाणार असून तो कारखान्यांच्या स्तरावरील कृती आणि सरकारी वितरण प्रणाली यांच्यात समन्वय साधेल.

वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन (विस्मा)चे कार्यकारी संचालक अजित चौगुले यांनी सांगितले की, महिला ऊसतोड कामगारांच्या अनुभवांना प्राधान्य देऊन एक सर्वसमावेशक आणि शाश्वत मॉडेल तयार करू शकतो. राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे (MSRLM) उपसंचालक संदीप जठार यांनी सामाजिक संरक्षणासह कौशल्य विकासावर भर दिला.

महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघाचे व्यवस्थापकीय संचालक संजय खताळ म्हणाले, राज्याच्या अर्थव्यवस्थेत मोठे योगदान देणाऱ्या स्थलांतरित कामगारांना विमा संरक्षण मिळणे अत्यंत आवश्यक आहे. गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाचे सरव्यवस्थापक केंद्रे व्ही. एस. यांनी महामंडळामार्फत दिल्या जाणाऱ्या सुविधांची माहिती दिली.

पुढील सहा महिन्यांत ४ ते ५ जिल्ह्यांमध्ये या मॉडेलची व्याप्ती वाढवण्यासाठी एक आराखडा तयार करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

# सहकार भारती आयोजित परिषदेत नवीन सहकार धोरणावर चर्चा

**चंद्रपूर –** सहकार भारती चंद्रपूर जिल्हा, चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन सहकार धोरणावरील चर्चासत्र कार्यक्रम जिल्हा बँकेच्या सभागृहात झाले.

भारतीय रिझर्व बँकेचे व नाबार्डचे संचालक सतीश मराठे, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष रविंद्र शिंदे, प्रदेश महामंत्री व सहकार धोरण उच्चस्तरीय समिती सदस्य विवेक जुगादे उपस्थित होते.

आरबीआय संचालक मराठे यांनी देशाच्या सहकार धोरणावर प्रकाश टाकला. देशाच्या सहकार धोरणामुळे हे क्षेत्र अधिक गतिमान होणार असल्याचे सांगितले. प्रदेश महामंत्री जुगादे यांनी राज्याच्या नवीन सहकार धोरणामागील संकल्पना विशद केली. राज्याचे नवे सहकार धोरण संपूर्ण सहकार क्षेत्राला नवी ऊर्जा व दिशा देणारे ठरेल बँकेचे अध्यक्ष शिंदे यांनी सूचना केल्या.



सहकार भारती प्रदेश सचिव विनोद भीमनवार, नागपूर विभाग सहप्रमुख विजय गोटे, प्रदेश पदाधिकारी अनिल मेंढे, जिल्हाध्यक्ष सतीश वासमवार, महामंत्री पुष्पा गोटे, सहाय्यक निबंधक गणेश काळे, लेखा परिक्षण अधिकारी बनसोड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कल्याणकर माजी आमदार अतुल देशकर, भाग्यश्री पतसंस्थेचे अध्यक्ष किशोर महालक्ष्मे, महेश मसुरकर, प्रगती मढई, आतिश कानापूरवार, सुरज बोम्मावार आणि पदाधिकारी कार्यकर्ते सहकारी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# चंद्रपूर जिल्हा सहकारी बँकेच्या वतीने सहकार आयुक्त तावरे यांचा सन्मान



पुणे – राज्याचे सहकार आयुक्त दिपक तावरे यांची चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकांनी सदिच्छा भेट घेतली आणि विविध विषयांवर सविस्तर चर्चा केली.

आमदार किर्तीकुमार भांगडिया यांच्या मार्गदर्शनात बँकेचे कार्य सुरू असून बँकेच्या प्रगतीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बँकेने शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी राबवलेल्या विविध कल्याणकारी योजना आणि व्यवस्थापनाने घेतलेले ठोस निर्णय यांचा आढावा आयुक्तांना देण्यात आला. बँकेच्या वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज लिखित 'ग्रामगीता' भेट देऊन आयुक्त तावरे यांचा सत्कार करण्यात आला.

उपाध्यक्ष संजय डोंगरे, संचालक रोहित बोम्मवार माजी आमदार सुदर्शन निमकर, तसेच आवेश खान पठाण, जयंत टेमुर्डे, दिनेश चोखारे, गणेश तळवेकर विजय बावणे, निशिकांत बोरकर, मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश्वर कल्याणकर उपस्थित होते.

# शेतकऱ्यांच्या कर्ज माफीची प्रक्रिया शासनाकडून सुरू

**चंद्रपूर –** शेतकऱ्यांच्या कर्ज माफीची प्रक्रिया शासनाने सुरू केली असून तसे आदेश शासनाने बँकांना दिले असल्याची माहिती आमदार कीर्तीकुमार भांगडिया यांनी सांगितले. चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आयोजित प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन जिल्हा उपनिबंधक जयकुमार ठाकुर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रबंध संस्थाचे धनंजय गाङगीळचे प्रशांत शिर्के, डॉ. सीमा मिश्रा, जिल्हा विकास व्यवस्थापक तृणाल फुलझेले तसेच बँक अध्यक्ष रवींद्र शिंदे, माजी गृहराज्यमंत्री हंसराज अहिर, आमदार कारण देवतळे, बँक उपाध्यक्ष संजय डोंगरे आदी यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमात बँकेच्या कर्ज धोरण विषयक पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

बँक अध्यक्ष शिंदे यांनी सांगितले की, शेतकऱ्यांनी खात्याबाबतची सर्व माहिती बँकेला सादर करावी.

# वर्धा जिल्हा सहकार भारती बैठकीत सदस्यता मोहीमेवर व्यापक चर्चा

**हिंगणघाट –** वर्धा जिल्हा सहकार भारती कार्यकारिणीची बैठक महाराष्ट्र प्रदेश सहकार भारतीचे विभाग प्रमुख संजय रोकडे यांचे अध्यक्षतेत घेण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून हिंगणघाट तालुका सहकार भारती उपाध्यक्ष प्रा. लीना शेंडे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे संघटन कौशल्य यावर मनोगत व्यक्त केले.

सहकार भारती नागपूर विभाग प्रमुख संजय रोकडे यांनी सहकार भारतीचे सदस्यता मोहिमेबाबत मार्गदर्शन करुन सदस्य मोहीम राबविण्यात यावी असे सांगितले. तसेच जिल्ह्याच्या विविध भागात सदस्यता मोहिम यशस्वीपणाने कशा प्रकारे राबवता येईल याबाबतही बैठकीमध्ये विचार विनीमय करण्यात आला.

नागपूर विभाग प्रशिक्षण प्रमुख संदीप भोंगाडे सहप्रशिक्षण प्रमुख गुलाब छवारे उपस्थित होते. वर्धा जिल्हा सहकार भारतीचे महामंत्री शामकुमार खत्री सूत्रसंचालन तर हिंगणघाट तालुका महामंत्री नंदकुमार सिंगरू यांनी आभार मानले.

सभेला वर्धा जिल्हा सहकार भारतीचे अध्यक्ष प्रभाकर कोळसे, तसेच मनोज पाचखेडे, प्रशांत मुळे, चंद्रकांत अग्नीहोत्री गजानन खाडे, भास्कर थोटे, रितेश पिपलवा, सचिन कापकर, नंदकुमार सिंगरु, शेखर दाते, संजय तराळे, प्रा. लिना शेंडे, सपना जाना, रितेश वाघमारे, यशवंत डोळस उपस्थित होते.

# सहकार भारती मुंबई विभाग आयोजित पतसंस्था प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वी




**मुंबई –** सहकार भारतीच्या वतीने पतसंस्था प्रशिक्षण कार्यक्रम अंधेरी येथे पार पडला. सहकार भारती सन २०१४ पासून सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या पतसंस्थेचे अध्यक्ष, पदाधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करीत आहे.

पतसंस्था प्रशिक्षण कार्यक्रम नियोजनपूर्वक झाला. त्यात २० संस्थांचे प्रतिनिधी नोंदणी करून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात भारत माता आणि सहकार महर्षी पूजनाने करण्यात आली. संपूर्ण 'वन्दे मातरम्' गीत आणि सहकार गीत झाले.

विजय जोशी यांनी सध्याच्या प्रगत तंत्रज्ञांच्या युगातील प्रगत साधनांचा (डिजिटल मार्केटिंग) संस्था वाढीसाठी कसा उपयोग आणि वापर करावा यावर विवेचन केले. प्रमोद कुलकर्णी आणि सेवानिवृत्त सहनिबंधक विनायक साखरे आणि भूषण पैठणकर यांनी प्रतिनिधींना मार्गदर्शन केले.

सत्यविजय सावंत, प्रभाकर पाटील, गणेश खिल्लारे पतसंस्था प्रकोष्ठ प्रमुख एल. घाणेकर, सहप्रमुख सचिन पवार, प्रियांका करंजावकर, तालुका महिला प्रमुख जिल्हा कार्यकारिणी सदस्य अमिता पाते, महिला सहप्रमुख, मनीषा चव्हाण, महिला प्रमुख स्मिता मोटे, सहसंघटन प्रमुख तसेच जिल्हा अध्यक्ष तानाजी गुजर, महामंत्री योगेश राणे, संगटन प्रमुख सत्यविजय सावंत, प्रदेश कार्यकारिणी सदस्य रामकृष्ण आवारे यांनी व्यवस्था पाहिली. मुंबईचे संघटन प्रमुख संतोष सुर्वे, प्रदेश सचिव आणि मालाड सहकारी बँकेचे संचालक भूषण पैठणकर यांनी मार्गदर्शन केले.

# पूर्णवादी सहकारी बँकेचा ४१ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा



**बीड –** पूर्णवादी नागरिक सहकारी बँकेचा ४१ वा वर्धापनदिन बँकेच्या मुख्य कार्यालयात उत्साहात साजरा करण्यात आला. गेली ४१ वर्षे बँक सातत्य, सहकार सचोटी, समृद्धी हे ब्रीद घेऊन अविरत सेवा देत आहे. बँकेच्या एकूण २५ शाखा आहेत.

बँकेसोबत अनेक ग्राहक, सभासद जोडले गेले आहेत. बँकेच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अ‍ॅड. कालिदासराव थिगळे, अ‍ॅड. विजयकुमार देशपांडे, ह.भ.प. विनायक महाराज पाटांगणकर, नगरसेवक परशुराम गुरखुदे, नगरसेवक सागर देशपांडे, चंद्रकांत नवले, अ‍ॅड. कीर्ती जोशी, अ‍ॅड. शार्दुल देशपांडे, अ‍ॅड. अमृत पाठक, व्यावसायिक सुनील कोटेचा, राजूसेठ मुनोत, कैलास मैड, संतोष सारडा, उज्ज्वल कोटेचा, प्रमोद निनाळ, अजिंक्य बनसोडे, भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, चंद्रकांत मुळे, इंजि. रमेश ढाकणे, इंजि. रोहित कोलंगडे, सुहास लाऊळकर, तसेच बँकेचे इतर सभासद ग्राहक, हितचिंतक यांनी बँकेच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

बँकेच्या ४१ व्या वर्धापनदिनानिमित्ताने बँकेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रल्हाद राजुरीकर यांच्या हस्ते सपत्नीक श्री सत्यनारायनाची पूजा झाली. बँकेचे अध्यक्ष डॉ. सुभाष जोशी, संचालक डॉ. विवेक पालवनकर, डॉ. सुरेखा देशमुख, बँकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# डीएमके जावळी सहकारी बँकेची नवी मुंबईतील तुर्भे शाखा सुरू

**कुडाळ –** डीएमके जावळी सहकारी बँकेची २५ वी शाखा नवी मुंबईतील तुर्भे या ठिकाणी सुरू करण्यात आली आहे. आमदार शशिकांत शिंदे, कामगार नेते नरेंद्र पाटील, नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील, बँक अध्यक्ष विक्रम भिलारे तसेच संचालक, अधिकारी या वेळी उपस्थित होते. आमदार शिंदे यांनी सांगितले, की सदस्यांचे हित जोपासणे आणि उद्योजक यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, या भूमिकेने बँकेने आजवर काम केले आहे. सर्वसामान्यांच्या हितासाठी बँक सदैव कार्यरत आहे. अध्यक्ष भिलारे यांनी मनोगतात बँकेच्या वाटचालीचा आढावा घेतला.

# सहकारी संस्थांसाठी MSME मार्गदर्शक: कोणत्या संस्थेला कोणता लाभ आणि कितीपर्यंत?

**१. सहकारी संस्थांसाठी MSME (उद्यम) नोंदणी व लाभ –**

भारतातील सहकार चळवळ ही केवळ सामाजिक-आर्थिक संघटना म्हणून मर्यादित राहिलेली नाही; अनेक क्षेत्रांमध्ये ती एक पूर्ण विकसित व्यावसायिक व्यवस्था (enterprise ecosystem) म्हणून उभी राहिली आहे. दुग्धव्यवसाय, कामगार, विपणन, ग्राहक, मत्स्य, हातमाग, कृषी-आधारित प्रक्रिया, वाहतूक, सेवा, औद्योगिक उत्पादन, महिला स्वयं-साहाय्य गटांवर आधारित सहकारी संस्था – या सर्व संस्था आज मोठ्या प्रमाणावर वस्तू (Goods) आणि सेवा (Services) यांचा प्रत्यक्ष पुरवठा करतात.

अशा परिस्थितीत हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा ठरतो की सहकारी संस्था MSME (Micro, Small Medium Enterprises) अंतर्गत नोंदणी करू शकतात का, आणि MSME चे लाभ नेमक्या कोणत्या सहकारी संस्थांना उपलब्ध होतात.



पुष्पिंदर कुमार राय

हा लेख MSME च्या सुधारित वर्गीकरण निकषांबाबत (Amended MSME Classification Criteria), सहकारी संस्थांची पात्रता, तसेच कोणत्या प्रकारच्या सहकारी संस्थांना MSME चे कोणते लाभ प्रत्यक्षात मिळू शकतात, याबाबत कायदेशीर आणि व्यावहारिक दृष्टिकोनातून स्पष्टता देतो.

**२. MSME चे कायदेशीर आधार आणि उद्यम नोंदणी**

MSME क्षेत्रासाठी प्रमुख कायदा म्हणजे Micro, Small and Medium Enterprises Development Act, 2006 (MSMED Act, 2006) होय. MSME म्हणून ओळख मिळवण्यासाठी सध्या भारत सरकारने Udyam Registration (उद्यम नोंदणी) प्रणाली लागू केली आहे. ही नोंदणी MSME असल्याचा अधिकृत पुरावा मानली जाते आणि MSME लाभ मिळवण्यासाठी याच नोंदणीचा आधार घेतला जातो.

सहकारी संस्थांच्या संदर्भात सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे MSME अंतर्गत येण्यासाठी संस्थेचा कायदेशीर प्रकार (उदा. कंपनी, LLP, भागीदारी फर्म किंवा सहकारी संस्था) निर्णायक नसतो. निर्णायक बाब म्हणजे ती संस्था प्रत्यक्षात व्यावसायिक कार्य करत आहे का आणि ती चडचए साठी निश्चित आर्थिक मर्यादेत येते का.

**३. सुधारित MSME वर्गीकरण (१ एप्रिल २०२५ पासून लागू)**

MSME वर्गीकरणात १ एप्रिल २०२५ पासून लागू झालेल्या बदलांनंतर MSME च्या मर्यादा लक्षणीयरीत्या वाढवण्यात आल्या आहेत. आता MSME वर्गीकरण दोन निकषांवर आधारित असते –

(i) प्लांट आणि मशीनरी / उपकरणांमध्ये गुंतवणूक (Investment) आणि (ii) वार्षिक उलाढाल (Turnover) या दोन निकषांवर MSME वर्गीकरण ठरते. कोणत्याही श्रेणीत येण्यासाठी उद्योगाने गुंतवणूक आणि उलाढाल या दोन्ही मर्यादांमध्ये असणे आवश्यक आहे.

**⁎ सुधारित मर्यादांनुसार:**

Micro **उद्योग –** गुंतवणूक २.५ कोटींपर्यंत आणि उलाढाल १० कोटींपर्यंत

Small **उद्योग –** गुंतवणूक २५ कोटींपर्यंत आणि उलाढाल १०० कोटींपर्यंत

Medium **उद्योग –** गुंतवणूक १२५ कोटींपर्यंत आणि उलाढाल ५०० कोटींपर्यंत

हा बदल सहकारी संस्थांसाठी विशेषतः लाभदायक आहे, कारण आता अनेक मोठे सहकारी उपक्रमही MSME अंतर्गत समाविष्ट होऊ शकतात.

**४. सहकारी संस्थांसाठी MSME लाभ: तीन प्रमुख श्रेणी**

MSME लाभ समजून घेण्यासाठी त्यांना तीन भागांत पाहणे आवश्यक आहे.

पहिला भाग वैधानिक अधिकारांचा आहे, जो MSMED Act, 2006 अंतर्गत येतो. यात सर्वात महत्त्वाचा अधिकार म्हणजे विलंबित देयकांबाबतचा (Delayed Payment) संरक्षण.

दुसरा भाग सरकारी टेंडर आणि खरेदी प्रक्रियेतील लाभांचा आहे. यात EMD सवलत, प्राधान्य, तसेच पात्रतेतील सुलभता असे लाभ येतात.

तिसरा भाग कर्ज, अनुदाने (subsidy) आणि विविध योजना यांचा आहे. हे लाभ पूर्णपणे योजना-विशिष्ट (scheme-specific) असतात आणि प्रत्येक योजनेसाठी स्वतंत्र पात्रता निकष लागू असतात.

**५. MSME चा सर्वात प्रभावी लाभ: विलंबित देयकांवर कायदेशीर संरक्षण**

MSMED Act अंतर्गत MSME साठी सर्वात मजबूत आणि प्रत्यक्षात लागू होणारा अधिकार असा आहे की, जर MSME उद्योगाने कोणत्याही खरेदीदाराला वस्तू किंवा सेवा पुरवल्या आणि त्याचे देयक वेळेत मिळाले नाही, तर खरेदीदाराने जास्तीत जास्त ४५ दिवसांच्या आत देयक अदा करणे बंधनकारक आहे.

जर देयक ४५ दिवसांपेक्षा उशिरा मिळाले, तर MSME उद्योगाला RBI च्या बँक दराच्या तिप्पट दराने चक्रवाढ व्याज (compound interest) घेण्याचा अधिकार असतो.

याशिवाय MSME उद्योग आपला दावा Micro and Small Enterprises Facilitation Council (MSEFC) कडे दाखल करू शकतो, जिथून आदेश मिळवून वसुली करता येते.

हा लाभ विशेषतः त्या सहकारी संस्थांसाठी अत्यंत उपयुक्त आहे ज्या प्रत्यक्षात वस्तू किंवा सेवा पुरवतात आणि ज्यांचे खरेदीदार (सरकारी विभाग, कंपन्या, संस्था, PSU, मोठे व्यापारी इ.) देयक देण्यात विलंब करतात.

**६. कोणत्या प्रकारच्या सहकारी संस्थांना MSME चे लाभ उपलब्ध होतात** (Co-operative Type-wise Analysis)

सहकारी संस्थांना MSME चे लाभ प्रत्यक्षात मिळण्याची स्थिती त्यांच्या कार्याच्या स्वरूपावर अवलंबून असते. ज्या सहकारी संस्था वस्तू किंवा सेवांचा व्यावसायिक पुरवठा करतात, त्यांच्यासाठी MSME अत्यंत उपयुक्त ठरते; तर ज्या संस्था मुख्यतः सदस्य-आधारित व्यवस्थापन किंवा आर्थिक व्यवहारांपुरत्याच मर्यादित असतात, त्यांच्यासाठी MSME चे लाभ मर्यादित राहतात.

दुग्ध सहकारी संस्था MSME साठी सर्वात योग्य श्रेणी मानल्या जातात. या संस्था दूध संकलन, प्रक्रिया, पॅकिंग आणि विक्री करतात, त्यामुळे हा स्पष्टपणे वस्तू उत्पादन व पुरवठ्याचा प्रकार ठरतो. जर एखाद्या दुग्ध सहकारी संस्थेची गुंतवणूक १२ कोटी आणि उलाढाल ८० कोटी असेल, तर सुधारित मर्यादेनुसार ती Small Enterprise म्हणून वर्गीकृत होईल. अशा परिस्थितीत जर डीलर किंवा वितरक देयक उशिरा देत असतील, तर ही सहकारी संस्था MSMED Act अंतर्गत MSEFC कडे दावा दाखल करून व्याजासह वसुली करू शकते. याशिवाय सरकारी रुग्णालये, वसतिगृहे आणि PSU यांना पुरवठ्यासाठीच्या टेंडरमध्ये MSME लाभही मिळू शकतात.

कृषी प्रक्रिया, उत्पादन आणि विपणन सहकारी संस्था (उदा. धान्य,

पुढील पानावर...

मागील पानावरून...

# सहकारी संस्थांसाठी MSME मार्गदर्शक....

डाळी, मसाले, भाजी प्रक्रिया, बियाणे उत्पादन, पॅकिंग इ.) देखील MSME साठी अत्यंत योग्य आहेत. या संस्था उत्पादन आणि पुरवठा दोन्ही करतात. त्यामुळे त्यांना विलंबित देयक संरक्षण, टेंडर लाभ आणि अनेक योजनांचा प्रत्यक्ष फायदा मिळू शकतो.

मत्स्य सहकारी संस्था ज्या मासेमारी, प्रक्रिया, कोल्ड-चेन, पुरवठा आणि निर्यात यांसारख्या कामांमध्ये गुंतलेल्या असतात, त्या देखील MSME अंतर्गत येऊ शकतात. अशा संस्थांसाठी MSME चे लाभ विशेषतः संस्थात्मक खरेदीदारांकडून विलंबित देयकांची वसुली करण्यासाठी उपयुक्त ठरतात.

कामगार/लेबर कॉन्ट्रॅक्ट सहकारी संस्था ज्या मनुष्यबळ पुरवठा, हाऊसकीपिंग, सुरक्षा सेवा, लोडिंग-अनलोडिंग, स्वच्छता, आउटसोर्सिंग अशा सेवा देतात, त्यांच्यासाठी MSME लाभ अत्यंत महत्त्वाचे ठरतात. सेवा क्षेत्रात देयकांचा विलंब खूप सामान्य असतो आणि MSEFC मार्फत वसुलीचा अधिकार या संस्थांसाठी प्रत्यक्षात एक संरक्षण कवच ठरतो.



ग्राहक सहकारी संस्था (Consumer Co-operatives) ज्या संस्थांना साहित्य पुरवतात किंवा किरकोळ / घाऊक व्यापार करतात, त्या देखील MSME अंतर्गत येऊ शकतात. अशा संस्थांसाठी टेंडरमध्ये सहभाग आणि विलंबित देयक संरक्षण हे दोन्ही लाभ उपयुक्त ठरू शकतात.

हातमाग, हस्तकला, कारागीर, महिला सहकारी संस्था (Weavers / Artisan / Women Co-operatives) जर उत्पादन आणि विक्री करीत असतील, तर MSME चे लाभ त्यांच्यासाठीही अत्यंत महत्त्वाचे ठरू शकतात. या संस्था अनेकदा सरकारी संस्थांना, हँडीक्राफ्ट एम्पोरियमना, निर्यात संस्थांना किंवा खासगी खरेदीदारांना पुरवठा करतात, जिथे देयक विलंबाची समस्या वारंवार उद्भवते. MSME नोंदणीमुळे त्यांना कायदेशीर संरक्षण मिळते तसेच सरकारी योजनांपर्यंत पोहोच वाढते.

वाहतूक/ट्रान्सपोर्ट सहकारी संस्था जर व्यावसायिक वाहतूक सेवा पुरवत असतील आणि MSME च्या मर्यादेत येत असतील, तर त्या MSME अंतर्गत समाविष्ट होऊ शकतात. अशा संस्थांना विलंबित देयक संरक्षण आणि काही टेंडर लाभ उपलब्ध होऊ शकतात, विशेषतः त्या सरकारी किंवा PSU लॉजिस्टिक्स टेंडरमध्ये सहभागी होत असतील तर.

औद्योगिक/उत्पादन सहकारी संस्था (उदा. लघुउद्योग उत्पादन, अभियांत्रिकी, पॅकेजिंग, बांधकाम साहित्य, रेडीमेड कपडे, फूड प्रोसेसिंग इ.) यांच्यासाठी MSME सर्वाधिक उपयुक्त ठरते. या संस्थांसाठी MSMED Act अंतर्गत अधिकार, टेंडर लाभ आणि विविध योजनांपर्यंत पोहोच सर्वाधिक प्रभावी असते.

याउलट गृहनिर्माण सहकारी संस्था साधारणतः MSME साठी योग्य ठरत नाहीत. हाउसिंग सोसायटीचे काम सदस्य-आधारित देखभाल, सुविधा व्यवस्थापन आणि मेंटेनन्स शुल्क गोळा करणे इतक्यापुरते मर्यादित असते. ती वस्तू किंवा सेवांचा व्यावसायिक पुरवठा करणारी संस्था नसल्यामुळे MSME चे मुख्य लाभ (उदा. MSEFC मार्फत वसुली) सहसा लागू होत नाहीत.

त्याचप्रमाणे पतसंस्था / थ्रिफ्ट व क्रेडिट सहकारी संस्था ज्या मुख्यतः कर्ज देतात, ठेवी स्वीकारतात आणि व्याज उत्पन्न मिळवतात, त्यांच्यासाठी MSME चे लाभ मर्यादित असतात. MSMED Act मधील विलंबित देयकाची तरतूद प्रामुख्याने वस्तू किंवा सेवांच्या पुरवठ्यावर आधारित आहे, तर कर्जपुरवठा / क्रेडिट व्यवहार साधारणपणे त्या श्रेणीत येत नाहीत. त्यामुळे अशा क्रेडिट सहकारी संस्थांनी MSME नोंदणी केली तरीही MSEFC मार्फत विलंबित देयक वसुलीचा प्रत्यक्ष फायदा त्यांना सहसा मिळत नाही.

**७. MSME टेंडर लाभ: सहकारी संस्थांसाठी स्थिती**

MSME नोंदणी झाल्यास अनेक सरकारी टेंडरमध्ये MSME उद्योगांना EMD सवलत, अनुभव किंवा उलाढालीतील सुलभता, तसेच खरेदीत प्राधान्य असे लाभ दिले जातात. जर टेंडर कागदपत्रात स्पष्ट नमूद असेल की Udyam registered MSME bidders ना लाभ दिले जातील, तर सहकारी संस्था देखील हे लाभ घेऊ शकते, परंतु टेंडर दस्तऐवजात सहकारी संस्थांना विशेषतः वगळलेले नसणे आवश्यक आहे.

म्हणूनच सहकारी संस्थांनी टेंडरमध्ये सहभागी होण्यापूर्वी टेंडरच्या अटी काळजीपूर्वक वाचणे अत्यावश्यक आहे.

**८. कर्ज, अनुदाने आणि योजना: सहकारी संस्थांसाठी प्रत्यक्ष स्थिती**

MSME नोंदणी म्हणजे सहकारी संस्थेला आपोआप कर्ज किंवा अनुदान मिळेल असा अर्थ होत नाही. हे लाभ पूर्णपणे योजना-विशिष्ट (scheme-specific) असतात आणि प्रत्येक योजनेसाठी स्वतंत्र पात्रता निकष लागू असतात.

बँका आणि वित्तीय संस्था सहकारी संस्थांसाठी त्यांच्या आंतरिक कर्ज धोरणांनुसार (internal lending policy) निर्णय घेतात. अनेकदा सहकारी संस्थेचे उपनियम (bye-laws), अनुपालन स्थिती, लेखापरीक्षित अहवाल (audited accounts) आणि कर्ज घेण्याचे अधिकार यांवर कर्ज मंजुरी अवलंबून असते. म्हणून MSME नोंदणीला पात्रता सक्षम करणारे साधन (eligibility enabler) म्हणून समजावे, स्वयंचलित हक्क (automatic entitlement) म्हणून नव्हे.

**९. MSME नोंदणी आणि कर लाभ** (Income Tax / GST)

MSME नोंदणीमुळे स्वतंत्रपणे कोणतीही आयकर किंवा GST सूट मिळत नाही. सहकारी संस्थांना आयकरातील जे लाभ मिळतात, ते प्रामुख्याने Section 80P सारख्या तरतुदींमुळे मिळतात, जे MSME पासून स्वतंत्र आहेत.

GST मध्येही सवलत ही उलाढाल मर्यादा (turnover threshold) किंवा अधिसूचनेवर आधारित असते, MSME नोंदणीवर नाही.

म्हणून MSME नोंदणीचा मुख्य उपयोग साधारणतः विलंबित देयकांपासून संरक्षण, टेंडरमध्ये सहभाग, योजनांपर्यंत प्रवेश यांपुरताच मर्यादित मानला जातो.

*** निष्कर्ष** – १ एप्रिल २०२५ पासून लागू झालेल्या सुधारित MSME वर्गीकरणामुळे MSME ची व्याप्ती अधिक व्यापक झाली आहे. परिणामी आता दुग्ध, कामगार, मत्स्य, कृषी प्रक्रिया, ग्राहक, वाहतूक, हस्तकला, महिला तसेच औद्योगिक उत्पादनाशी संबंधित सहकारी संस्था MSME नोंदणी घेऊ शकतात आणि MSME चे प्रमुख लाभ प्रत्यक्षात वापरू शकतात.

विशेषतः MSMED Act अंतर्गत विलंबित देयकांवर मिळणारे कायदेशीर संरक्षण सहकारी संस्थांसाठी अत्यंत प्रभावी साधन ठरते. याउलट गृहनिर्माण आणि पतसंस्था प्रकारच्या सहकारी संस्थांसाठी MSME चे लाभ सामान्यतः मर्यादित राहतात, कारण त्यांचे कार्य स्वरूप वस्तू किंवा सेवांच्या व्यावसायिक पुरवठ्यापेक्षा वेगळे असते.

समग्रपणे असे म्हणता येईल की MSME नोंदणी ही सहकारी संस्थांसाठी एक महत्त्वाची संधी आहे; परंतु तिचा प्रत्यक्ष लाभ संस्थेच्या कार्यप्रकारावर, आर्थिक मर्यादांवर आणि उद्दिष्टांवर (टेंडर, विलंबित देयक वसुली, योजना / कर्ज) अवलंबून असतो.

**– पुष्पिंदर कुमार राय**
राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य, सहकार भारती
कोषाध्यक्ष, सहकार भारती – दिल्ली
**मोबाईल क्रमांक : ९९६८२२००७६**

*****

# सहकारातून समृद्धी: 'विकसित भारता'ची नवी पहाट

'सहकार' हा केवळ एक शब्द किंवा व्यवसाय नाही, तर तो भारतीय लोकशाहीचा आणि आर्थिक स्वावलंबनाचा पाचवा वेद आहे. विना सहकार, नाही उद्धार हे ब्रीदवाक्य घेऊन निघालेली ही चळवळ आज ग्रामीण भारताच्या आत्मविश्वासाचा भक्कम पाया बनली आहे. महाराष्ट्राचे शिल्पकार कै. यशवंतराव चव्हाण म्हणायचे, शेतकऱ्याचा विकास हाच देशाचा विकास आहे, आणि सहकार हेच त्या विकासाचे माध्यम आहे. आज आपण जेव्हा 'विकसित भारत २०४७' चे स्वप्न पाहतो, तेव्हा या प्रवासात सहकार क्षेत्रातील 'विकास संस्था' (PACS), 'पतसंस्था' (Credit Societies), 'नागरी बँका', 'गृहनिर्माण संस्था' आणि 'सहकार टॅक्सी' यांसारखे मॉडेल विकासाचे मुख्य स्तंभ ठरणार आहेत.



गणेश निमकर
९८२२५ ६८५५०

**● ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा: 'विकास संस्था'** (PACS)

ग्रामीण भागात ज्याला आपण 'विकास संस्था' म्हणून ओळखतो, ती म्हणजे 'पॅक्स' (Primary Agricultural Credit Societies). या संस्था खऱ्या अर्थाने गावगाड्याचा 'बँक बॅलन्स' आणि 'सपोर्ट सिस्टीम' आहेत. नॅशनल फेडरेशन ऑफ स्टेट कोऑपरेटिव्ह बँक्स (NAFSCOB) च्या अहवालानुसार, भारतातील सहकारी पतपुरवठा संरचनेत (Cooperative Credit Structure) ३.५ लाखांहून अधिक सोसायट्यांचे जाळे असून ते २० कोटींहून अधिक ग्रामीण कुटुंबांशी जोडलेले आहे. सहकार क्षेत्राने २०२३-२४ या आर्थिक वर्षात ग्रामीण अर्थव्यवस्थेला उभारी देण्यासाठी सुमारे २.२५ लाख कोटी रुपयांचे कृषी कर्ज वितरित केले आहे. हे आकडे ग्रामीण भागातील पतपुरवठ्यात सहकार क्षेत्राचे महत्त्व अधोरेखित करतात.

संपूर्ण भारत देशात या क्षेत्रात महाराष्ट्र अग्रेसर आहे. मार्च २०२० पर्यंतच्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक २०,१५१ विकास संस्था (PACS) कार्यरत होत्या, ज्यामध्ये बिहार दुसऱ्या आणि मध्य प्रदेश तिसऱ्या क्रमांकावर आहे. ही संख्या महाराष्ट्रातील ग्रामीण स्तरावर सहकाराचे जाळे किती मजबूत आहे हेच दर्शवते.

**● 'पॅक्स' ते 'मल्टी-टास्कर' प्रवास**

सहकारी संस्थांचे काम केवळ कर्ज देण्यापुरते मर्यादित राहिलेले नाही. शेतकऱ्याला शेती खरेदीपासून ते शेतमाल विक्रीपर्यंत या संस्था मदत करत आहेत. केंद्र सरकारच्या 'सहकारातून समृद्धी' या धोरणामुळे या संस्थांचे रूपांतर 'मल्टी-टास्क' सेवा केंद्रांमध्ये होत आहे. आता एकाच विकास संस्थेमध्ये शेतकऱ्याला कर्ज, खते, बियाणे तर मिळतीलच, पण त्यासोबतच जनऔषधी केंद्र, रेशन दुकान आणि पेट्रोल पंप यांसारख्या सेवाही मिळतील. थोडक्यात, शेतकरी आता गावातूनच सहलीचे ऑनलाईन तिकीट काढून, विकास संस्थेच्या पेट्रोल पंपावर डिझेल भरून आत्मविश्वासाने बाहेर पडताना दिसेल.

**● आर्थिक सर्वसमावेशकतेचा आधार: सहकारी पतसंस्था** (Credit Societies)

विकास संस्था (PACS) प्रामुख्याने शेतीशी निगडित काम करतात, तर 'सहकारी पतसंस्था' किंवा 'क्रेडिट सोसायट्या' ग्रामीण आणि शहरी मध्यमवर्गीयांच्या आर्थिक गरजा पूर्ण करतात. ज्या ठिकाणी मोठ्या बँका पोहोचू शकत नाहीत, तिथे या पतसंस्था सामान्य माणसाला तातडीने अर्थपुरवठा करतात. 'सेवा' (SEWA - Self-Employed Women's Association) सारख्या संस्थांनी महिला आणि लहान शेतकऱ्यांना संघटित करून सामाजिक ऐक्य आणि स्वावलंबनाचे एक उत्तम मॉडेल जगासमोर ठेवले आहे.

**✲ नागरी गृहप्रकल्प आणि 'सहकार टॅक्सी'**

सहकाराचा विस्तार आता शहरांकडेही वेगाने होत आहे. शहरी आणि निमशहरी भागात मध्यमवर्गीयांचे स्वतःच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी 'सहकारी गृहनिर्माण संस्था' (Housing Cooperatives) वरदान ठरल्या आहेत. हे प्रकल्प केवळ घरेच देत नाहीत, तर एक सुरक्षित समुदाय घडवतात.

यासोबतच, सेवा क्षेत्रात 'सहकार टॅक्सी' हा प्रकल्प अत्यंत आशादायक आहे. खाजगी कंपन्यांच्या जाचक अटींमधून चालकांची मुक्तता करण्यासाठी सहकारी तत्त्वावरील टॅक्सी सेवा चालक-मालक संकल्पना राबवते. यामुळे नफ्याचे योग्य वाटप होऊन चालकांचे आर्थिक जीवन उंचावते. केरळमधील 'केरळ सवारी' सारख्या प्रयोगांनी हे सिद्ध केले आहे की, तंत्रज्ञानाची जोड दिल्यास सहकार टॅक्सी खासगी कंपन्यांना समर्थ पर्याय ठरू शकते.

**● उत्पादन आणि विपणनातील जागतिक यश : अमूल ते इफको**

शेतीची उत्पादकता वाढवण्यासाठी 'इफको' (IFFCO) सारखी संस्था दरवर्षी सुमारे ८० लाख टन खतांचे उत्पादन आणि वितरण करते. केवळ उत्पादनच नव्हे, तर 'अमूल'ने विपणन (Marketing) क्षेत्रात क्रांती घडवून लाखो दुग्ध उत्पादकांचे आयुष्य बदलले आहे. 'नाफेड' (NAFED) आणि कर्नाटकातील 'हॉपकॉम्स' (HOPCOMS) या संस्था शेतकऱ्यांच्या मालाला योग्य बाजारपेठ आणि भाव मिळवून देण्यासाठी रात्रंदिवस कार्यरत आहेत.

**● डिजिटल क्रांती आणि महाराष्ट्राची उल्लेखनीय कामगिरी**

पॅक्सचे संगणकीकरण हे केवळ डिजिटल पाऊल नसून ती पारदर्शकतेकडे जाणारी वाटचाल आहे. केंद्र सरकारने सुमारे ६३,००० पॅक्सच्या संगणकीकरणासाठी मोठा निधी दिला आहे. यात महाराष्ट्र आघाडीवर असून सुमारे १२,००० पॅक्स निवडल्या गेल्या होत्या. मा. सहकार मंत्र्यांनी लोकसभेत दिलेल्या माहितीनुसार, जून २०२५ पर्यंत महाराष्ट्रातील ११,९५४ पॅक्स 'एंटरप्राइज रिसोर्स प्लॅनिंग' (ERP) प्लॅटफॉर्मवर यशस्वीरित्या ऑनबोर्ड झाल्या आहेत. पुणे आणि अहमदनगर जिल्ह्यांनी यात १००% उद्दिष्ट गाठले आहे. गुजरात आणि कर्नाटकनेही प्रगती केली असली, तरी महाराष्ट्राचा 'ऑनबोर्डिंग'चा वेग देशाला दिशा देणारा आहे.

**● आंतरराष्ट्रीय तुलना आणि भारतापुढील संधी : जागतिक यशातून काय शिकता येईल?**

जागतिक पटलावर सहकार चळवळीने केवळ आर्थिक नफा न पाहता सामाजिक परिवर्तनाचे अजोड कार्य केले आहे. जगातील विकसित आणि विकसनशील देशांच्या प्रगतीचा आढावा घेतल्यास, भारताला सहकाराच्या माध्यमातून नवीन क्षितिजे पादाक्रांत करण्यासाठी खालील बाबी महत्त्वाच्या ठरतात:

**✲ ग्रामीण विद्युतीकरण (अमेरिका) :** अमेरिकेसारख्या महासत्तेने आपल्या ग्रामीण भागाचा कायापालट करण्यासाठी सहकाराचा प्रभावी वापर केला. अमेरिकेतील ग्रामीण भागातील तब्बल ९९% विद्युतीकरण हे ९०० हून अधिक 'इलेक्ट्रिक को-ऑपरेटिव्हज'मार्फत केले जाते. या संस्था नफाखोरीपेक्षा सेवाभावावर चालतात. भारतानेही केवळ वीज निर्मितीवर भर न देता, ग्रामीण भागात वीज वितरण (Distribution) क्षेत्रात सहकारी संस्थांना प्रोत्साहन दिले, तर वीज गळती कमी होऊन शेतकऱ्यांना आणि लघुउद्योगांना शाश्वत व स्वस्त वीज पुरवठा करणे शक्य होईल.

**✲ ऊर्जा व्यवस्थापन आणि वसुली (बांगलादेश व नेपाळ):** आपल्या शेजारील राष्ट्रांनी, विशेषतः बांगलादेश आणि नेपाळने, ग्रामीण वीज वितरणात सहकार मॉडेलचा अत्यंत यशस्वी प्रयोग केला आहे. या देशांनी स्थानिक


पुढील पानावर...

मागील पानावरून...

# सहकारातून समृद्धी: ‘विकसित भारता’ची नवी पहाट

सहकारी संस्थांवर वीज बिल वसुली आणि देखभालीची जबाबदारी सोपवली, ज्यामुळे वीज चोरीला लगाम लागला आणि वसुलीचे प्रमाण लक्षणीय वाढले. भारताच्या संदर्भात, ‘कुसुम’ योजनेअंतर्गत सौर ऊर्जा निर्मिती आणि त्याचे वितरण जर ‘विकास संस्थां’मार्फत (PACS) केले, तर गाव पातळीवर ऊर्जेबाबत स्वावलंबन येईल.

**※ औद्योगिक उत्पादन आणि सुटे भाग (जपान व दक्षिण कोरिया) :** जपान आणि दक्षिण कोरियाने सहकाराची व्याप्ती शेतीपलीकडे नेली आहे. जपानमधील सहकारी संस्थांनी इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि ऑटोमोबाईल क्षेत्रासाठी लागणारे छोटे सुटे भाग (Components) तयार करण्याच्या कामात सहकाराचा यशस्वी वापर केला आहे. भारताने आपल्या ‘पतसंस्था’ आणि ‘विकास संस्थां’च्या माध्यमातून ग्रामीण तरुणांना एकत्र आणून लघु उत्पादन प्रकल्प (Mini-Manufacturing Units) सुरू केल्यास, ‘मेक इन इंडिया’मध्ये ग्रामीण भागाचा वाटा वाढेल.



**※ गरिबी निर्मूलन आणि स्थलांतर रोखणे (अल्बानिया):** अल्बानियासारख्या देशात सहकारी चळवळीने ग्रामीण अर्थव्यवस्थेला इतकी गती दिली की, २०१५ ते २०२३ या काळात गरिबीत २५% घट आणि रोजगारासाठी होणाऱ्या स्थलांतरात ३०% घट झाली आहे. भारतासाठी हे मॉडेल अत्यंत प्रेरक आहे. जर आपण ग्रामीण भागात अन्न प्रक्रिया उद्योग (Food Processing) आणि मूल्यवर्धनाचे प्रकल्प सहकारी तत्त्वावर राबवले, तर गावातील तरुण गावातच राहील आणि शहरांकडे जाणारे लोंढे थांबतील.

भारताने या प्रगत राष्ट्रांच्या अनुभवातून धडा घेऊन आता केवळ पारंपरिक शेती कर्जापुरते मर्यादित न राहता, सौर ऊर्जा, उत्पादन क्षेत्र आणि तंत्रज्ञान आधारित सेवांमध्ये सहकारी संस्थांना उतरवणे काळाची गरज आहे. सहकारातून समृद्धी हे ब्रीदवाक्य केवळ कृषी क्षेत्रापुरते मर्यादित न ठेवता ते औद्योगिक आणि ऊर्जा क्षेत्रापर्यंत विस्तारित केल्यास ‘विकसित भारत २०४७’ चे स्वप्न अधिक वेगाने पूर्ण होईल.

**• भविष्यातील तीन मुख्य स्तंभ आणि आव्हाने**

पंडित जवाहरलाल नेहरू म्हणायचे, सहकार केवळ एक व्यवसाय नाही, तर तो एक जीवनमार्ग आहे. ‘विकसित भारत २०४७’ चे उद्दिष्ट गाठण्यासाठी सहकारी क्षेत्राला तीन स्तंभांवर काम करावे लागेल:

**१. उत्पन्न वाढ:** आधुनिक तंत्रज्ञान, दर्जेदार बियाणे आणि ‘अन्न प्रक्रिया उद्योग’ (Food Processing Units) सुरू करून शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणे.

**२. पायाभूत सुविधा :** शेतमालाचे नुकसान टाळण्यासाठी साठवणूक केंद्रे आणि शीतगृहे (Cold Storages) मध्ये गुंतवणूक करणे.

**३. क्षमता बांधणी :** ‘राष्ट्रीय सहकारी प्रशिक्षण परिषद’ (NCCT) आणि 'NCDC' मार्फत सदस्यांना व्यवस्थापकीय आणि तांत्रिक कौशल्यांचे प्रशिक्षण देणे.

सहकार क्षेत्रात सुशासनाचा अभाव आणि व्यावसायिक व्यवस्थापनाची कमतरता ही आव्हाने आहेत. संस्थांनी सरकारी अनुदानावर अवलंबून न राहता स्वावलंबी बनले पाहिजे.

सहकार क्षेत्र केवळ ग्रामीण पतपुरवठ्यापुरते मर्यादित राहिलेले नाही, तर ते सामाजिक, आर्थिक आणि राजकीय सक्षमीकरणाचे प्रभावी माध्यम बनले आहे. ‘पॅक्स’चे संगणकीकरण, ‘सहकार टॅक्सी’ सारखे उपक्रम आणि ‘मल्टी-सर्व्हिस सेंटर’ बनवण्याचा प्रवास ग्रामीण जीवनात ‘परिवर्तन’ घडवणारा आहे. सहकारातून समृद्धीकडे हे ब्रीदवाक्य प्रत्यक्षात आणण्यासाठी आता केवळ पत पुरवठा न करता ‘मल्टी-टास्किंग’ करण्याची वेळ आली आहे. जेव्हा सहकाराचे लाखो हात एकमेकांत गुंततील, तेव्हाच ‘विकसित भारत २०४७’ चा सूर्य संपूर्ण तेजाने तळपताना दिसेल. ही एक नवी आर्थिक आणि सामाजिक क्रांती आहे, जी भारताला जागतिक महासत्तेकडे घेऊन जाईल

**– गणेश रामचंद्र निमकर, पुणे.**
**बँकिंग सल्लागार मोबाईल – ९८२२५ ६८५५०**
**बी. कॉम, जी. जीडीसीए, सी.ए.आय.आय.बी.**
**ई मेल** – nimkarganeshgmail.com

*****




## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे सहकार चळवळीचे नुकसान

**पुणे** – राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे सहकार चळवळीचे भरून न येणारे नुकसान झाले आहे, अशा शब्दात श्रद्धांजली सभेत भावना व्यक्त करण्यात आल्या. पुणे नागरी सहकारी बँक्स असोसिएशनच्या वतीने शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. असोसिएशनचे अध्यक्ष निलेश ढमढेरे, मानद सचिव सुभाष मोहिते, उपाध्यक्ष रमेश वाणी, तसेच विविध सहकारी बँकांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक, पदाधिकारी उपस्थित होते. राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी व्यक्तिगत जीवनातील विविध आठवणींना उजाळा दिला.

# प्राजक्ता सहकारी पतसंस्था 'दीपस्तंभ' पुरस्काराने सन्मानित



**पुणे** – महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या वतीने, सहकारी पतसंस्था चळवळीत दीपस्तंभाप्रमाणे उल्लेखनीय कार्यासाठी 'प्राजक्ता नागरी सहकारी पतसंस्था, सोलापूर' पतसंस्थेला, आर्थिक वर्ष २०२४-२५ चे पुणे-सोलापूर विभागातून प्रथम क्रमांकाचे 'दीपस्तंभ' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी व राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काका कोयटे यांच्या हस्ते संचालक मल्लिनाथ पाटील, सोमशेखर जमाणी व व्यवस्थापक गणेश कोडगिरे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. संस्थेचे अध्यक्ष व संचालक मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली पतसंस्थेचे पारदर्शक व्यवहार, प्रशिक्षित कर्मचारी, तत्पर सेवा, संक्षिप्त ठेव प्रतिनिधी, सभासद, ठेवीदार, कर्जदार व हितचिंतक यांच्या सहकार्याने हा पुरस्कार मिळाला आहे, असे नमूद करण्यात आले.

# सहकारी पतसंस्थांनी सदस्यांच्या हिताचे निर्णय घेण्यास प्राधान्य द्यावे - जिल्हा उपनिबंधक संजय राऊत

## सारस अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी कोथरूड शाखेचे नवीन जागेत स्थलांतर



**पुणे** – सहकारी पतसंस्थांचे कामकाज उत्तम प्रकारे चालविण्यासाठी संस्था अध्यक्षासह संचालक मंडळाने देखील सदस्यांच्या हिताचे निर्णय घेण्यास प्राधान्य देण्याची गरज आहे, असे सहकारी संस्थांचे जिल्हा उपनिबंधक संजय राऊत यांनी सांगितले. येथील सारस अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्या कोथरूड शाखेचे नवीन जागेत स्थलांतर करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.

पतसंस्थेचे अध्यक्ष भालचंद्र कुलकर्णी, नगरसेविका अल्पना वरपे, ज्योत्स्ना कुलकर्णी, हर्षदा माथवड, नगरसेवक पृथ्वीराज सुतार, नवनाथ जाधव, संस्थेचे उपाध्यक्ष नितीन जरांडे, तसेच संचालक अनिल कावळे, जितेंद्र चंपानेरकर, गिरीश भवाळकर, मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास फडके तसेच कर्मचारी या वेळी उपस्थित होते. महिला बचत गट सदस्यांना व्यवसाय वाढीसाठी कर्ज रक्कम वाटपाचे धनादेश राऊत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

राऊत यांनी सांगितले, की योग्य कर्ज वाटप, त्याची नियमित वसुली आणि विविध सेवांसह क्यूआर कोड आदी सुविधा उपलब्ध करण्याबरोबर सदस्य आणि ठेवीदार यांचा विश्वास संपादन केल्यास संस्थेचे भविष्य उज्ज्वल होण्यास मदत होणार आहे.

अध्यक्ष कुलकर्णी यांनी सांगितले, की पतसंस्था सन १९७२ मध्ये स्थापन झाली असून गेल्या ५४ वर्षांत संस्थेने सदस्यांच्या आणि ठेवीदारांच्या हितास प्राधान्य दिले आहे. सध्याच्या स्थितीत संस्थेचे सुमारे १५ हजार सदस्य असून ४ शाखांसह सुमारे ७५ कोटी रुपयांचा मिश्र व्यवसाय केला आहे. तज्ज्ञ संचालक विजय नातू यांनी आभार मानले.

# धन्वंतरी सहकारी पतसंस्थेचा 'दीपस्तंभ पुरस्कार'ने गौरव



**सातारा** – सहकार क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन येथील धन्वंतरी सहकारी पतसंस्थेचा राज्य सहकारी पतसंस्था महासंघाच्या वतीने दीपस्तंभ पुरस्काराने नुकताच गौरव करण्यात आला. सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी आणि महासंघाचे अध्यक्ष काका कोयटे यांच्या हस्ते संस्थापक अध्यक्ष डॉ. रवींद्र भोसले व संचालक यांनी पुरस्कार स्वीकारला.

संस्थेचे अध्यक्ष भोसले यांनी संगितले, की संस्थेने आजवर अनेक पुरस्कार मिळविले आहेत. सभासद हा केंद्रबिंदू मानून संस्था विविध उपक्रम यशस्वीपणाने राबवित आहेत. उपाध्यक्ष डॉ. कांत फडतरे यांनी सांगितले, की संस्थेने ३२५ कोटींपेक्षा अधिक व्यवसाय केला आहे. संस्थेकडे १० कोटी ९६ लाख वसूल भागभांडवल असून ४८ कोटी ३३ लाख रुपये निधी तर १७५ कोटींच्या ठेवी आणि ९३ कोटींची गुंतवणूक केली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी संजय पवार यांनी आभार मानले.

# बारामती सहकारी बँक अध्यक्षपदी शिरीष कुलकर्णी

**पुणे** – बारामती सहकारी बँक अध्यक्षपदी शिरीष कुलकर्णी तर बँक व्यवस्थापन मंडळ अध्यक्षपदी उद्धव गावडे यांची निवड करण्यात आली. बँकेच्या संचालक मंडळाची बैठक नुकतीच झाली. त्यामध्ये वरील पदाधिकारी निवडण्यात आले.

बँकेच्या ठेवी २२१२ कोटी असून १३७४ कोटी कर्जवाटप करण्यात आले आहे. निव्वळ एनपीए २.५८ टक्के इतका आहे तर भांडवल पर्याप्तता प्रमाण १६.७२ टक्के आहे. बँकेच्या पुणे, सातारा, सोलापूर, नगर, नाशिक आणि रायगड या जिल्ह्यात ३६ शाखा आणि एक विस्तारित विभाग कार्यरत आहे. बैठकीला उपाध्यक्ष नुपूर शहा आणि संचालक, अधिकारी उपस्थित होते.

# साखर उद्योगासमोरील अडचणी कमी होण्यासाठी साखरेचा विक्री दर वाढणे आवश्यक



**सांगली –** गेल्या आठ वर्षांत सात वेळा एफ.आर.पी. वाढली. परंतु एम.एस.पी. वाढली नाही. साखरेची एम.एस.पी. वाढल्याशिवाय साखर उद्योगासमोरची समस्या सुटणार नाही. तरी सरकारने साखरेची एम.एस.पी. वाढवावी, अशी मागणी पद्मभूषण क्रांतिवीर डॉ. नागनाथ अण्णा नायकवडी हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष वैभव नायकवडी यांनी केली आहे.

पद्मभूषण क्रांतिवीर डॉ. नागनाथ अण्णा नायकवडी हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याच्या ४३ व्या गळीत हंगामाची सांगता झाली. सुरुवातीला पद्मभूषण क्रांतिवीर डॉ. नागनाथ अण्णांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

कारखान्याचे अध्यक्ष वैभव नायकवडी म्हणाले, गेल्या पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाऊस झाला. कार्यक्षेत्रातील काळ्या मातीत जादा पाणी साचल्याने, मेहनत मशागतीची कामे करता न आल्याने व खते टाकता न आल्याने ऊस उत्पादनात वाढ झाली नाही. त्यामुळे उसाच्या उत्पादनात व वजनात घट झाली आहे. खोडव्याच्या वजनाचे प्रमाण घटल्याचे दिसते. गळिताच्या शेवटच्या टप्प्यात तोडणी मशिनचा ऊसपुरवठा कमी आला. अशा परिस्थितीमध्ये सर्वांच्या प्रयत्नाने व सहकार्याने गळीत हंगाम पार पडला. हंगामात ऊसगाळपाचे साखर उत्पादनाचे सर्वांचे अंदाज चुकले आहेत, असे ते म्हणाले.

*** साखर निर्यातीच्या निर्णयाचा फायदा होणार का ? –**

देशात ५३४ कारखान्यांनी गाळप हंगाम घेतला. त्यापैकी ९१ कारखाने बंद झाले आहेत, असे नमूद करून ते म्हणाले, सरकारने जरी साखर निर्यातीचा निर्णय घेतला असला, तरी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील साखरेचे दर हे देशांतर्गत साखरेच्या दरापेक्षा कमी असल्याने त्याचा फायदा कारखानदारीला होणार नाही. कृषी विज्ञान केंद्र, ऊस शेतीच्या संदर्भात विकसित केलेले एआय तंत्रज्ञान प्रत्यक्षात कार्यान्वित करणे गरजेचे आहे. ऊस शेती व साखर कारखानदारीमध्ये नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करणे अत्यावश्यक आहे. ऊसतोडणी वाहतुकीचा प्रश्न दिवसेंदिवस जटिल होत आहे. तोडणी वाहतूक कंत्राटदाराकडील येणेबाकीची आकडेवारी वर्षानुवर्षे वाढत आहे. करार केलेली सर्व ऊसतोडणी वाहतूक यंत्रणा हजर असायला हवी.

*** इथेनॉल खरेदी दर वाढावेत –**

ते पुढे म्हणाले, कारखान्यांना जुनी देणी भागविण्यासाठी नवीन कर्जे काढावी लागत आहेत. कारखान्याच्या साखर मालतारण कर्जावरील व इतर मुदती कर्जावरील बँकांचे व्याजदर कमी करावेत. उत्पादन खर्चात वाढ झाल्यामुळे रेक्टीफाइड स्पिरिट व इथेनॉलचे खरेदी दर वाढवावेत. साखर उद्योगासमोरील असलेले प्रश्न सुटत नाहीत, तोपर्यंत अडचणी सुटणार नाहीत. कारखान्याने नवीन मशिनरी बसविल्यामुळे कारखान्याची गाळपक्षमता वापर वाढला. साखरेचे उत्पादन वाढले. क्लिनिंगसाठी कारखाना बंद करावा लागला नाही. डिस्टिलरीकडील उत्पादन वाढले ऑइल कंपन्यांना द्यावयाचा इथेनॉल कोटा पूर्ण केला. गळीत हंगामाचे दिवस १०० दिवसांपर्यंत आलेत. येणारा गळीत हंगाम पूर्ण क्षमतेने चालण्याच्या दृष्टीने आतापासूनच नियोजन करावे.

सभेला कारखान्याचे माजी अध्यक्ष उपाध्यक्ष, आजी–माजी संचालक, कार्यकर्ते, हुतात्मा शिक्षण व उद्योग समूहातील सर्व संस्थाचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, कारखाना अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. कार्यकारी संचालक शिवाजीराव पाटील यांनी स्वागत केले.

# राज्य सहकार धोरण उच्चस्तरीय समितीवर सुभाष मोहिते यांची निवड



**पुणे –** महाराष्ट्र राज्याचे नव्याने सहकार धोरण ठरविण्यासाठीच्या उच्चस्तरीय समितीमध्ये पुणे पीपल्स सहकारी बँकेचे ज्येष्ठ संचालक आणि व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुभाष मोहिते यांची समितीच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसे आदेश शासनाने काढले आहेत. राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समिती तयार करण्यात आली आहे. मोहिते हे बँकेचे माजी अध्यक्ष असून नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रात ५० वर्षांपेक्षा अधिक काळ कार्यरत आहेत. ॲड. मोहिते यांच्या निवडीबद्दल अनेकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यांच्या निवडणुका लवकरच

**पुणे –** जिल्ह्यातील महानगरपालिका, नगर पालिका आणि नगर पंचायत निवडणुकीची रणधुमाळी पूर्ण झाल्यावर आता जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यांची निवडणूक होऊ घातली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील आमदारांच्या भूमिकेकडे लक्ष लागले आहे. सध्याच्या स्थितीत जिल्ह्यातील काही कारखान्यांची निवडणूक होणार आहे.

जिल्ह्यातील भीमा सहकारी साखर कारखाना, कर्मयोगी शंकरराव पाटील सहकारी साखर कारखाना, माळेगाव सहकारी साखर कारखाना, सोमेश्वर सहकारी साखर कारखाना या कारखान्यांची निवडणूक होत आहे. यातील काही साखर कारखान्यांच्या संचालक मंडळाची मुदत याआधी पूर्ण झाली आहे. काही कारखान्यांच्या संचालक मंडळाची मुदत संपण्यास थोडा कालावधी असणार आहे. त्यामुळे कारखान्यांच्या नियोजित निवडणुकीमुळे एकूणच जिल्ह्यातील राजकारण ढवळून निघणार आहे.

# भारती सहकारी बँक अध्यक्षपदी आमदार डॉ. विश्वजित कदम



**पुणे –** भारती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी आमदार डॉ. विश्वजित कदम यांची नुकतीच निवड करण्यात आली आहे. बँकेच्या संचालक मंडळाची बैठक नुकतीच झाली. त्यामध्ये वरील निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. उपाध्यक्षपदी डॉ. सचिन वेर्णेकर यांची निवड करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी जितेंद्र हुडी यांनी निवड जाहीर केली. या बैठकीत १५ संचालक यांची निवड करण्यात आली.

बँकेचा एकूण व्यवसाय २.८८६ कोटी इतका झाला असून एनपीए शून्य टक्के आहे. मार्च २५ अखेर बँकेला २१ कोटी नफा झाला असून सदस्यांना १२ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे. बँकेच्या वतीने सदस्यांसाठी विविध योजना जाहीर करण्यात आल्या आहेत.

संचालक मंडळात डॉ. अस्मिता जगताप, डॉ. जितेश कदम, डॉ. अनंत शिंदे, सागर कदम, डॉ. विलास कदम, प्रा. मिलिंद जोशी, संजय पेंढारकर, ऐश्वर्या हर्डीकर, पूजा नरवाडकर, अजित चालुक्य, प्रदीप जाधव, राजेश कंठे आणि मनीष दुधेडिया यांचा समावेश आहे.

# नागरी सहकारी बँकांना स्वातंत्र्य



**डॉ. अभय मंडलिक**

९४०३० ८०७२५

दिनांक ६ फेब्रुवारी २६ रोजी रिझर्व बँक ऑफ इंडियाने जाहीर केलेल्या पतधोरणाप्रमाणे नागरी सहकारी बँकांना काही बाबतीत स्वातंत्र्य किंवा नव्याने सवलती देण्यात आल्या आहेत. याचा गोषवारा पुढीलप्रमाणे –

**✻ गृहकर्जामध्ये सवलती –**

१) टायर वन आणि टायर दोनमध्ये असलेल्या नागरी सहकारी बँकांना गृहकर्जाची मुदत वीस वर्षांपर्यंत ठेवता येईल. ही मुदत हप्ता सुटीचा कालावधी समाविष्ट करून राहील.



२) टायर तीन आणि टायर चार मधील नागरी सहकारी बँकांना आता गृह कर्जाची मुदत आणि हप्ता सुटीचा कालावधी नव्याने ठरवता येईल. संचालक मंडळाने मान्य केलेल्या या नव्या धोरणामध्ये कालावधीबाबत कर्जदाराचे वय विचारात घेऊन दीर्घ काळापर्यंत गृह कर्जाची मुदत आता देता येईल.

३) गृह कर्जाच्या बाबतीत हप्तासुटीचा कालावधी हा फक्त घरबांधणीसाठीच लागू राहील.

घर खरेदी जुना फ्लॅट खरेदी यासाठी ही सवलत देता येणार नाही. टायर एक आणि दोनमधील नागरी सहकारी बँका हप्ता सुटीचा कालावधी जास्तीत जास्त दीड वर्षे इतका देऊ शकतील.

४) टायर तीन आणि चारमधील नागरी सहकारी बँका हप्ता सुटीचा कालावधी, कर्जाचा कालावधी स्वतः ठरवू शकतील. संचालक मंडळाची मान्यता असलेले धोरण यासाठी नव्याने आवश्यक राहील.

**✻ विनातारणी कर्जाच्या नव्या मर्यादा –**

१)रिझर्व बँकेने जाहीर केलेल्या नव्या नियमानुसार टायर वनमधील नागरी सहकारी बँका पाच लाखापर्यंत, टायर दोनमधील नागरी सहकारी बँका साडेसात लाखापर्यंत आणि टायर तीन आणि चारमधील नागरी सहकारी बँका दहा लाख रुपयांपर्यंत विना तारणी कर्ज देऊ शकतील.

२) नागरी सहकारी बँकांसाठी विनाकारणी कर्जाची एकूण मर्यादा कर्ज रकमेच्या वीस टक्के इतकी नव्याने करण्यात आलेली आहे.

**✻ नाममात्र सदस्यांची कर्जे –**

१) नाममात्र सदस्यांना नव्या व्याख्येप्रमाणे अडीच लाख रुपयांपर्यंतची कर्ज ग्राहकोपयोगी वस्तू खरेदीसाठी देता येतील.

२) ठेवी, सोनेतारण, चांदी तारण, विमा पॉलिसी आणि सरकारी प्रतिभूती कर्जे नाममात्र सभासदांना संचालक मंडळाच्या धोरणानुसार देता येतील.

या सर्व सुधारणा १ ऑक्टोबर २०२६ पासून अमलात येणार आहेत रिझर्व बँक ऑफ इंडियाचे नागरी सहकारी बँकांबाबतचे धोरण दिवसेंदिवस सकारात्मक पद्धतीने वाटचाल करीत आहे, असे या नियमावली वरून स्पष्ट होत आहे.

**– डॉ. अभय मंडलिक**

**– लेखक बँकिंग विषयाचे अभ्यासक असून खामगाव अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक आहेत.**

✻✻✻✻✻

---


**पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे**

स्थापना ४ सप्टेंबर १९१७

मुख्य कार्यालय – ४ ब, बी.जे.रोड, पुणे – ४११ ००१

फोन नं. : ०२० २६३०४१०० www.pdccbank.com

**१०७ वर्षांचा गौरवशाली इतिहास असणारी देशातील अग्रगण्य जिल्हा बँक**

**✻ बँकेच्या विविध कर्ज योजना ✻**

- शेतीपूरक कारणासाठी अ. मु. कर्ज
- वाहन कर्ज
- सोनेतारण कर्ज
- शेतीकर्ज – शासकीय अनुदानित कर्ज योजना – १०.५०%
- व्यावसायिक कॅश क्रेडिट
- ग्राहक उपयोगी वस्तू कर्ज
- औद्योगिक कर्ज
- गृह कर्ज

**✻ बँकेच्या अत्याधुनिक सुविधा ✻**

- एनी ब्रँच बँकींग
- आरटीजीएस
- एनईएफटी
- मोबाईल बँकींग
- यूपीआय सुविधा
- ई-कॉमर्स
- लॉकर सुविधा उपलब्ध

✻ किफायतशीर व्याजदर ✻ जलद कर्ज पुरवठा ✻ सुलभ कर्ज प्रक्रिया

**बँकेची आर्थिक स्थिती ३१/०३/२०२५ अखेर**

- ठेवी – १४७६६.८४ कोटी
- कर्जे – १२०५९.०३ कोटी
- एकूण व्यवसाय –२६८२५.८७ कोटी

**आकर्षक व्याजदर**

दि. २३/०६/२०२५ पासून ठेवीवरील व्याजदरात वाढ २ वर्षांकरिता ७.००% (ज्येष्ठ नागरिकांना अधिक १% व्याजदर)

**✻ विद्यमान संचालक मंडळ ✻**

मा.प्रा.डॉ. दिगंबर गणपत दुर्गाडे – अध्यक्ष

मा. सुनील काशिनाथ चांदेरे – उपाध्यक्ष

मा. अनिरुद्ध यशवंत देसाई – मुख्य कार्यकारी अधिकारी

अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा.

कर व व्यापारी विषयक कायद्यातील क्लिष्ट विषयांची सहज सोप्या भाषेत माहितीसह आर्थिक गुंतवणूक, आरोग्याविषयी माहिती देणारे व्यापारी बांधवांचे हक्काचे एकच व्यासपीठ

स्थापना १९५०

**व्यापारी मित्र**

मासिकातील एखाद्या माहितीने आपला लाखो रुपयांचा फायदा होऊ शकतो.

संस्थापक संपादक : स्व. श्री. जी. डी. शर्मा

Payment Getway link

**भारतात कुठेही निश्चित अंक मिळण्यासाठी मॅगझीन पोस्टिंगसह वर्गणीदर**

| ३ वर्षांसाठी | २ वर्षांसाठी | १ वर्षासाठी |
|---|---|---|
| २९०० | २००० | १०५० |

'परशुराम कुटी', १०६/९, एरंडवणा, पुणे – ४११००४

फोन (०२०) २५४३ १०९४ (W) : 94218 80290

E-mail : sampadak@vyaparimitra.com

# भंडारा जिल्ह्यातील नागरी सहकारी पतसंस्थांच्या पदाधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण वर्ग




**भंडारा** – जिल्हा उपनिबंधक कार्यालय व सहकार भारती, जिल्ह्याच्या संयुक्त विद्यमाने नागरी सहकारी पतसंस्थांच्या अध्यक्ष, संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन जिल्हा उपनिबंधक शुद्धोधन कांबळे यांनी केले. त्यांनी प्रशिक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले.

व्यवसाय वृद्धीत संचालक व कर्मचाऱ्यांचा सहभाग, कायदेशीर कर्ज वाटप व कर्ज वसुली हे विषय सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्थेचे संचालक व केशव स्मृती सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष अमित ओझे यांनी मांडले.

संचालकांनी घ्यावयाची काळजी, लेखा परीक्षणातील त्रुटींची पूर्तता, कर्ज वसुलीसाठी करावयाच्या निरनिराळ्या उपाययोजना, कर्मचाऱ्यांची क्षमता वाढीसाठी करावयाचे प्रयत्न, कर्ज योजनांची कल्पकता आदी विषयांचा उहापोह केला.

प्रशिक्षण वर्गात गुंतवणूक या विषयाची मांडणी विदर्भ अर्बन को. ऑप. बँक्स असोसिएशनचे सचिव सीए तुषारकांती डबले यांनी केली. पतसंस्थांनी गुंतवणूक करताना निवडावयाच्या बँका, पाळायची मर्यादा, बदलणाऱ्या व्याजावर ठेवावयाचे लक्ष, सरकारी रोख्यांमधील गुंतवणुकीचे धोके आदी विषयांवर मार्गदर्शन केले. सहकार भारती जिल्हा अध्यक्ष तसेच जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या अध्यक्षांची समायोचित भाषणे झाली. वर्गास सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्थेचे संचालक सीए रविंद्र चिंचवडकर व उदय पेंडसे उपस्थित होते.


## सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्या; कराड
## (शासन मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था)

मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून महाराष्ट्र शासनाने आमच्या प्रशिक्षण संस्थेचे नाव अधिसूचित केले आहे. अधिसूचित संस्थेकडून सहकारी संस्थांनी प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. नागरी सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, गृहनिर्माण संस्था इ. सर्व संस्थाकरिता संचालक, पदाधिकारी, कर्मचारी व सभासदांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेतले जातात.

### *नागरी सहकारी बँकांसाठी*

आमची संस्था बँकेच्या गरजेप्रमाणे दर्जेदार प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन बँकेच्या ठिकाणी जाऊन करते. अन्य प्रशिक्षण कार्यक्रमांबरोबरच नवीन भरती, स्टाफसाठी प्रारंभिक प्रशिक्षण कार्यक्रम, पदोन्नतीपूर्व प्रशिक्षण तसेच **पदोन्नती परीक्षांचेही वाजवी दरात आयोजन करते.** तरी याचा लाभ सहकारी बँकांनी घ्यावा. वरील सेवांसाठी कृपया संपर्क साधावा.

**श्री. व्यंकटेश कुलकर्णी (प्रशिक्षण प्रमुख) – ९४०३० ८०७५१**

**श्री. माधवेंद्र कोरडे – (फक्त मेसेजसाठी) ९८५०५ ७१४०५**

*** प्रशिक्षण कार्यालय** – फ्लॅट नं. ३, रामेश्वर अपार्टमेंट, साई सर्व्हिस पेट्रोल पंपामागे, पूलाची वाडी, डेक्कन जिमखाना, पुणे ४११ ००४ **ई–मेल : sahakarbharati1416@gmail.com**

# सातारा जिल्हा पोलीस क्रेडिट को-ऑप. सोसायटीतर्फे आरोग्य तपासणी शिबिर

**सातारा** – सातारा जिल्हा पोलीस को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी यांच्या वतीने आजी-माजी पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच त्यांच्या कुटुंबियांसाठी विनामूल्य आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबिर उपक्रम मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, सातारा, छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा तसेच श्री शाहू कला अकादमी संचलित धर्मादाय नेत्र रुग्णालय, सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आला.

पोलीस सोसायटीकडून प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरास पोलीस बंधू-भगिनींकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिरात सातारा विभागातील एकूण ४२२ पोलीस अधिकारी, अंमलदार व त्यांच्या कुटुंबियांनी लाभ घेतला.

शिबिराचे उद्घाटन पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांच्या हस्ते झाले. छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. विनायक काळे, अपर पोलीस अधीक्षक वैशाली कडूकर, पोलीस अधीक्षक (गृह) अतुल सबनीस, जिल्हा उपनिबंधक संजयकुमार सुद्रीक, सहाय्यक उपनिबंधक राहुल देशमुख, जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे अध्यक्ष तथा वैद्यकीय अधिकारी डॉ. रविराज निकम, शाहू धर्मादाय रुग्णालयाचे संस्थापक राजेंद्र मोहिते, स्पंदन हॉस्पिटलचे डॉ. शिवराज गायकवाड तसेच पोलीस निरीक्षक अरुण देवकर, राखीव पोलीस निरीक्षक सुशील कदम, लायन्स क्लबचे प्रसाद देशमुख, कार्यालयीन अधीक्षक गणेश पाटोळे आदी उपस्थित होते.

शिबिरामध्ये रक्तदाब (बीपी), मधुमेह (ब्लड शुगर), हृदयविकार तपासणी (ईसीजी), रक्त तपासणी, अस्थिरोग तपासणी (ऑर्थोपेडिक), बालरोग तपासणी आदी सेवा देण्यात आल्या. शाहू धर्मादाय नेत्र रुग्णालयामार्फत डोळ्यांची तपासणी करून आवश्यकतेनुसार विनामूल्य औषधांचे वाटप करण्यात आले.

# ऊसतोड कामगारांसाठी सर्वसमावेशक कायदा आवश्यक - उपसभापती नीलम गोऱ्हे



**मुंबई** – राज्यातील ऊसतोड कामगारांच्या आरोग्य आर्थिक आणि सामाजिक स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी त्यांच्या कल्याणार्थ सर्वसमावेशक कायदा तयार करणे आवश्यक असल्याचे मत विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केले. तसेच कामगारांना आवश्यक साहित्य वेळेत उपलब्ध व्हावे, यासाठी डीबीटी प्रणालीद्वारे तात्काळ मदत देण्याचे निर्देश त्यांनी दिले.

विधानभवनात ऊसतोड कामगारांच्या कल्याणासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजना व देण्यात येणाऱ्या सुविधांचा आढावा घेण्यासाठी डॉ. गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीस सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, साखर आयुक्त संजय कोलते, डॉ. आशिष भारती उपसंचालक कुटुंब कल्याण यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, ऊसतोड कामगारांच्या विविध समस्यांचा सखोल विचार करून त्यांच्या जीवनमानात सुधारणा घडवण्यासाठी सर्वसमावेशक कायदा तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी. कामगारांना गमबूट इलेक्ट्रिक कोयता, ग्लोव्हज, तसेच महिला कामगारांसाठी सॅनिटरी नॅपकिन यांसारख्या आवश्यक साहित्याची उपलब्धता वेळेत व्हावी, यासाठी डीबीटीद्वारे आर्थिक मदत देणे अधिक सुलभ ठरेल, असेही त्यांनी नमूद केले.

ऊसतोड कामगारांसाठी उपलब्ध असलेल्या फिरत्या स्वच्छतागृहांची संख्या वाढविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. कामाच्या ठिकाणी आठवड्यातून एकदा फिरता दवाखाना उपलब्ध करून देण्याबरोबरच महिला कामगारांसाठी स्त्रीरोग तज्ञांची सेवा उपलब्ध करून द्यावी. तसेच महिला ऊसतोड कामगारांना प्रसुती रजा व मातृत्व योजनांचा लाभ देण्याबाबत सकारात्मक विचार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी पाठपुरावा करावा, असेही त्यांनी सांगितले.

# सहकार चळवळीमुळे महाराष्ट्र समृद्ध - साहेबराव खामकर



**पुणे** – सहकारामुळे महाराष्ट्र राज्याच्या ग्रामीण भागात आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक विकास झाला असून जनसामान्यांची प्रगती झाली आहे, असे सहकार भारतीचे महाराष्ट्र प्रदेशचे साखर कारखाना प्रकोष्ठ प्रमुख साहेबराव खामकर यांनी सांगितले. सहकार भारतीचे स्थापनादिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

ते म्हणाले, की सहकारामुळे महाराष्ट्र समृद्ध झाला असून सहकारातील काही दोष निवारण्याच्या दृष्टीने सहकार भारतीचे जे ब्रीदवाक्य आहे – 'बिना संस्कार, नही सहकार' हे रुजविण्याची अत्यंत गरज आहे. रावळगाव साखर कारखान्याचे अध्यक्ष बबनराव गायकवाड यांनी सांगितले, की सहकार क्षेत्रातील सर्व उद्योग हे व्यावसायिक पद्धतीने चालविले पाहिजेत. तसेच विशेषतः साखर उद्योगावरील काही नियंत्रणात सरकारकडून शिथिलता आणली पाहिजे.

सुरुवातीला पुणे महानगर साखर कारखाना प्रकोष्ठ समन्वयक बाळ भिंगारकर यांनी प्रास्ताविकात सहकार भारतीच्या कार्याचा आढावा घेतला. वाय. जी. पवार यांनी मनोगतामध्ये सहकारामुळे ग्रामीण भागातील तरुणांना रोजगार उपलब्ध होऊन त्यांच्या संसाराला हातभार लागला, असे मत व्यक्त केले.

केंद्र सरकारच्या धर्तीवर राज्य सरकार नवीन सहकार धोरण आणणार असून या समितीमध्ये सहकार भारतीचे महाराष्ट्र प्रदेशचे महामंत्री विवेक जुगादे यांचा समावेश झाल्याबद्दल खामकर यांनी त्यांचे अभिनंदन केले. पुणे विभाग प्रमुख गिरीश भवाळकर यांनी शुभेच्छा दिल्या. आबासाहेब शिंगोटे, शहाजीराव बोरुडे, नवदीप सोशल फाउंडेशनचे सचिव प्रताप खामकर, प्रा. गहिनीनाथ हुमे, रवींद्र साळुंके उपस्थित होते. पुणे जिल्हा पतसंस्था प्रकोष्ठ सहप्रमुख विनोद अष्टुल यांनी आभार मानले.

यावेळी सहकार भारतीचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी उपस्थित होते.

THE YAVATMAL URBAN CO-OP., BANK LTD., YAVATMAL

दि यवतमाळ अर्बन को-ऑप.बँक लि., यवतमाळ

**मुख्य कार्यालय :** एल.आय.सी. चौक, गार्डन रोड, यवतमाळ 445001 | **फोन :** 07232-244241, 243703, 237442

Mail - ho_adm@yavatmalurbanbank.com | Website - www.yavatmalurban.bank.in

# स्वतःचं घर – आता स्वप्न नव्हे, वास्तव

# दत्तोपंत ठेंगडी

# गृह कर्ज योजना

**8.25%***

**व्याजदर**

*नियम व अटी लागू



**डॉ. नितीन खर्चे**
अध्यक्ष

**अजिंदरसिंह चावला**
उपाध्यक्ष

**श्रीधर कोहरे**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**- संचालक -**

श्री. अजय विठ्ठलदासजी मुंधडा, श्री. आशिष हरिहरराव उत्तरवार, श्री. प्रशांत अरुण माधमशेट्टीवार, श्री. संजय चिंतामणराव डेहणकर, श्री. प्रमोद मधूकरराव धुर्वे, अॅड. श्री. प्रफुल्लसिंह लक्ष्मणसिंह चौहान, श्री. गोवर्धन दयाराम राठोड, श्री. परिमल प्रेमकुमार देशपांडे, डॉ. श्री. महेश दामोधर सारोळकर, श्री. वसंता रामजी सुपारे, श्री. संतोष विष्णूकांत पेन्शनवार, श्रीमती मिरा राजेश घाटे, सौ. शिला राजेश्वर निवल, श्री. नरेंद्र देवराव देशपांडे (तज्ञ संचालक), अॅड.श्री.संतोष विठ्ठलराव कुचनकर (तज्ञ संचालक)

# सहकार चळवळीतील महनीय व्यक्तींचा जीवनप्रवास
# महाराष्ट्रातील १७५ कार्यकर्तृत्वांचा सचित्र आलेख




**सहकार भारती प्रकाशित**
**सहकार सुगंध निर्मित...**




# सहकार महर्षी

**सहकार चळवळीतील प्रत्येकाने आवर्जून वाचावा असा ग्रंथ**

सहकार महर्षी ग्रंथ – प्रतींनुसार विशेष किंमत (कुरिअर मोफत)

| | | |
|---|---|---|
| १ ते ५ ग्रंथ घेतल्यास | – | रु. १५००/– प्रमाणे प्रती ग्रंथ |
| ६ ते १० ग्रंथ घेतल्यास | – | रु. १३५०/– प्रमाणे प्रती ग्रंथ |
| ११ व त्यापेक्षा अधिक घेतल्यास | – | रु. १२००/– प्रमाणे प्रती ग्रंथ |

A/c Name :
Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.
Bank Name :
State Bank of India
Branch :
Hingne Khurd, Pune Branch
Current a/c No. : 36931889346
IFS Code : SBIN0007159

UPI ID SahakarSugandha@SBI
सोबत दिलेला QR कोड स्कॅन करून
ऑनलाईन पेमेंट करावे व तसे कार्यालयास कळवावे.

- महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेचा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्राप्त
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व
  शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी शिफारस केलेला ग्रंथ

**बुके नको 'बुक' देऊ या! आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येकाला 'सहकार महर्षी' ग्रंथ देऊ या!**

## सहकार सुगंध मासिकात माहिती देणे, वर्गणी भरणे तसेच जाहिरातींसाठी जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा ही विनंती - संपादक

**श्री. संतोष गावंडे :** रिजनल हेड (विदर्भ) 9420116337

| पश्चिम महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| रहाटणी, पुणे | श्री. डी. एस. कुलकर्णी | 9420655316 |
| पिंपरी चिंचवड | श्री. शिरीष लिपारे | 9762830555 |
| इचलकरंजी | श्री. प्रशांत कुलकर्णी | 9421172965 |
| सोलापूर जिल्हा | श्री. चंद्रकांत धोंडे | 9881139150 |
| संगमनेर | श्री. विजय भिडे | 9975516360 |
| बेलापूर, जि. नगर | श्री. अरविंद शहाणे | 9922707677 |
| सातारा | श्री. विनायक भिसे | 9923396312 |
| **कोकण विभाग** | | |
| मुंबई-अंधेरी | श्री. रामकृष्ण आवारे | 9619318544 |
| मुंबई-विक्रोळी | श्री. प्रभाकर कांबळे | 9594293734 |
| मुंबई-जोगेश्वरी | श्री. गणेश खिलारे | 9322161526 |
| मुंबई-बोरिवली | श्री. केशव खाडे | 9969825835 |
| डोंबिवली | श्री. संदीप गव्हाणे | 7738449033 |
| पालघर | श्री. सदानंद पावगी | 8888880680 |
| मुरूड, जंजिरा | श्री. मेघराज जाधव | 9561710445<br>9421164777 |
| मुंबई-सायन | श्री. भरत चिंचोले | 7021862169 |

| उत्तर महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| जळगाव | श्री. विश्वास कुलकर्णी | 9922653022 |
| पिंपळनेर, धुळे | श्री. सुर्यकांत जगताप | 9552570515 |
| धुळे | श्री. कृष्णा जाधव | 8482993517 |
| नंदूरबार | श्री. महादू हिरणवाळे | 9823842991<br>8208147121 |
| नाशिक | श्री. राजीव चंद्रात्रे | 9403261226 |
| नाशिक | श्री. नितीन बीबीकर | 9665778497 |
| **मराठवाडा विभाग** | | |
| छत्रपती संभाजीनगर | श्री. योगेश भोसले | 9421704116 |
| पैठण | श्री. देवेश इनामदार | 9404981212 |
| परभणी | श्री. मंगेश पाठक | 8149355759 |
| जालना | ॲड. दशरथ इंगळे | 9422723784 |
| नांदेड | श्री. संदीप चिलकेवार | 7507921655 |
| **विदर्भ विभाग** | | |
| नागपूर | श्री. महेश राव | 9545741474 |
| यवतमाळ | श्री. संतोष गावंडे | 9420116337 |
| भंडारा | श्री. मुकुंदा पांढरीपांडे | 9420514872 |

## सहकारी संस्थांना अत्यंत उपयुक्त खालील पुस्तके सहकार सुगंध कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

| क्र. | पुस्तकाचे नाव | किंमत |
|---|---|---|
| १ | सहकार महर्षी ग्रंथ | १५००/- |
| २ | सहकार बँकांचे कर्ज व्यवस्थापन | ३५०/- |
| ३ | नागरी सहकारी बँकेचे प्रशिक्षण | १२५/- |

**पुस्तकांसाठी संपर्क : ८८०५९ ८१६७३**

वरील पुस्तकांसाठी रक्कम तसेच सहकार सुगंधची वर्गणी भरण्यासाठी सहकार सुगंधच्या वरील जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा किंवा खालील बँक खात्यात रक्कम जमा करण्यासाठी खालील क्यूआर कोड वापरावा.

सहकार सुगंधची वर्गणी १ जानेवारी २०२५ पासून-
**वार्षिक रु. ७००/- त्रैवार्षिक रु. १८००/-**

**UPI ID**
**SahakarSugandha@DNSbank**

**A/c Name : Sahakar Sugandha**
**Bank Name : Dombivali Nagari Sahakari Bank Ltd.**
(Sihagad Road, Pune Branch)
**Current a/c No. : 078011100000065**
**IFS Code - DNSB0000078**

**UPI ID**
**SahakarSugandha@SBI**

**A/c Name : Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.**
**Bank Name : State Bank of India**
(Hingne Khurd, Pune Branch)
**Current a/c No. : 36931889346**
**IFS Code - SBIN0007159**

कृपया वर्गणी जमा केल्यानंतर आपला नाव व पत्ता पुढील ई मेलवर कळवा. **sahakar.sugandha@gmail.com**

**महाराष्ट्रात जिल्हा प्रतिनिधी नेमणे आहेत. संपर्क : ८८०५९८१६७३**


न्यु समृद्धी ठेव योजना
8.20%*
मासिक व्याज योजना
कालावधी - 60 महिने
* नियम व अटी लागू
जळगाव जनता सहकारी बँक लि., जळगाव
(शेड्यूल्ड बँक)
मुख्य कार्यालय : 'सेवा' 117/119, नवी पेठ, जळगाव- 425001.
18002123652 (0257) 2223699 www.jjsbl.bank.in jjsbl_jal@jjsbl.co.in
सब समाज को लिए साथ में आगे है बढते जाना।

# आपल्या स्वप्नांना द्या जनसेवेचे पंख...

**चारचाकी...**
स्वत:साठी असो अथवा व्यवसायासाठी,
खरेदीसाठी एकाच पर्याय ....
**जनसेवा कर्ज** !






आपल्या आवडत्या
**टू व्हिलरसाठी**
किफायती
**कर्ज फक्त जनसेवेचे** !

स्वत:च्या कुटुंबासाठी हवे
**स्वत:चे घर**,
ठेवा विश्वास
**जनसेवेच्या 'घरकुल' कर्जावर** !





**करा जगाची सफर !**
**जनसेवा आहे हमसफर !**

**जनसेवा पर्यटन कर्ज**

• आकर्षक व्याजदर • तत्पर सेवा • अल्प प्रोसेसिंग फी

**संपर्क : 8485871252**
www.janasevabankpune.net

## जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर, पुणे.

जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !

**मुख्य कार्यालय** :
प्लॉट क्र. १४, हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेट, हडपसर, पुणे ४११०१३.



## बँकेच्या ९२ व्या वर्षातील पदार्पणानिमित्त

# आकर्षक ठेव योजना

| 91 दिवस | 15 महिने | 444 दिवस |
|---|---|---|
| 7.00%* | 7.50%* | 8.00%* |
| सर्वांसाठी | नॉन कॉलेबल ठेव | ज्येष्ठ नागरिक |

**योजना मर्यादित कालावधीसाठी... त्वरा करा...!**

* नियम व अटी लागू

अधिक माहितीसाठी आमच्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधा.

मोबाईल : ७८८८००९७१८

Since 1935

SUB का साथ, आपका विकास

## सांगली अर्बन को-ऑप. बँक लि., सांगली

(शेड्युल्ड को-ऑप. बँक)

प्रधान कार्यालय : ४०४, खणभाग, सांगली ४१६४१६, फोन : (०२३३) १३७६२३६ /३७/३८



सहकार भारतीचे मुखपत्र सहकार सुगंध निर्मित

# नागरी सहकारी 2026 बँक / पतसंस्था दैनंदिनी

नागरी सहकारी बँकांसाठी रिझर्व्ह बँकेच्या सर्व परिपत्रकांचा मराठीत संक्षिप्त गोषवारा तसेच QR कोडच्या मदतीने RBI ची सर्व मूळ परिपत्रके उपलब्ध असणारी एकमेव दैनंदिनी व नागरी सहकारी पतसंस्थेच्या दैनंदिनीमध्ये गेल्या तीन वर्षातील सर्व महत्वाच्या परिपत्रकांचा समावेश

देशभरातील नागरी सहकारी बँका व पतसंस्थांच्या संख्येनुसार आर्थिक स्थितीच्या उपयुक्त माहितीसह...




**नागरी सहकारी बँक दैनंदिनी २०२६**

किंमत रु. 500/-

अधिक प्रतींसाठी विशेष सवलत

आजच नोंदणी करा!

**नागरी सहकारी पतसंस्था दैनंदिनी २०२६**




किंमत रु. 400/-

अधिक प्रतींसाठी विशेष सवलत

आजच नोंदणी करा!

सहकार भारतीचे मुखपत्र 'सहकार सुगंध' कार्यालय : ऑफिस नं. १५, विष्णुप्रिया अपार्टमेंट, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे - ४११०३० मो. : 8805981673 ईमेल : sahakar.sugandha@gmail.com

safeage
Security Products Pvt. Ltd.

# OM SALES CORPORATION



**All our Products are BIS Standards**

Our Certificates

ISO 14001 : 2004
IS 5244 : 2014 CM/L-7500087614
IS 550 : 2014 CM/L-3978088
IS 11188 : 2014 CM/L-2870669
ISO 9001 : 2008



Electronic safe | Depository safe | Gold Safe | Fire Resistant Cabinet | Fire Resistant Filing Cabinet | Industrial Locker | Compactor

**Nilesh Bonde Mob.: 9850120090 / 8698337947**
**Website : www.omsalescorportion.net I Id : omsales.safeage@gmail.com**

Add. : S.No. 179, Fuge Vasti, Behind Pyramid Hotel,
Near Gajanan Maharaj Mandir, Magzine Chowk,
Bhosari-Alandi Road, Bhosari - 411039.

Factory Add - Safeage Security Products Pvt. Ltd., Shiye, Jyotiba Road, Kolhapur

We are authorised distributor for Pune, Satara, Sangli, Solapur, Ratnagiri, Sindhudurg, Raigad, Ahemadnagar, Nashik, Jalgaon, Dhule, Nandurbar, Aurangabad, Jalna, Parbhani, Hingoli, Usmanabad, Beed, Latur, Nanded, Buldhana, Akola, Amravati, Yavatmal, Washim, Nagpur, Bhandara, Wardha, Chandrapur, Gadchiroli, Gondiya,


50+ YEARS OF MOMENTUM
अर्थ सहकारेण कल्याणम्
THE KALYAN JANATA SAHAKARI BANK LTD.
MULTI-STATE SCHEDULED BANK
Your dream car is just a key away!
Drive home happiness with easy,
TRUSTED CAR LOANS.
Lowest RoI based on your Cibil score*
Minimal Processing Fees & Quick Disbursement*
*T & C APPLY
TOLL FREE: 1800 233 1919
kalyanjanata.bank.in
KJSBank

Registered - SAHAKAR SUGANDHA - PRGI NO. MAHMUL/2005/16099
Magazine Post Contract No. : BP/EP 40280299 Customer ID : 3000071496
(Publication Date - 05/03/2026) Posting on 07/03/2026 Posting at BMI Pune PSO, Pune 411001

